# सत्र २
# समग्र अर्थशास्त्र

**प्रकरण १ संकल्पना व व्याख्या**

खुल्या अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह - स्थूल देशांतर्गत उत्पन्न (GDP) - स्थूल राष्ट्रीय उत्पन्न (GNP) - निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न (NNP) - GDP - डिफ्लेटर - वास्तविक आणि नाममात्र परिमाण - चलनाच्या खरेदीशक्ती समता विनिमय दराला स्थूल देशांतर्गत उत्पन्न - किंमत निर्देशांक म्हणून विनिमय दर - स्थूल देशांतर्गत उत्पन्नाची वाढ : भारतीय अर्थशास्त्राचा अनुभव - आर्थिक विकासाचा दर - स्थूल देशांतर्गत उत्पन्नाची क्षेत्रीय रचना - दराचे स्त्रोत

**प्रकरण २ उपभोग, बचत आणि गुंतवणूक**

खुल्या अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्नाची ओळख - केन्सचे उपभोग फलन - गुंतवणूक गुणक - भांडवलाच्या सिमांत कार्यक्षमता व व्याजदर संबंध - प्रवेग - भारतातील बचतीचे स्त्रोत : रचना आणि प्रवाह

**प्रकरण ३ शासन / सरकार**

सामाजिक वस्तू व त्यांची वैशिष्ट्ये - गुणवत्ता वस्तू सार्वजनिक उत्पन्नाचे स्त्रोत : प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर - कराघात, करभार आणि कर संक्रमण - करेतर उत्पन्नाचे स्त्रोत - सार्वजनिक खर्च : महसूली आणि भांडवली खर्च - अनुदान - तुटीच्या संकल्पनांचे प्रकार : महसूली, अंदाजपत्रकीय, राजकोषीय आणि प्राथमिक - वस्तू व सेवा कर संकल्पना - अलिकडील कल

**प्रकरण ४ बाह्यक्षेत्र**

व्यवहारतोल रचना - व्यवहारतोल असमतोलाचे प्रकार - विनिमय दर निर्धारण - विदेशी मुद्रा व त्याचे घटक

❖❖❖❖

munotes.in

मॉड्यूल १

# घटक -१

## राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह
## (CIRCULAR FLOW OF NATIONAL INCOME)

**घटक रचना :**

१.० उद्दिष्ट्ये
१.१ प्रस्तावना
१.२ राष्ट्रीय उत्पन्न वैशिष्ट्ये
१.३ बंदिस्थ अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्न चक्रिय प्रवाह
१.४ खुल्या अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्न चक्रिय प्रवाह
१.५ उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहाचे महत्त्व
१.६ समारोप
१.७ सरावासाठी प्रश्न

## १.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

- राष्ट्रीय उत्पन्नाची व्याख्या आणि वैशिष्ट्ये अभ्यासणे.
- बंदिस्थ अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाह समजावून घेणे.
- खुल्या अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाह समजावून घेणे.
- उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहाचे महत्त्व अभ्यासणे.

## १.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

समग्र पातळीवर अभ्यासल्या जाणाऱ्या चलामध्ये राष्ट्रीय उत्पन्न हा चल महत्त्वाचा आहे. कारण अर्थव्यवस्थेतील एकूण मागणी, एकूण उत्पादन, एकूण रोजगार वगैरे गोष्टी राष्ट्रीय उत्पन्नाच्या पातळीवरुन निश्चित होत असतात. प्रस्तूत प्रकरणामध्ये आपण मुक्त अर्थव्यवस्थेतील आणि खुल्या अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह अभ्यासणार आहोत.

munotes.in

**राष्ट्रीय उत्पन्न -** राष्ट्रीय उत्पन्न ही एक महत्त्वाची संकल्पना आहे. राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे एका विशिष्ट राष्ट्राचे विशिष्ट काळातील उत्पन्न होय. अर्थव्यवस्थेच्या कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रात अनेक प्रकारच्या वस्तू व सेवांचे उत्पादन होत असते. अशा उत्पादनाचे पैशाच्या माध्यमात व्यक्त केलेले मूल्य म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय.

**व्याख्या (Definitions) :**

१) प्रा. पिगु : "समाजाच्या वस्तुनिष्ठ उत्पन्नाचा जो भाग पैशाच्या स्वरुपात मोजता येतो त्याला राष्ट्रीय उत्पन्न म्हणतात. अर्थातच यात विदेशातून प्राप्त होणारे उत्पन्न समाविष्ट असते."

२) प्रा. फिशर : "अंतिम उपभोक्त्यांना त्यांच्या भौतिक किंवा मानवी साधनसामग्रीपासून मिळणाऱ्या सेवा म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय."

३) प्रा. सायमन कुझनेट : "राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे देशाच्या उत्पादन व्यवस्थेमधून एका वर्षाच्या काळात वस्तू व सेवांचा उपभोक्त्याच्या हाती येणारा निव्वळ प्रवाह होय."

४) राष्ट्रीय उत्पन्न समिती : एखाद्या विशिष्ट कालखंडात निर्माण केलेल्या वस्तू व सेवांची दुहेरी गणना टाळून केलेले मापन म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नाचा अंदाज होय.

## १.२ राष्ट्रीय उत्पन्नाची वैशिष्ट्ये (OBJECTIVES OF NATIONAL INCOME)

१) राष्ट्रीय उत्पन्न ही प्रवाही संकल्पना आहे. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाची निर्मिती ही सातत्याने होत असते. राष्ट्रीय उत्पन्न ही विशिष्ट एका दिवसासाठी न मोजता ते विशिष्ट काळासाठी मोजेले जाते.

२) राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन पैशात केले जाते. साधारणपणे एका आर्थिक वर्षातील निर्माण झालेल्या वस्तू व सेवांचे मूल्य हे पैशातच व्यक्त केले जाते.

३) राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन एका वर्षासाठी केले जाते.

४) राष्ट्रीय उत्पन्न ही एक समग्रलक्षी संकल्पना आहे. कारण यात राष्ट्रीय दृष्टीकोन आढळतो.

५) राष्ट्रीय उत्पन्न हे आर्थिक प्रगती मोजण्याचे महत्त्वपूर्ण साधन आहे.

६) राष्ट्रीय उत्पन्नात विशिष्ट काळात तयार झालेल्या केवळ अंतिम वस्तूंचे मूल्यच विचारात घेतले जाते.

## १.३ बंदिस्थ अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्न चक्रिय प्रवाह (THE CIRCULAR FLOW OF INCOME IN CLOSED ECONOMY)

राष्ट्रीय उत्पन्न प्रवाही संकल्पना आहे. राष्ट्रीय उत्पन्न अखंडपणे निर्माण होत असते. अर्थव्यवस्थेत उत्पादन, वितरण आणि उपभोग अशा महत्त्वपूर्ण घटना घडत असतात. या घटना समाजातील उपभोक्ते व उत्पादक यांच्यामध्ये घडत असतात.

munotes.in

बंदिस्थ अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्रिय प्रवाह म्हणजे ज्या अर्थव्यवस्थेचे इतर देशांशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक व्यवहार होत नसतात. त्या अर्थव्यवस्थेत बंदिस्थ अर्थव्यवस्था असे म्हणतात.

सुरुवातीच्या काळात मानवाच्या गरजा मर्यादित होत्या. मानव स्वतःच आपल्या गरजा पूर्ण करत होता. पण संस्कृतीच्या जसजसा विक्रीस होत गेला तसे नवीन शोध लागले. श्रमविभागणीनंतर वस्तू विनिमय पद्धती आली. पैशाचा शोध लागला. पैशामुळे अर्थव्यवस्थेच्या प्रणालीमध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाले. कुटुंब संस्था व व्यवसाय संस्था यांच्यात पैशाच्या सहाय्याने व्यवहार होऊ लागले.


उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाह म्हणजे अर्थव्यवस्थेतील एका व्यक्तीकडून पैशाच्या स्वरुपात उत्पन्न दुसऱ्या व्यक्तिकडे जाणे व पैशाच्या स्वरुपात ते वेगवेगळ्या मार्गांनी पहिल्या व्यक्तिकडे परत येते.

अर्थव्यवस्थेत चक्राकार प्रवाह सुरु रहातो याचे स्पष्टीकरण उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाह या संकल्पनेवरुन मिळते. राष्ट्रीय उत्पन्नाचे चक्राकार स्पष्टीकरण करताना उत्पन्नाचा प्रवाह द्विक्षेत्रीय अर्थव्यवस्थेत त्रिक्षेत्रीय अर्थव्यवस्थेत, चतुःक्षेत्रीय अर्थव्यवस्थेत अशा तीन्ही प्रकारच्या अर्थव्यवस्थेत सुरु असतो.

**१) द्विक्षेत्रीय अर्थव्यवस्था** - द्विक्षेत्रीय अर्थव्यवस्थेत कुटुंबसंस्था व उद्योगसंस्था असे दोन क्षेत्र असतात. म्हणजेच वस्तूंचा बाजार व घटकांचा बाजार हो दोन क्षेत्राचा समावेश होतो.

**द्विक्षेत्रीय प्रतिमान (Two Sector Model) :**

अर्थव्यवस्थेत कौटुंबिक क्षेत्र आणि व्यवसाय क्षेत्र अशी दोनच क्षेत्र असलेल्या काल्पनिक अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहास द्विक्षेत्रीय प्रतिमान म्हणतात. भूमी, श्रम, भांडवल या उत्पादन घटकांची मालकी कुटुंबाकडे असते. कुटुंबाना या घटकाच्या सेवा विकून उत्पन्न मिळते. व्यवसायसंस्था कुंटुबाकडून मिळणाऱ्या उत्पादन घटकांच्या आधारे वस्तू व सेवांचे उत्पादन करुन व त्या कुटुंबाना किंवा उपभोक्त्यांना पुरवितात. अशाप्रकारे कुटूंबक्षेत्र हे व्यवसाय क्षेत्राकडून त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तू विकत घेत. दोनच क्षेत्र असलेल्या अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह पुढील आकृती दर्शविला आहे.




**राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह**

**आकृती १.१**


उद्योगसंस्था ही कुटुंबसंस्थाकडून भूमी, श्रम, भांडवल व संयोजक हे उत्पादन घटक, विकत होते त्याचा मोबदला म्हणून कुटुंबसंस्थाना खंड, वेतन, व्याज, नफा देत असते. याउलट कुटुंबसंस्थाही उद्योगसंस्थाकडून वस्तू व सेवा घेत असते. त्या मोबदल्यात उद्योगसंस्था त्यासाठी उपभोग खर्चाच्या रुपात उत्पन्न देत असते. आकृतीमध्ये आतील प्रवाह हा वास्तव प्रवाह म्हणून ओळखला जातो तर बाहेरील प्रवाह हा मौद्रिक प्रवाह म्हणून ओळखला जातो.

वरील चक्राकार प्रवाह हा राष्ट्रीय उत्पन्नातील समतोलही दर्शवित असतो. कुंटूबसंस्था ज्या बचती करतात त्या वित्तीय बाजारात येतात आणि वित्तीय बाजारातून कर्ज घेऊन उद्योगसंस्था गुंतवणूक करतात. त्यामुळे बचतीच्या रुपातून बाहेर पडलेला पैसा गुंतवणूकीच्या रुपाने पुन्हा प्रवाहात येतो.

**तीन क्षेत्रीय प्रतिमान (Two Sector Model) :**

कुटुंबसंस्था, उद्योगसंस्था या प्रमुख क्षेत्राबरोबरच या प्रतिमानात शासन या तिसऱ्या क्षेत्राचा विचार केला जातो. त्रिक्षेत्रीय प्रतिमान स्पष्ट करताना शासनाचा प्रमुख आर्थिक व्यवहार आणि त्यांचे कुटुंबसंस्था आणि उद्योगसंस्था यांच्यावर होणाऱ्या परिणामांचे विश्लेषण आवश्यक ठरते. या संदर्भात प्रत्यक्ष कर, सार्वजनिक खर्च आणि हस्तांतरित खर्च या व्यवहारांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो.

करामुळे विशेषतः उत्पन्न कर, संपत्तीकर इत्यादींमुळे ग्राहकाची खरेदी क्षमता घटते. परिणामी उत्पन्न उपभोग आणि बचत यांचा संकोच होतो. म्हणजे करांच्या चक्रिय व्यवहारातील गळती म्हणता येईल. याउलट सार्वजनिक खर्च म्हणजे भर होय. शासन कुटुंबसंस्थेकडून उत्पादन घटकांची तर उद्योगसंस्थाकडून वस्तू आणि सेवांची खरेदी करते त्यामुळे एकूण मागणीत वाढ होऊन चक्रिय प्रवाहांचा विस्तार होतो. निवृत्तीवेतन, बेरोजगार भत्ता इत्यादी स्वरुपाच्या हस्तांतर खर्चामुळे व्यक्तिच्या उत्पन्नात व त्यामुळे उपभोगात वाढ होऊन चक्रिय प्रवाहाचा विस्तार होतो.




**त्रिक्षेत्रीय उत्पन्नाचा चक्रिय प्रवाह**

**आकृती १.२**

munotes.in

वरील आकृतीत कुंटुबसंस्था आणि उद्योगसंस्था या द्विक्षेत्रीय घटकाबरोबर शासन या तिसऱ्या क्षेत्राचा समावेश केलेला आहे व त्यामधील उत्पन्न-खर्च प्रवाह दर्शविला आहे.

**शासन-कुटुंबसंस्था :** व्यक्तिकडून किंवा कुटुंबाकडून शासनाला उत्पन्न कर, संपत्तीकर अशा प्रत्यक्ष करांच्या स्वरुपात पैसा प्राप्त होतो. सरकार सार्वजनिक खर्चाद्वारे अनेक उपक्रम हाती घेते. उदा. दळणवळण कालवे, पाटबंधारे इत्यादी. याशिवाय व्यक्तिना देण्यात येणाऱ्या वेतन, बेरोजगार भत्ता अशा रक्कमामुळे शासनाला उत्पन्न मिळते. हस्तांतरित खर्चाच्या मोबदल्यात व्यक्ती शासनाला काही देत नाहीत. त्यांना प्राप्त होणाऱ्या वेतन, व्याज अशा घटक मोबदल्याची परतफेड पुरवठ्याच्या (श्रम, भांडवल वगैरे) स्वरुपात केली जाते.

**शासन - उद्योगसंस्था :** शासन व उद्योगसंस्था या दोन चलनरुपी व वास्तव चक्रिय प्रवाह अस्तित्वात असतात. सरकार उद्योग संस्थाकडून वस्तू आणि सेवा खरेदी करते व किंमतीच्या स्वरुपात उद्योगसंस्थाना उत्पन्न प्राप्त होते. उद्योगसंस्थाकडून शासनाला प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर, परवानाशुल्क, नोंदणी शुल्क इत्यादी स्वरुपात उत्पन्न मिळते. उद्योगसंस्थांनी सरकारला दिलेले विविध प्रकारचे कर म्हणजे चक्राकार प्रवाहातील गळती होय. सरकार उद्योगसंस्थाकडून विविध वस्तू खरेदी करते आणि त्याबद्दल उद्योगसंस्थांना उत्पन्न देते. हा जो सरकार खर्च करते ती उत्पन्न प्रवाहातील भर होय.

थोडक्यात त्रिक्षेत्रीय प्रतिमानात शासन - कुटुंबसंस्था आणि शासन - उद्योगसंस्था यांच्यामधील उत्पन्न खर्चाचा चक्रिय प्रवाह स्पष्ट होतो.

## १.४ खुल्या अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाच्या चक्रिय प्रवाह (CIRCULAR FLOW OF INCOME IN OPEN ECONOMY)

### II) खुल्या अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्रिय प्रवाह (Circular Flow in open economy four sector model) :

अर्थव्यवस्थेचे जगातील इतर देशांशी व्यापारी संबंध असतात. अशा खुल्या अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहाची माहिती घ्यायची आहे. अर्थव्यवस्थेतील कुटुंबे, व्यवसायसंस्था, सरकार आणि याबरोबरच विदेशी क्षेत्र अशा चार क्षेत्राचा विचार चतु:क्षेत्रीय प्रतिमानात केला आहे.

**चतु:क्षेत्रीय प्रतिमान :**

जागतिकीकरणाच्या काळात विविध राष्ट्रांमधील परस्परावलंबित्व फार व्यापक आणि गुंतागुंतीचे झाले आहे. अशा परिस्थितीत परकिय क्षेत्राच्या अंतर्भाव केल्याशिवाय चक्रिय प्रवाहाचे विश्लेषण अशक्य आहे. चतु:क्षेत्रीय प्रतिमान तीन अंतर्गत क्षेत्राच्या बरोबर परकिय व्यापार आणि व्यवहार यांच्या समावेशाने परिपूर्ण असते.


जेव्हा एखादा देश इतर देशाकडून वस्तू व सेवांची आयात करतो किंवा इतर देशांना वस्तू व सेवांची निर्यात करतो. तेव्हा त्या देशातील उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहावर त्याचा परिणाम होतो. उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहाचा विचार करताना विदेशी क्षेत्रांचा विचार करणे आवश्यक आहे. कारण खुल्या अर्थव्यवस्थेत परकिय व्यापाराची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

परकिय क्षेत्राचा विचार करताना दोन प्रकारच्या व्यवहारांचा अंतर्भाव केला जातो.

अ) वस्तू व सेवांची आयात-निर्यात
ब) भांडवली व्यवहार-भांडवलाचे आगमन-निर्गमन

परकिय व्यवहारांनी आणि त्यातून निर्माण होणाऱ्या देवाणघेवाणीची व्याप्ती खूप विस्तृत आहे. यासाठी काही गृहितकांचा वापर करुन परकिय क्षेत्राचा उत्पन्न व खर्चावर होणारा परिणाम स्पष्ट करता येतो. प्रतिमानातील गुंतागुंत टाळण्यासाठी पुढीलप्रमाणे गृहिते मांडली आहेत.

१) फक्त वस्तू व सेवांच्या आयात-निर्यातीचा समावेश.
२) कुंटूबव्यसंस्थेचा सहभाग फक्त श्रम पुरवठा एवढाच मर्यादित आहे.
३) वस्तूची आयात-निर्यात फक्त उद्योगसंस्थांच्या मार्फत होत असते.




**चतु:क्षेत्रीय उत्पन्नाचा चक्रिय प्रवाह**
**आकृती १.३**

वरील चतु:क्षेत्रीय प्रतिमानात केवळ पैशातील प्रवाह दर्शविले आहे. पैशातील प्रत्येक प्रवाहाच्या आड वस्तूरूप अथवा वास्तव प्रवाह असतात.

आकृतीत दर्शविलेल्या उत्पन्न प्रवाहामधून अर्थव्यवस्थेतील गळती किंवा भर स्पष्ट होते. निर्यात म्हणजे अर्थव्यवस्थेतील उत्पन्न प्रवाहातील भर होय तर आयात म्हणजे उत्पन्न प्रवाहातील गळती होय.

१) कुटुंब - परकिय क्षेत्र - कुंटूबे विदेशातून आयात केलेल्या वस्तू व सेवा विकत घेतात त्यासाठी खर्च करतात ही उत्पन्न प्रवाहातील गळती होय. तर कुंटुबसंस्थाना विदेशात सेवाबद्दल हस्तांतरीत उत्पन्न मिळते.

२) उद्योगसंस्था - परकिय क्षेत्र - उद्योगसंस्था विविध देशांना वस्तू व सेवांची निर्यात करतात त्यापासून उत्पन्न मिळते. त्याचप्रमाणे उद्योगसंस्थाना विमा, बँकिंग, जहाजसेवा पुरवल्याबद्दल उत्पन्न मिळते. विदेशात केलेल्या गुंतवणूकीतून नफा मिळतो. तर विदेशातून भांडवली वस्तू कच्चामाल, उपभोग्य वस्तू यांची आयात करतात. त्यातून उत्पन्न प्रवाहात गळती निर्माण होते. उद्योगसंस्थेप्रमाणे सरकारसुद्धा विविध वस्तू व सेवांची आयात निर्यात करतात. इतर देशांना

munotes.in

कर्ज देतात. यातून सरकारला उत्पन्न मिळते आणि विदेशातून वस्तू व सेवांची आयात निर्यात करताना सरकारला रक्कम द्यावी लागते तेव्हा उत्पन्न प्रवाहात गळती निर्माण होते.

परकिय क्षेत्राच्या अंतर्भावामुळे एकूण-उत्पन्न खर्च प्रवाहावर काय परिणाम होतो हे समजावून घेणे आवश्यक आहे. कारण या प्रवाहाच्या आकारमानावर देशांतर्गत उत्पन्न, उत्पादन, रोजगार किंमती इत्यादी समग्र चलाची पातळी अवलंबून असते. व्यापारशेष किंवा व्यवहारशेष हे अशा परिमाणाचे मापन करण्याचे साधन आहे. स्थूलमानाने -

व्यापारशेष = आयात - निर्यात

१) जर आयात निर्यातीपेक्षा जास्त असेल तर व्यापारशेष ऋणात्मक असतो. (आयात > निर्यात) त्यामुळे चक्रिय प्रवाहाचा संकोच होतो.

२) जर आयात निर्यातीपेक्षा कमी असेल तर व्यापारशेष धनात्मक असतो. (आयात < निर्यात) त्यामुळे चक्रिय प्रवाहाचा विस्तार होतो.

३) जर आयात आणि निर्यात समान असेल तर व्यापारशेष शून्य असते. (आयात = निर्यात) त्यामुळे चक्रिय प्रवाहावर परिणाम होत नाही.

यावरुन असा निष्कर्ष काढता येतो कि उत्पन्न, उत्पादन, रोजगार वाढीसाठी म्हणजे आर्थिक विकासासाठी निर्यात वाढवणे आवश्यक आहे .

**आपली प्रगती तपासा.**

१) बंदिस्त अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह चर्चा करा.
२) खुल्या अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह टिप लिहा.

## १.५ उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहाचे महत्त्व (IMPORTANCE OF CIRCULAR FLOW OF INCOME)

चक्राकार प्रवाह ही संकल्पना अनेक दृष्टीने महत्त्वाची आहे. या संकल्पनेचे महत्त्व आपल्याला पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१) अर्थव्यवस्थेची कार्यपद्धती समजण्यास उपयुक्त :** चक्राकार प्रवाहाच्या संकल्पनेमुळे अर्थव्यवस्थेचे वास्तव स्वरुप स्पष्ट होते. अर्थव्यवस्थेचे कार्य कार्यक्षमपणे सुरु आहे किंवा अर्थव्यवस्थेचा कार्यात काही अडथळे आहेत याची जाणीव आपल्याला होते.

**२) असमतोलाच्या समस्येचा अभ्यास करता येतो :** उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहाच्या आधारे व्यवहार रेषातील असमतोलाच्या समस्येचा अभ्यास करणे शक्य होते. त्याचप्रमाणे अर्थव्यवस्थेच्या कार्यात काही अडथळे असतील तर त्याची माहिती मिळते.

munotes.in

**३) मौद्रिक धोरणाचे महत्त्व लक्षात येते :** उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहाचा अभ्यास अर्थव्यवस्थेतील बचत व गुंतवणूक यात समानता प्रस्थापित करण्याच्या बाबतीतील चलन विषयक धोरणाच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर प्रकाश टाकतो.

**४) राजकोषीय धोरणाचे महत्त्व लक्षात येते :** उत्पन्न व खर्चात समानता प्रस्थापित करण्यासाठी राजकोषीय धोरणाचे महत्त्व उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहाच्या अभ्यासावरुन लक्षात येते.

**५) चक्राकार प्रवाहातील गळती शोधून काढण्यास मदत होते :** उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहाच्या आधारे बचती, आयात आणि कर या स्वरुपात प्रवाहातील गळती लक्षात येते. अशी गळती थांबविण्यासाठी सरकारला निर्यात वाढ व आयात कमी करण्यासाठी प्रयत्न करावे लागतात.

अशाप्रकारे अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने चक्राकार प्रवाहाची संकल्पना महत्त्वाची आहे.

## १.६ समारोप (CONCLUSION)

उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाह म्हणजे अशी प्रक्रिया की ज्याद्वारे अर्थव्यवस्थेचे राष्ट्रीय उत्पन्न चक्राकार पद्धतीने फिरत असते. अर्थव्यवस्थेत कुटूंबे व व्यवसाय संस्था यांच्यात उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह चालू अशतो. कुटूंबे उत्पादन घटक व्यवसाय संस्थाना पुरवितात व व्यवसाय संस्था त्या बदल्यात कुटूंबाना मोबदला देतात. तसेच व्यवसाय संस्था वस्तू व सेवा कुटूंब संस्थाना पुरवितात व त्यावरील खर्चाच्या माध्यमातून कुटूंबांकडून व्यवसाय संस्थांना उत्पन्न मिळते. कुटूंबे व व्यवसाय संस्था या दोन क्षेत्रांबरोरच सरकार या क्षेत्राचा समावेश करणे महत्त्वाचे ठरते. सरकारकडूनह उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहात भर टाकली जाते. तसेच चक्राकार प्रवाहातून उत्पत्र काढून घेतले जाते. उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहाचा विचार करता विदेशी क्षेत्राचाही विचार करावा लागतो.

## १.७ सरावासाठी प्रश्न (QUESTIONS)

१) राष्ट्रीय उत्पन्नाची वैशिष्ट्ये कोणती ?

२) टिपा लिहा.

  १) दोन क्षेत्रीय प्रतिमान

  २) तीन क्षेत्रीय प्रतिमान

  ३) चतु: क्षेत्रीय प्रतिमान

❖❖❖❖

# घटक -२

## संकल्पना व परिभाषा
## (CONCEPTS AND DEFINITIONS)

**घटक रचना :**

२.० उद्दिष्ट्ये
२.१ प्रस्तावना
२.२ स्थूल देशांतर्गत उत्पादन, स्थूल राष्ट्रीय उत्पन्न आणि निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न
२.३ घटक खर्चानुसार राष्ट्रीय उत्पन्न व बाजार किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न
२.४ राष्ट्रीय उत्पन्न मोजमापाच्या पद्धती
२.५ राष्ट्रीय उत्पन्न मोजमापातील अडचणी
२.६ राष्ट्रीय उत्पन्न आकडेवारीचे महत्त्व
२.७ चालू किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पादन आणि स्थिर किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पादन
२.८ चलनाच्या खरेदीशक्ती समता विनिमय दराला स्थूल देशांतर्गत उत्पन्न
२.९ किंमत निर्देशांक म्हणून विनिमय दर
२.१० स्थूल देशांतर्गत उत्पन्नाची वाढ
२.११ समारोप
२.१२ सरावासाठी प्रश्न

## २.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

- स्थूल देशांतर्गत उत्पादन, स्थूल राष्ट्रीय उत्पन्न आणि निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न या संकल्पना समजावून घेणे.
- चलनाच्या खरेदीशक्ती समता विनिमय दराला स्थूल देशांतर्गत उत्पन्न अभ्यासणे.
- स्थूल देशांतर्गत उत्पन्नाची क्षेत्रीय रचना अभ्यासणे.

## २.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

समग्रलक्षी अर्थशास्त्रीय विश्लेषणात राष्ट्रीय उत्पन्नाच्या विविध संकल्पना वापरल्या जात असल्याने त्यांचा परिचय करुन घेणे आवश्यक आहे. प्रस्तूत प्रकरणात आपण स्थूल देशांतर्गत उत्पादन, स्थूल राष्ट्रीय उत्पन्न आणि निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न या संकल्पनांचा अभ्यास करणार आहोत.

munotes.in

## २.२ स्थूल देशांतर्गत उत्पादन, स्थूल राष्ट्रीय उत्पादन आणि निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न (GDP, GNP AND NNP)

### १) स्थूल देशांतर्गत उत्पादन (Gross Domestic Product - GDP) :

एका आर्थिक वर्षात देशाच्या भौगोलिक सीमांच्या मध्ये तयार झालेल्या सर्व अंतिम वस्तू आणि सेवांचे पैशातील मूल्य म्हणजे स्थूल देशांतर्गत उत्पादन होय. यामध्ये विदेशातून प्राप्त झालेल्या उत्पन्नाचा समावेश होत नाही. येथे फक्त देशांतर्गत अर्थव्यवस्थेतील वस्तू व सेवांचे मूल्य विचारात घेतले जाते.

"स्थूल देशांतर्गत उत्पादन म्हणजे देशातील नागरिकांनी अथवा परकियांनी देशाच्या चतु:सीमेत वर्षभरात निर्माण केलेल्या अंतिम वस्तू व सेवांचे बाजारमूल्य होय."

एखाद्या देशाच्या अर्थव्यवस्थेत एका वर्षाच्या कालावधीत निर्माण केल्या जाणाऱ्या सर्व अंतिम वस्तू व सेवांच्या मूल्यास स्थूल देशांतर्गत उत्पादन असे म्हणतात.

१) बंदिस्थ अर्थव्यवस्थेसाठी

GDP = C + I + G

GDP - स्थूल देशांतर्गत उत्पादन

C = उपभोग खर्च

I = गुंतवणूक खर्च

G = शासकीय खर्च

२) खुल्या अर्थव्यवस्थेसाठी

GDP = C + I + G (X - M)

GDP = स्थूल देशांतर्गत उत्पादन

C = उपभोग खर्च

I = गुंतवणूक खर्च

G = शासकिय खर्च

X = निर्यात

M = आयात

बंदिस्थ अर्थव्यवस्थेत उर्वरित जगाशी कसलाही संबंध नसतो. सर्व प्रकारचे आर्थिक व्यवहार, गरजा इत्यादी त्याच अर्थव्यवस्थेत पूर्ण होतात निर्यात - आयात नसल्याने विदेशी उत्पन्नाचा प्रश्न निर्माण होत नाही. खुल्या अर्थव्यवस्थेत मात्र अन्य देशांशी होणाऱ्या आयात-निर्यात व्यवहारामुळे विदेशातून होणाऱ्या उत्पन्न प्राप्तीचा समावेश करणे आवश्यक असते.

### २) स्थूल राष्ट्रीय उत्पादन (Gross National Product - GNP) :

स्थूल राष्ट्रीय उत्पादन ही राष्ट्रीय उत्पन्नाची सर्वात महत्त्वाची आणि मोठ्या प्रमाणात वापरली जाणारी संकल्पना आहे. स्थूल राष्ट्रीय उत्पादन म्हणजे विशिष्ट कालावधीत देशात उत्पादित झालेल्या सर्व अंतिम वस्तू आणि उत्पादक यांना प्रत्यक्ष उपभोगासाठी तयार असणाऱ्या वस्तूचाच समावेश केला जातो.

**व्याख्या :** एका वर्षामध्ये देशाच्या नागरिकांनी स्वदेशात अथवा परदेशात उत्पादित केलेल्या अंतीम वस्तू आणि सेवांचे बाजारमूल्य म्हणजे स्थूल राष्ट्रीय उत्पादन होय. या अंतिम वस्तूत उपभोग्य व भांडवली वस्तूंचा समावेश होतो. संख्याशास्त्रीय दृष्टीकोनातून स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचे मोजमाप हे निव्वळ राष्ट्रीय उत्पादनापेक्षा अधिक अचूक असते कारण घसाऱ्याचे अचूक मोजमाप करणे कठीण असते.

GNP = C + I + G (X - M) + (R - P)
GNP = स्थूल राष्ट्रीय उत्पादन
C = उपभोग खर्च
I = गुंतवणूक खर्च
G = शासकिय खर्च
X = निर्यात
M = आयात
R = विदेशातून प्राप्त झालेले उत्पन्न
P = विदेशी बाबीसाठी द्यावी लागणारी देणी

स्थूल राष्ट्रीय उत्पादनाला एकूण राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात. एका वर्षाच्या कालखंडात देशातील श्रम, भांडवल आणि इतर साधनसामग्रीच्या सहाय्याने उत्पादन केलेल्या अंतिम वस्तूंचे पैशातील एकूण मूल्य म्हणजे स्थूल राष्ट्रीय उत्पन्न होय. देशातील नागरिकाकडून विविध प्रकारचे व्यवहार केले जातात. त्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात केला जातो. देशातील नागरिकांनी परदेशात काही गुंतवणूक केली असेल किंवा अन्य व्यवहार केलेले असतील तर त्यापासून देशाला मिळणारे उत्पन्न हे स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात जमा केले जाते. याउलट परकिय व्यक्ती अथवा संस्थांनी आपल्या देशात केलेल्या व्यवहारापासून त्यांना मिळणारे उत्पन्न आपल्या राष्ट्रीय उत्पन्नातून वजा करावे लागते. एका वर्षाच्या कालावधीसाठी हे हिशोब केले जातात. दुहेरी गणना टाळण्यासाठी स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात अंतस्थित वस्तूंच्या मूल्याचा समावेश केला जात नाही परंतू अंतिम वस्तूंच्या मूल्याचा समावेश केला जातो. (एखाद्या व्यक्तिने अथवा उद्योगसंस्थेने उत्पादन केलेली वस्तू अथवा सेवा जर दुसऱ्या संस्थेकडून उत्पादन कार्यासाठी वापरली जात असेल तर ती अंतस्थित वस्तू होय.)

स्थूल राष्ट्रीय उत्पादनात देशातील नागरिकांनी उत्पादन केलेल्या सर्व वस्तू व सेवा यांचा समावेश असतो. अशा वस्तू व सेवांची किंमत विचारात घेऊन राष्ट्रीय उत्पन्नाची आकडेवारी निश्चित केली जाते. याचा अर्थ अशा वस्तू देशातच उत्पादन केल्या पाहिजेत असे नाही. देशातील नागरिकांनी विदेशात उत्पादन केलेल्या वस्तू व सेवांचा समावेशही स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात केला जातो. स्थूल देशांतर्गत उत्पादन आणि स्थूल राष्ट्रीय उत्पादन यात फरक आढळतो हा फरक पुढीलप्रमाणे -

**स्थूल देशांतर्गत उत्पादन आणि स्थूल राष्ट्रीय उत्पादन फरक :**

| स्थूल देशांतर्गत उत्पादन GDP | स्थूल राष्ट्रीय उत्पादन GNP |
|---|---|
| १) एका आर्थिक वर्षात देशाच्या भौगोलिक व सागरी हद्दीतील उत्पादनाचे मूल्य म्हणजे स्थूल देशांतर्गत उत्पादन होय. | १) एका आर्थिक वर्षात देशातील सर्व अंतीम वस्तू व सेवांचे पैशातील मूल्य म्हणजे स्थुल राष्ट्रीय उत्पादन होय. |

| | |
|---|---|
| २) एखाद्या देशाच्या नागरिकांनी अन्य देशात मिळवलेल्या उत्पन्नाचा समावेश स्थूल देशांतर्गत उत्पादनात होते. | २) एखाद्या देशाच्या नागरिकांनी देशात अथवा देशाबाहेर मिळविलेल्या सर्व उत्पन्नाचा समावेश स्थूल राष्ट्रीय उत्पादनात होता. |
| ३) देशाच्या सीमामध्ये अन्य देशाच्या नागरिकानीही मिळवलेल्या उत्पन्नाचा समावेश स्थूल देशांतर्गत उत्पादनात होतो. | ३) स्थूल राष्ट्रीय उत्पादनामध्ये एखाद्या देशात इतर देशाच्या नागरिकांनी मिळवलेले उत्पन्न समाविष्ट केले जात नाही. |

### ३) निव्वळ राष्ट्रीय उत्पादन (Net National Product - NNP) :

उत्पादन प्रक्रियेमध्ये एका विशिष्ट कालखंडात देशातील रहिवाशांनी उत्पादित केलेल्या सर्व वस्तू व सेवांच्या निव्वळ उत्पादनाची बेरीज म्हणजे निव्वळ राष्ट्रीय उत्पादन होय. स्थूल राष्ट्रीय उत्पादनातून घसारा वजा केला असता निव्वळ राष्ट्रीय उत्पादन समजते.

निव्वळ राष्ट्रीय उत्पादन = स्थूल राष्ट्रीय उत्पन्न - घसारा

NNP = GNP - D

निव्वळ राष्ट्रीय उत्पादन म्हणजे विशिष्ट कालखंडातील उपभोग्य वस्तू व सरकारी वस्तूचे उत्पादन आणि निव्वळ गुंतवणूक यांची बेरीज होय. याचाच अर्थ राष्ट्रीय उत्पादन म्हणजे एकूण उपभोग्य वस्तूंचे उत्पादन व अर्थव्यवस्थेच्या भांडवली साठ्यातील निव्वळ वाढ यांची बेरीज होय. निव्वळ राष्ट्रीय उत्पादन आणि निव्वळ देशांतर्गत उत्पादन यातील संबंध पुढीलप्रमाणे असतो.

निव्वळ राष्ट्रीय उत्पादन = निव्वळ देशांतील उत्पादन + निर्यात - आयात

निव्वळ राष्ट्रीय उत्पादनाची संकल्पना ही वृद्धीच्या अर्थशास्त्राच्या अभ्यासात उपयुक्त आहे. मात्र या संकल्पनेत एक गंभीर स्वरुपाची उणीव आहे व ती म्हणजे निव्वळ राष्ट्रीय उत्पादनाच्या गणनेत संयंत्र इमारत वगैरेच्या घसाऱ्याचे दर ठरविण्याबाबत गुंतागुंतीच्या व अवघड समस्या / निर्माण होतात.

## २.३ घटक खर्चानुसार राष्ट्रीय उत्पन्न आणि बाजार किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न (NATIONAL INCOME OF FACTOR COSTS & MARKET PRICES)

उत्पादन कार्यामध्ये सहभागी होणारे घटक म्हणजे भूमी, श्रम, भांडवल व संयोजक होय. या घटकाना अनुक्रमे खंड, वेतन व्याज व नफा या स्वरुपात मोबदला मिळतो त्याला घटक खर्च असे म्हणतात. या घटकाच्या मोबदल्याची बेरीज केली असता येणारी एकूण रक्कम म्हणजे घटक खर्चानुसार राष्ट्रीय उत्पन्न होय.

munotes.in

एका वर्षाच्या कालावधीत देशात विविध वस्तू व सेवांचे जे उत्पादन झालेले असते त्याला त्याच्या बाजार किंमतीने गुणले असता जो आकडा मिळतो त्याला बाजार किंमतीनुसार स्थूल राष्ट्रीय उत्पन्न म्हणतात. बाजार किंमतीनुसार निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न = स्थुल. राष्ट्रीय उत्पादन - घसारा बेरीज करुन राष्ट्रीय उत्पन्न निश्चित केलेले असेल. तर त्याला घटक खर्चानुसार राष्ट्रीय उत्पन्न म्हणतात. उपभोक्ते विविध वस्तूसाठी बाजारात जी किंमत देतात त्यांची बेरीज करुन राष्ट्रीय उत्पन्न मोजले असेल तर त्याला बाजार किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात. या बाजार किंमतीत उत्पादन कर, विक्री कर, इ. अप्रत्यक्ष कर आणि अन्य आकार समाविष्ट झालेले असतात. बाजारातील किंमतीनुसार मिळालेल्या उत्पन्नातून असे कर सरकारला द्यावे लागतात. म्हणून अप्रत्य कराची रक्कम, निव्वळ राष्ट्रीय उत्पन्नातू?न वजा करावी लागते. तसेच काही वस्तू देशातील नागरिकांना स्वस्त मिळाव्यात या हेतूने सरकार उत्पादकांना अनुदान देते. अशा आर्थिक सहाय्याची रक्कम निव्वळ राष्ट्रीय उत्पन्नात मिळवावी लागते. त्यानंतर जी एकूण रक्कम उत्पादन घटकांना वाटण्यासाठी आणि अशा रक्कमेचे उत्पादन घटकात वाटप केले जाते यालाच घटक खर्चानुसार राष्ट्रीय उत्पादन म्हणतात. घटक खर्चानुसार राष्ट्रीय उत्पन्न = बाजार किंमतीनुसार निव्वळ राष्ट्रीय उत्पादन - अप्रत्यक्ष कर + सरकारी अर्थसहाय्य.

## २.४ राष्ट्रीय उत्पन्न मोजमापाच्या पद्धती (METHODS OF NATIONAL INCOME MEASUREMENT)

राष्ट्रीय उत्पन्नाची संकल्पना अनेक दृष्टीने महत्त्वाची असल्याने राष्ट्रीय उत्पन्नाचे गणना करणे आवश्यक ठरते. राष्ट्रीय उत्पन्न मोजमापाच्या तीन पद्धती आहेत.

i) **उत्पादन पद्धती** - अंतिम वस्तू व सेवांच्या पैशातील मूल्याची बेरीज केली जाते.

ii) **उत्पन्न पद्धती** - सर्व उत्पादन घटकांना मिळणाऱ्या उत्पन्नाची बेरीज केली जाते.

iii) **खर्च पद्धती** - कुंटूबे, व्यवसाय संस्था व सरकार यांचा सर्व खर्च व निव्वळ परकिय गुंतवणूक यांची बेरीज केली जाते.

**i) उत्पादन पद्धती (Production Method)** - या पद्धतीमध्ये दोन उप-पद्धतीचा समावेश होतो.

**A) अंतिम वस्तूचे उत्पादन** - उत्पादन पद्धतीनुसार दुहेरी मोजमापाची समस्या टाळण्यासाठी एका वर्षातील अंतिम वस्तू व सेवांच्या एकूण उत्पादनाचे मूल्य पैशात मोजले जाते. अर्थव्यवस्थेच्या कृषी व व्यापार अथवा सेवा क्षेत्रात तयार झालेल्या सर्व वस्तू आणि सेवांचे केवळ अंतिम मूल्य विचारात घेतल्यास घटक खर्चानुसार स्थूल देशांतर्गत उत्पादन मिळते त्यात काही समायोजन करुन विदेशी स्त्रोतापासूनच उत्पन्न मिळेल.

**B) मूल्य वर्धित पद्धती** - या पद्धतीमध्ये राष्ट्रीय उत्पन्न मोजमापात ज्या वस्तू व सेवांचा समावेश करावयाचा त्या वस्तू व सेवांच्या उत्पादनाच्या प्रक्रिये दरम्यानच्या विविध टप्प्यावरील वाढता जाणाऱ्या मूल्याचे मोजमाप केले जाते. अशाप्रकारे उत्पादन पद्धतीच्या आधारे

अर्थव्यवस्थेतील शेती, उद्योग, व्यापार, वहातूक, दळणवळण अशा विविध क्षेत्रात उत्पादित झालेल्या वस्तू व सेवांची किंमत ठरवून त्या किंमतीही बेरीज केली जाते.

**ii) उत्पन्न पद्धती (Income Method)** - राष्ट्रीय उत्पन्न मोजमापाची ही दुसरी पद्धती असून या पद्धतीनुसार उत्पादनाच्या प्रक्रियेत सहभागी झाल्याबद्दल भूमी, श्रम, भांडवल, संयोजक या सर्व उत्पादन घटकांना मिळणाऱ्या उत्पन्नाची बेरीज म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय. भूमी, श्रम, भांडवल व संयोजक याना अनुक्रमे खंड, वेतन, व्याज आणि नफा मिळतो तो राष्ट्रीय उत्पन्नात मोजतात.

**iii) खर्च पद्धती (Expenditure Method)** - राष्ट्रीय उत्पन्न मोजमापाची ही तिसरी पद्धती असून या पद्धती अंतर्गत अर्थव्यवस्थेतील विविध घटकांनी केलेल्या एकूण खर्चाची बेरीज केली जाते.

**A) वैयक्तिक उपभोग खर्च** - देशातील व्यक्तीने उपभोग्य वस्तू व सेवा विकत घेण्यासाठी केलेला खर्च म्हणजे वैयक्तिक उपभोग खर्च होय.

**B) स्थूल देशांतर्गत खाजगी गुंतवणूक** - उत्पादन कार्यासाठी आवश्यक असणारी येथे खरेदी करण्यासाठी जो खर्च केला जातो त्याचा समावेश स्थूल देशांतर्गत खाजगी गुंतवणूकीत केला जातो.

**C)** वस्तू व सेवांची सरकारकडून होणारी खरेदी सरकारकडून चालु उपभोगासाठी आणि भांडवली कारणासाठी वस्तू व सेवांची खरेदी केली जाते. त्यांचा समावेश यामध्ये केला जातो.

**D) निव्वळ परकिय गुंतवणूक** - देशातील नागरिकांनी आणि परकिय नागरिकांनी देशातील वस्तू व सेवांवर केलेला खर्च यातील फरकास निव्वळ गुंतवणूक खर्च म्हणतात.

अशाप्रकारे निरनिराळ्या पद्धतीच्या आधारे राष्ट्रीय उत्पन्नाची गणना केली जाते. भारतामध्ये राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना उत्पादन पद्धती व उत्पन्न पद्धतीचा अवलंब केला जातो.

## २.५ राष्ट्रीय उत्पन्न मोजमापातील अडचणी (DIFFICULTIES IN MEASUREMENT OF NATIONAL INCOME)

राष्ट्रीय उत्पन्न मोजमापात अनेक प्रकारच्या अडचणी येतात. दोन प्रमुख प्रकारच्या अडचणीचा आपण विचार करणार आहोत.

**A) संकल्पनात्मक अडचणी** - राष्ट्रीय उत्पन्न या संकल्पनेत कोणत्या वस्तू व सेवाचा समावेश करावयाचा आणि कोणत्या उत्पन्नाचा समावेश करावयाचा नाही हे ठरवावे लागते. या संदर्भात ज्या अडचणी निर्माण होतात त्या पुढीलप्रमाणे आहेत.

**१) सेवांचा समावेश -** सेवा उपभोक्त्याच्या गरजा पूर्ण करतात म्हणून त्या सेवा पुरविणाऱ्यांना उत्पन्न दिले जाते. पण कोणत्या सेवांचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करावयाचा असा प्रश्न निर्माण झाल्यास अडचणी निर्माण होतात.

**२) वास्तव उत्पन्न गणना -** किंमतीतील चढ उतारांचा परिणाम नाहीसा केल्याशिवाय वास्तव उत्पन्नातील बदल कळत नाही. यासाठी एखादे वर्ष मूळ वर्ष मानून दर वर्षीच्या प्रत्येक वस्तूच्या उत्पादनाला मूळ वर्षाच्या किंमतीने गुणून हिशोब मांडता येतो. परंतू मूळ वर्षातील वस्तू चालू वर्षात अस्तित्वात नसतील तर त्यांच्या किंमती कशा काढणार हा मोठा प्रश्न निर्माण होतो.

**३) बेकायदेशीर व्यवहार -** काळ्या बाजाराच्या माध्यमातून होणाऱ्या व्यवहारांची नोंद कसा येत नाही. बेकायदेशीर व्यवहारांची नोंद घेतली जात नसल्याने सर्व आर्थिक व्यवस्थाचे मापन करता येत नाही. नोंदणी न करताही खूप मोठ्या प्रमाणात व्यवहार येतात. त्यामुळे अनेक व्यवहाराचे प्रतिबिंब राष्ट्रीय उत्पन्नात पडत नाही. सर्व व्यवहारांचे मापन करता येत नसल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाचे योग्य मापन केले जाण्यात अडचणी येतात.

**४) हस्तांतरित उत्पन्न -** वस्तू आणि सेवा यांची भर न घालता मिळणारे हस्तांतरित उत्पन्न राष्ट्रीय उत्पन्नात मोजावे किंवा नाही असा एक प्रश्न आहे. वस्तू आणि सेवा यांचे उत्पादन होत नाही म्हणून ते वगळावे तर ते खर्चून वस्तू व सेवा खरेदी केल्या जातात या दृष्टीने आर्थिक व्यवहारावर त्या उत्पन्नाचा परिणाम होत असतो.

**५) शासनाच्या सेवा -** सरकारकडून वाहतूक दळणवळण अशा अनेक प्रकारच्या सेवा पुरविल्या जातात. सरकारच्या सेवांचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करावयाच्या की नाही हे ठसविण्याच्या बाबतीत अडचण निर्माण होते. सरकारकडून पुरविण्यात आलेल्या सेवांचा वापर उपभोक्ते व उत्पादक यांच्याकडून केला जातो. सरकारकडून उपभोक्त्यांना मिळणाऱ्या सेवांचा राष्ट्रीय उत्पन्नात समावेश करणे संयुक्तिक ठरते व उत्पादकाकडून वापरल्या जाणाऱ्या सेवा वगळणे योग्य असते. मात्र या सेवा दोन्ही घटकांकडून एकाच वेळी वापरण्यात येत असल्याने कोणत्या वगळाव्यात हे ठरविणे अवघड असते.

**६) तुलनीयता -** राष्ट्रीय उत्पन्नात समाविष्ट होणाऱ्या वस्तू आणि सेवा देशात सारख्या नसतात. देशपरत्वे लोकांच्या गरजाही भिन्न असतात. अशा परिस्थितीत भिन्न देशातील उत्पन्नाची तुलना करणे कठीण असते. एका मर्यादेपर्यंत ही तुलना अर्थपूर्ण ठरते.

**B) सांख्यिकिय अडचणी -**

व्यवहारात राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना पुढील सांख्यिकिय अडचणी निर्माण होतात.

**१) दुहेरी गणना टाळणे -** राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना एका वस्तूची दोनदा गणना होणार नाही याची काळजी घ्यावी लागते. त्यासाठी अंतिम वस्तूची गणना करावी लागते. एकच वस्तू दोनदा मोजल्यास गणना दोषपूर्ण ठरते. दुहेरी गणना टाळून राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करणे अवघड व अडचणीचे असते.

**२) वस्तू विनिमय** - राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना मोठ्या प्रमाणात व्यवहार पैशाच्या स्वरुपात केले जातात. परंतू भारतात आजही शेती क्षेत्रातील व्यवहार वस्तूविनिमय स्वरुपात केले जातात. त्यांची गणना राष्ट्रीय उत्पन्नात करणे अवघड असते.

**३) क्षेत्रवार विभागणी** - राष्ट्रीय उत्पन्नाची गणना क्षेत्रवार केली जाते. परंतू भारताच्या बाबतीत ही गोष्ट अशक्य आहे कारण शेतकरी पावसाळ्यात शेती व्यवसाय करतो तर पावसाळा संपल्यावर छोटा व्यवसाय करतो त्यामुळे त्यांच्या उत्पन्नाची गणना व्यवसायानुसार करण्यात अडचण निर्माण होते.

**४) हिशेब ठेवण्याचे अल्प प्रमाण** - भारतात ग्रामीण भागात निरक्षरता असल्याने हिशोब ठेवण्याचे प्रमाण अल्प असते. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नाची निश्चित गणना करणे अवघड असते.

**५) आकडेवारी उपल्बधतेची अडचण** - आकडेवारीच्या लोकांकडे नोंदी नसतात. लोक निरक्षर असल्याने आवश्यक तो तपशील मिळणे कठीण होते. अनेकवेळा प्राप्ती कर चुकविण्यासाठी खोटे उत्पन्न दाखवितात त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न गणनेत अडचणी येतात.

## २.६ राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचे महत्त्व (IMPORTANCE OF NATIONAL INCOME) :

राष्ट्रीय उत्पन्नाच्या आधारे विशिष्ट कालखंडात अर्थव्यवस्थेत उत्पादित झालेल्या वस्तू व सेवांची गणना केली जाते. या गणनेतून राष्ट्रीय उत्पन्नासंबंधीची जी आकडेवारी मिळते ती अनेकदृष्टीने उपयुक्त ठरते.

१) राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीमुळे विशिष्ट कालखंडातील अर्थव्यवस्थेचे एकूण उत्पादनाची कल्पना येते.

२) अर्थव्यवस्थेच्या आर्थिक वृद्धीची कल्पना येण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाची आकडेवारी महत्त्वाची ठरते.

३) राष्ट्रीय उत्पन्न आकडेवारीमुळे समाजाच्या आर्थिक कल्याणाची व त्यात होणाऱ्या बदलाची माहिती मिळण्यास मदत होते.

४) सरकारला आर्थिक धोरण निश्चितीसाठी राष्ट्रीय उत्पन्न आकडेवारी उपयुक्त ठरते.

५) विविध देशांच्या आर्थिक परिस्थितीची तुलनात्मक स्थिती राष्ट्रीय उत्पन्न आकडेवारीमुळे समजते.

६) राष्ट्रीय उत्पन्न आकडेवारी संशोधकास उपयुक्त ठरते.

७) आर्थिक विषमतेचा अंदाज करता येतो.

अशाप्रकारे राष्ट्रीय उत्पन्नविषयक आकडेवारी विविध दृष्टीने सरकार, अर्थशास्त्राचे अभ्यासक व इतर अनेक घटकांना उपयोगी ठरते त्यामुळेच निरनिराळ्या देशात राष्ट्रीय उत्पन्नाची गणना केली जाते.

## २.७ चालू किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न व स्थिर किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न (NATIONAL PRODUCT AT CURRENT PRICES AND NATIONAL PRODUCT AT CONSTANT PRICES

वस्तू व सेवांच्या चालू किंमती विचारात घेऊन जेव्हा राष्ट्रीय उत्पादनाची गणना केली जाते तेव्हा त्यास चालू किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पादन म्हणतात. स्थिर किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पादन म्हणजे आधारभूत वर्षातील किंमतीच्या आधारे मोजलेले राष्ट्रीय उत्पादन होय. देशातील वस्तू व सेवांच्या किंमतीत सतत बदल होत असतात. वास्तव स्वरुपातील उत्पादनातील वाढ समजण्यासाठी स्थिर किंमतीला राष्ट्रीय उत्पादन मोजले जाते.

चालू किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न मोजले तर त्याला पैशातील उत्पन्न किंवा मौद्रिक उत्पन्न म्हणतात. राष्ट्रीय उत्पन्न पायाभूत वर्षातील किंवा स्थिर किंमतीनुसार मोजले तर त्याला वास्तव उत्पन्नक असे म्हणतात.

उदा. २०१३ मध्ये तांदळाचे उत्पादन १००० क्विंटल होते आणि २०१६ मध्ये तांदळाचे उत्पादन ११०० क्विंटल होते. याच काळात तांदळाची किंमत १०,००० क्विंटल वरुन २०,००० रुपये क्विंटल एवढी झाली असे गृहित धरले तर २०१३ मध्ये चालू किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पादन मोजले तर $(1000 \times 10,000) 10,00,00,000$ एवढे होते तर २०१६ मध्ये $(1100 \times 20,000) 2,20,00,000$ रुपये एवढे होते. तांदळाचे उत्पादन १०० क्विंटल वाढले म्हणजे १०% नी वाढलेले आहे. स्थिर किंमतीला राष्ट्रीय उत्पादन मोजले असता वास्तव स्वरुपातील वाढ समजते २०१३ च्या किंमतीनुसार २०१६ मध्ये तांदळाचे उत्पादन ११,००,००० रुपये होते

**स्थूल देशांतर्गत उत्पन्न संकोचक GDP Deflator :**

मौद्रिक स्थूल देशांतर्गत उत्पन्न म्हणजे चालू किंमतीनुसार काढलेले उत्पन्न होय. वास्तव स्थूल देशांतर्गत उत्पन्न म्हणजे स्थिर किंमतीनुसार काढलेले उत्पन्न होय.

मौद्रिक स्थुल देशांतर्गत उत्पन्न आणि वास्तव स्थूल देशांतर्गत उत्पन्न यांच्या सहाय्याने आपणाला स्थूल देशांतर्गत उत्पन्न संकोचक काढता येते.

स्थूल देशांतर्गत उत्पन्न संकोचक म्हणजे मौद्रिक स्थुल देशांतर्गत उत्पन्नाचे वास्तव स्थूल देशांतर्गत उत्पन्नाशी असलेले गुणोत्तर होय.

$$\text{स्थूल देशांतर्गत उत्पन्न संकोचक} = \frac{\text{मौद्रिक स्थुल देशांतर्गत उत्पन्न}}{\text{वास्तव स्थूल देशांतर्गत उत्पन्न}}$$

$$\text{GDP Deflator} = \frac{\text{Nominal GDP}}{\text{Real GDP}}$$

munotes.in

मौद्रिक स्थूल देशांतर्गत उत्पन्न (Nominal GDP) = $P_X$ x $Q_X$

$P_X$ = X वस्तूची किंमत

$Q_X$ = X वस्तूचे परिमाण

वास्तव स्थूल देशांतर्गत उत्पन्न (Real GDP) = $P_X$ base X $Q_X$

$P_X$ = मूळ वर्षातील X वस्तूची किंमती

$Q_X$ = मूळ वर्षातील X वस्तूचे परिमाण

देशातील एखाद्या वर्षाचा नॉमिनल जीडीपी त्या वर्षाच्या किंमतीचा वापर करुन काढला जातो तर एखाद्या मुळ वर्षाच्या किंमतीचा उपयोग करुन त्या वर्षाचा जीडीपी काढला जातो.

### २.७.१ चालू किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न व स्थिर किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न (National Income at Current Prices and Constant Prices) :

राष्ट्रीय उत्पन्न हे पैशात मोजले जाते. त्यासाठी त्या वर्षातील उत्पादन झालेल्या वस्तू आणि सेवांना त्यांच्या किंमतीने गुणले जाते. जेव्हा एखाद्या वर्षातील उत्पादन झालेल्या वस्तू आणि सेवांना त्यांच्या चालू किंमतीने गुणले असता जो एकूण आकडा मिळतो त्याला चालू किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न म्हणतात. राष्ट्रीय उत्पन्न हे पैशात मोजले जाते. परंतू वस्तू आणि सेवांच्या किंमतीत बदल झाल्याने पैशाचे मूल्य बदलते. त्यामुळे एखाद्या वर्षातील आणि दूसऱ्या वर्षातील वास्तव उत्पादन सारखेच असूनही राष्ट्रीय उत्पन्नात बदल होतो. अशावेळी निरनिराळ्या वर्षातील राष्ट्रीय उत्पन्नाची तुलना करणे कठीण होते. यासाठी राष्ट्रातील वस्तू व सेवांचे मापन एखाद्या पायाभूत वर्षातील राष्ट्रीय उत्पन्नाची तुलना करणे कठीण होते. यासाठी राष्ट्रातील वस्तू व सेवांचे मापन एखाद्या पायाभूत वर्षातील किंमतीनुसार केले जाते. सर्वसाधारणपणे ज्या वर्षात किंमती स्थिर असतात त्या वर्षाची मूळ वर्ष म्हणून गणना केली जाते. आणि पायाभूत वर्षातल किंमतीनुसार चालू उत्पन्नाचे पैशात मापन केले जात असेल तर त्याला स्थिर किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न म्हणतात.

## २.८ चलनाच्या खरेदीशक्ती समता विनिमय दराला स्थूल देशांतर्गत उत्पन्न (GROSS DOMESTIC PRODUCT AT PURCHASING POWER PARITY - PPP)

वेगवेगळ्या देशातील आर्थिक प्रगतीची तुलना त्या संबंधीत देशातील स्थूल देशांतर्गत उत्पन्नाच्या आधारे करता येते. त्यासाठी वर्तमान विनिमय दराला किंवा खरेदी शक्ती समता आधारीत विनिमय दराला स्थूल देशांतर्गत उत्पन्नाचे मूल्य विचारात घेतले जाते.

विनिमय दर हा आपल्या देशाच्या चलनाचे बर्हिगत मूल्य दर्शवित असतो. एका देशाच्या चलनाचे दुसऱ्या देशाच्या चलनाच्या माध्यमातील खरेदी शक्ती विनिमय दराच्या माध्यमातून दर्शविली जाते. आपण विनिमय दर सांगतो त्यावेळी एका डॉलरची भारतीय रुपयातील किंमत \$1 = Rs. 60 असा सांगतो. भारतातील रुपयामध्ये व्यक्त केलेले स्थूल देशांतर्गत उत्पन्न आपण अमेरीकन डॉलरमध्ये रुपांतरित करु शकतो.

munotes.in

**खरेदी शक्ती समता विनिमय दर :**

सुवर्ण परिणामाच्या अपयशानंतर गुस्ताव कॅसल यांनी १९१८ मध्ये क्रयशक्ती समता सिद्धांत मांडला. या सिद्धांतानुसार बदलत्या विनिमयदर व्यवस्थेत दिर्घकाळात दोन देशांच्या चलनांच्या क्रयशक्तीनुसार विनिमय दर निश्चित होईल. परकिय चलनात समाविष्ट असणाऱ्या क्रयशक्तीमुळेच त्यांची मागणी होत असते. जेव्हा एखाद्या देशाच्या चलनाला मागणी होते. तेव्हा त्या चलनाच्या क्रयशक्तीलाच मागणी होत असते. थोडक्यात चलनाच्या विनिमय दर म्हणजेच दोन भिन्न चलनाच्या क्रयशक्तीचा विनिमय दर होय. या सिद्धांतानुसार ज्या पातळीला देशी चलनाची क्रयशक्ती एवढी होईल त्या पातळीला समतोल विनिमय दर निश्चित होईल.

उदा. एक इलेक्ट्रिक सामानाचा संच खरेदी करण्यासाठी अमेरिकेमध्ये १० डॉलर लागतात आणि त्याच सामानाच्या संचासाठी भारतात ६०० रुपये लागतात तर विनिमय दर भारतातील रुपये व अमेरिका डॉलर यातील विनिमय दर $1 = 600 रुपये असा होईल.

देशातील चलनाचे मूल्य वर्तमान विनिमय दराला किंवा खरेदी शक्ती समता विनिमय दराला रुपांतरित करुन दोन देशातील उत्पन्नाची तुलना करता येते. विदेशी विनिमय बाजारपेठेत असणारा विनिमय दर म्हणजे वर्तमान चलन विनिमय दर होय. खरेदी शक्ती समता विनिमय दर म्हणजे निवडलेला प्रमाणित चलनाच्या सामान्यतः अमेरीकन डॉलरच्या संदर्भात तुलनात्मक खरेदी शक्ती समता दर्शविणारा विनिमय दर होय.

**चलनाच्या खरेदीशक्ती समानतेनुसार स्थूल राष्ट्रीय उत्पन्न :**

विशिष्ट देशांच्या अर्थव्यवस्थेचा विकास हा चलनाच्या खरेदीशक्ती समानतेनुसार मोजल्यास देशाच्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाची कल्पना येते. याचे प्रमुख कारण म्हणजे एकाच वस्तूचे विविध चलनामध्ये मूल्य सातत्याने बदलत जाणारे असते. यामध्ये समानता आणणे आवश्यक आहे. म्हणून स्थूल राष्ट्रीय उत्पन्न चलनाच्या क्रयशक्ती समानतेनुसार मोजले जाते. चलनाची क्रयशक्ती समानता म्हणजे त्या राष्ट्राच्या एकक चलनामध्ये राष्ट्रांतर्गत बाजारपेठेत होऊ शकणारी वस्तू व सेवाची खरेदी होय. तसेच त्याच वस्तू व सेवा संयुक्त संस्थांनमधील बाजारपेठेत खरेदी करण्याकरिता खर्च होणारे चलन होय. यातून स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातील वास्तव वाढ अथवा घट व आंतरराष्ट्रीय स्तरावर होणारी वाढ व घट स्पष्ट होते. कल्याण आणि रहाणीमानाची तुलना करण्यासाठी किंवा वेगवेगळ्या देशातील साधनांच्या वापराची तुलना करण्यासाठी या मोजमापाला अनेक अर्थतंज्ञ पसंती दर्शवितात.

**चलनाच्या खरेदीशक्ती संकल्पनेचे उपयोग :**

१) चलनाच्या खरेदीशक्तीच्या उपयोग दोन देशातील किंमत निर्देशकांची तुलना करण्यासाठी होतो.

२) चलनाच्या खरेदीशक्तीचा उपयोग हा वास्तव राष्ट्रीय उत्पन्न बाजार किंमतीस मोजण्यासाठी केला जातो.

३) चलनाच्या खरेदीशक्तीमुळे राष्ट्रीय उत्पन्नाची वास्तव स्थिती समजते.

४) राष्ट्रीय उत्पन्नाचे आकारमान व वृद्धी निश्चित करण्यासाठी चलनाच्या खरेदीशक्ती संकल्पनेचा उपयोग होतो.

५) चलनाच्या खरेदीशक्ती समानतेमुळे स्थूल राष्ट्रीय उत्पन्न मोजताना किंमत व महागाई निर्देशांक निश्चित करणे सोपे जाते.

६) स्थूल उत्पन्न आंतरराष्ट्रीय चलनामध्ये मोजण्याकरिता चलनाच्या खरेदीशक्ती समानतेची मदत होते.

**आपली प्रगती तपासा.**

१) चलनाच्या खरेदीशक्ती समानतेनुसार स्थूल राष्ट्रीय उत्पन्न यावर टीप लिहा.

---

---

---

---

---

## २.९ किंमत निर्देशांक म्हणून विनिमय दर (EXCHANGE RATE AS PRICE INDEX)

आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रात विनिमय दर या संकल्पनेस बरेच महत्त्व आहे. दोन देशामध्ये होणारे आंतरराष्ट्रीय व्यवहार ज्यात विदेशी व्यापार व वित्त यांचा समावेश होतो ते व्यवहार सुरळीतपणे पार पाडण्यासाठी दोन देशाच्या दोन भिन्न चलनामध्ये विशिष्ट विनिमय दर असणे आवश्यक ठरते. विविध अर्थशास्त्रज्ञांनी विनिमयदर या संकल्पनेच्या व्याख्या देण्याचा प्रयत्न केला आहे. साधारणतः ज्या दराने दोन देशांच्या चलनाचा विनिमय होतो. त्याला विनिमयदर म्हणतात. एका देशाच्या चलनाचे दुसऱ्या एका देशाच्या किंवा अनेक देशांच्या चलनात व्यक्त केलेले मूल्य म्हणजे विनिमय दर होय.

### १) किंमत म्हणून विनिमय दर :

विनिमय दर हा प्रामुख्याने कोणत्याही राष्ट्राच्या चलनाची आंतरराष्ट्रीय चलनाशी असणारी परिवर्तनीयता दर्शवितो. विनिमयदरात होणाऱ्या बदलाचा परिणाम देशाच्या आयात-निर्यातीवर होतो. जर विनिमय दरात वाढ झाली तर आयाती करता आपल्या देशाला जास्त स्वदेशी चलन मोजावे लागते. यामुळे निर्यात घटते. आणि आयात महाग होते. याउलट जर विनिमय दरात घट झाली तर विदेशी चलनाच्या बदल्यात आयात व निर्यात स्वस्त होतात. याउलट जर परकिय चलनाच्या तुलनेत स्वदेशी चलनाचे मूल्य कमी झाले तर देशाच्या बाजारपेठेमध्ये आयात केलेल्या वस्तूंच्या किंमतीमध्ये वृद्धी घडून येते. तसेच विदेशी बाजारपेठेत देशी वस्तूच्या किंमती कमी झाल्याने त्यांची मागणी वाढते व त्यातून निर्यात वृद्धीस चालना मिळते. थोडक्यात देशी बाजारपेठेतील वस्तूंच्या किंमती या विनिमयदराशी थेटपणे संबंधित असतात.

### २) वाजवी विनिमय दर (Nominal Exchange Rate) :

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये आंतरराष्ट्रीय चलनाच्या स्वरुपात खरेदी व विक्री करण्याकरिता देशी चलन आंतरराष्ट्रीय चलनाच्या स्वरुपात बदलावे लागते. या चलनाच्या परावर्तीत होण्याच्या दरालाच विनिमय दर असे म्हणतात.

ज्या विनिमय दरास व्यक्ति देशी चलन आंतरराष्ट्रीय चलनामध्ये बदलू शकते अशा विनिमय दराला नॉमिनल / वाजवी विनिमय दर म्हणतात. थोडक्यात वाजवी विनिमय दर म्हणजे एका देशाच्या बदल्यात दुसऱ्या देशाचे चलन घेता येते.

उदाहरण - विनिमय दर = ४० रुपये = १ डॉलर
वाजवी विनिमय दर निर्देशांक = १०० रुपये
भारताचा किंमत निर्देशांक =१००

$$\therefore \text{वाजवी विनिमय दर} = \frac{\text{वाजवी विनिमय दर निर्देशांक} \times \text{भारताचा किंमत निर्देशांक}}{100}$$

$$= \frac{100 \times 100}{100}$$

$$= 100$$

जर वाजवी विनिमय दरातील विनिमय दर ५० रुपये झालातर वाजवी दर निर्देशांक १२५ रुपये होतो. समजा भारताच्या किंमतीस १२० पर्यंत बदल झाला आणि U.S.A.च्या किंमत निर्देशांकात काहीच बदल झाला नाही तर वास्तव दर पुढीलप्रमाणे

$$Sr = \frac{125 \times 120}{100}$$

$$Sr = 150$$

**वास्तव विनिमय दर (Real Exchange Rate) :**

एखाद्या राष्ट्रातील उत्पादित झालेल्या वस्तू व सेवांच्या बदल्यात इतर राष्ट्रातील किती वस्तू व सेवा घेता येऊ शकतील यास वास्तव विनिमय दर म्हणतात. वास्तव विनिमय दर हा वस्तू व सेवा यांच्या अदलाबदलीवर अवलंबून असतो. वास्तव विनिमय दर हा राष्ट्राच्या आयात व निर्यातीचे वास्तव रुप व एकूण आकारमान समजण्यास उपयुक्त ठरतो. वास्तव विनिमय दर हा तुलनात्मक किंमतीसोबत समायोजित केला जातो. सर्वसाधारणपणे वास्तव विनिमय दर हा निर्देशांकाच्या स्वरुपात दर्शविता येतो.

$$Sr = \frac{SP}{P^*}$$

Sr = वास्तव विनिमय दर
S = विनिमय दर
P = देशीय किंमत पातळी
P* = परकिय किंमत पातळी

वास्तव विनिमय दरात वाढ झाल्यास देशाची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील निर्यात वाढते कारण त्या देशाच्या वस्तू व सेवाची किंमत कमी झाल्याने मागणी वाढते.

थोडक्यात वरील संज्ञावरुन असे लक्षात येते कि देशी चलन विदेशी चलनाच्या तुलनेत किती प्रमाणात परिवर्तनीय करता येते यावरुन विनिमय दराचे प्रमुख प्रकार केले जातात. तसेच विनिमय दरावरुन अर्थव्यवस्थेमध्ये वस्तूची बाजार किंमत निश्चित करण्यासाठी देखील उपयोग केला जातो. यामुळेच विनिमय दरास राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेमध्ये महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे.

## २.१० स्थूल देशांतर्गत उत्पन्नाची वाढ (GDP Growth)

देशाच्या आर्थिक विकासासाठी स्थूल देशांतर्गत उत्पन्नात वाढ घडून येणे आवश्यक असते. विकसित देशात स्थूल देशांतर्गत उत्पादनातील वाढीचा दर जास्त असतो म्हणून या देशात रहाणीमानाचा दर्जा उच्च असतो. या उलट विकसनशील देशात स्थूल देशांतर्गत उत्पादनातील वाढीचा दर कमी असतो म्हणून त्याचा रहाणीमानाचा दर्जा कमी असतो.

दुसऱ्या महायुद्धानंतर स्थूल देशांतर्गत उत्पादन या संकल्पनेस अधिक महत्त्व प्राप्त झाले. स्वातंत्र्याच्या काळात भारत हा गरीब देश होता. देशाला आर्थिक स्वयंपूर्णता प्राप्त झाल्याशिवाय राजकीय स्वातंत्र्याला काहीच अर्थ नाही याची जाणीव राज्यकर्त्यांना झाली आणि म्हणून जलद आर्थिक विकास साध्य करण्यासाठी पंचवार्षिक योजनांना सुरुवात झाली आणि नंतर मात्र भारताच्या बाबतीत स्थूल देशांतर्गत उत्पादन वाढत असल्याचे आढळून आले.

**GDP च्या आधारे भारताचा आर्थिक विकास :**

**१) १९४७ ते १९७५ चा कालखंड :**

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर कृषी आणि औद्योगिक क्षेत्रात सुधारणा झाल्यामुळे GDP मध्ये वाढ झाली. १९५१-५२ मध्ये GDP चा वृद्धी दर ६.४% होता. १९६० च्या दशकात दोन युद्धे नैसर्गिक आपत्ती यामुळे १९६०-६१ मध्ये GDP चा वृद्धी दर ५.८% होता. पण नंतर बदललेल्या कृषी व औद्योगिक धोरणामुळे GDP चा वृद्धी दर १९७०-७१ मध्ये ६.८% झाला.

**२) १९७५ ते १९९१ चा कालखंड :**

१९७५ नंतर कृषी व औद्योगिक क्षेत्राच्या विकासास सुरुवात झाली. औद्योगिक क्षेत्रास विशेष सोयी-सुविधा व सवलती देण्यात आल्या. त्याचप्रमाणे शेती क्षेत्राकडे विशेष लक्ष देण्यात आले. त्यामुळे भारताने अन्नधान्याच्या उत्पादनात स्वयंपूर्णता साध्य केली. त्यामुळे १९८०-८१ मध्ये भारताच्या जीडीपी चा दर १९.१% पर्यंत वाढला.

**३) १९९१ ते २०१६ चा कालखंड :**

१९९१ नंतर भारत सरकारने नवे आर्थिक धोरण स्विकारण्यास सुरुवात केली. खाजगीकरण, उदारीकरणाच्या धोरणामुळे भारतात परकिय गुंतवणूक वाढवण्यास सुरुवात झाली. त्यामुळे रोजगार वाढ होऊन उत्पन्नात वाढ झाली. १९९१ नंतर वेगवेगळ्या क्षेत्रातील उदारीकरणाच्या धोरणाचा परिणाम म्हणून वृद्धी दरात वाढ झाल्याचे दिसून येते. १९९०-९१ मध्ये GDD चा वृद्धी दर १६.६% होतो. तो २०१०-११ मध्ये १९.६% झाला तर २०११-१२ मध्ये १६.०% झाला.

वरील विवेचनावरुन असे लक्षात येते की स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय GDP च्या दरात सातत्याने चढ-उतार झाले. भारतात GDP चा दर वाढत आहे पण लोकसंख्या वाढीचा दर उच्च असल्यामुले एकूण जीडीपी वृद्धीचा दर अल्प ठरतो. असे असले तरी स्थुल देशांतर्गत उत्पन्न (GDP) वाढीच्या दराबाबत अमेरीका व चीन नंतर आपण तिसऱ्या क्रमांकावर आहोत.

**आपली प्रगती तपासा.**

१) GDP, GNP, NNP या संकल्पना स्पष्ट करा.
२) टिप लिहा GDP च्या आधारे आर्थिक विकास.

**स्थूल देशांतर्गत उत्पन्नाची क्षेत्रीय रचना (Sectoral Composition of GDP) :**

जगातील राष्ट्राची वर्गवारी विकसित, अविकसित व विकसनशील देश अशी केली जाते. एखाद्या देशाची वर्गवारी त्या देशाच्या राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्नावर अवलंबून असते. राष्ट्रीय उत्पन्न मोजताना व्यवसायानुसार राष्ट्रीय उत्पन्नाची तीन क्षेत्रामध्ये विभागणी केली जाते. ही तीन क्षेत्रे म्हणजे प्राथमिक क्षेत्र, दुय्यम क्षेत्र व सेवा क्षेत्र होय.

**१) प्राथमिक क्षेत्र :** अर्थव्यवस्थेच्या प्राथमिक क्षेत्रात खाणकाम उद्योग, जंगलकाम, यांचा समावेश होतो. अर्थव्यवस्थेतील हे क्षेत्र प्रामुख्याने निर्सगाशी संबंधित असते. त्यामुळे या क्षेत्राला प्राथमिक क्षेत्र असे म्हणतात. प्राथमिक क्षेत्रातून उत्पादित होणाऱ्या वस्तूंचे एकूण बाजारमूल्य हे इतर उत्पादनाच्या तुलनेत अत्यंल्प असते. याच कारणास्तव प्राथमिक क्षेत्रामध्ये कृषी व्यवसाय, मत्स्य व्यवसाय, खाणकाम, जंगलामधून मध, डिंक गोळा करणे यासारख्या आर्थिक क्रियांचा समावेश होतो. भारताच्या एकूण स्थूल देशांतर्गत उत्पादनात प्राथमिक क्षेत्राचा वाटा १२% हून कमी आहे.

**२) द्वितीय क्षेत्र :** प्राथमिक क्षेत्रातून उत्पादित होणाऱ्या उत्पादनावर आधारित प्रक्रियावरील उद्योगाचा समावेश हा द्वितीय क्षेत्रामध्ये होतो. अर्थव्यवस्थेच्या दुय्यम क्षेत्रात लघुउद्योग, मोठे उद्योग, वीजनिर्मिती, बांधकाम, पाणीपुरवठा, गॅस पुरवठा इत्यादी क्षेत्राचा समावेश होतो. प्राथमिक क्षेत्रा खालोखाल द्वितीय क्षेत्रामध्ये सर्वाधिक मनुष्यबळ कार्यरत आहे. म्हणूनच या क्षेत्रात कार्यरत व्यक्तीची उत्पन्न पातळी प्राथमिक क्षेत्रापेक्षा जास्त आहे. भारताचा स्थूल देशांतर्गत उत्पादनातील हिस्सा स्वातंत्र्यानंतर घटत गेला. सध्या स्थूल देशांतर्गत उत्पादनात द्वितीय क्षेत्राचा हिस्सा हा २८% च्या आसपास आहे.

**३) तृतीय क्षेत्र :** तृतीय क्षेत्रात विविध क्षेत्रातील सेवांचा समावेश होतो. उदा. वाहतूक, दळणवळण, विपणन साठवणूक, विमा, रेल्वे वाहतूक, जहाज वाहतूक, विमान वाहतूक, डॉक्टर, वकील, शिक्षक, सी.ए., व्यापारी इ. क्षेत्राचा समावेश होतो. तृतीय क्षेत्राद्वारे प्रामुख्याने केवळ सेवा उत्पादित होऊन त्या पुरविल्या जातात. परंतू या सर्व सेवांचे एकूण बाजारमूल्य हे इतर वस्तूपेक्षा अधिक असते. १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणानंतर या क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. आणि त्यामुळे जीडीपी मधील तृतीय क्षेत्राचा हिस्सा सातत्याने वाढत आहे. तृतीय क्षेत्राचा स्थूल देशांतर्गत उत्पादनातील हिस्सा हा सुमारे ६०% इतका झाला आहे.

munotes.in

प्राथमिक, द्वितीय व तृतीय क्षेत्राचा विचार करता प्राथमिक क्षेत्राचा स्थूल देशांतर्गत उत्पन्नातील हिस्सा सातत्याने कमी होत आहे. यासाठी कृषी क्षेत्रातील वृद्धी दर टिकवून ठेवण्यासाठी कृषी क्षेत्राची कार्यक्षमता वाढविणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे कृषी क्षेत्रात संशोधन आणि कुशलता विकास यांची देखील गरज आहे. द्वितीय क्षेत्राचा हिस्सा वाढत असला तरी वाढीचा दर कमी आहे. म्हणजेच या क्षेत्राच्या पुर्ण क्षमतेचा अजून वापर होत नाही. औद्योगिक क्षेत्र आंतरराष्ट्रीय व्यापार आणि जलद तांत्रिक बदलासाठी खुले झाले आहे. या क्षेत्राला नवप्रवर्तन आणि स्पर्धाक्षम करण्याची गरज आहे. तृतीय क्षेत्राचा विचार करता आर्थिक वाढीच्या प्रक्रियेत सार्वजनिक प्रशासन सेवा विशेषतः शैक्षणिक सेवा, आरोग्य सेवा आणि कुटुंबकल्याण सेवांमध्ये अतिवेगाने वाढ झाली. सेवा क्षेत्रातील जलद वाढीमुळे भारतीय अर्थव्यवस्था जागतिक आर्थिक अरिष्टाच्या काळात सक्षम राहिली आहे.

## २.११ समारोप (CONCLUSION)

अर्थव्यवस्थेतील खरेदी विक्रीच्या व्यवहारात दोन प्रवाह महत्त्वाचे असतात ते म्हणजे वास्तव प्रवाह आणि मौद्रिक प्रवाह होय. बंदिस्थ अर्थव्यवस्थेचे इतर देशाशी कोणतेही संबंध नसतात. या अर्थव्यवस्थेचा अभ्यास द्विक्षेत्रीय प्रतिमान आणि त्रिक्षेत्रीय प्रतिमान यांच्या आधारे करता येतो आणि खुल्या अर्थव्यवस्थेच्या संदर्भात चतु:क्षेत्रीय प्रतिमान महत्त्वाचे ठरते.

राष्ट्रीय उत्पन्नाच्या संदर्भात स्थुल देशांतर्गत उत्पन्न निव्वळ राष्ट्रीय उत्पादन या संकल्पना महत्त्वाच्या ठरतात. स्थूल देशांतर्गत उत्पन्नात वाढ झाली असता अर्थव्यवस्थेचा विकास होतो. अर्थव्यवस्थेचे विभाजन प्राथमिक क्षेत्र, द्वितीय क्षेत्र आणि तृतीय क्षेत्रात केले जाते. प्रस्तुत प्रकरणात वरील सर्व घटकांचा अभ्यास सविस्तरपणे केला आहे.

## २.१२ सरावासाठी प्रश्न (QUESTIONS)

१) GDP व GNP मधील फरक सांगा.
२) GDP, GNP आणि NNP या संकल्पना स्पष्ट करा.
३) स्थूल देशांतर्गत उत्पादनाची व्याख्या द्या आणि विविध घटक स्पष्ट करा.
४) स्थूल देशांतर्गत उत्पन्नाची क्षेत्रीय रचना स्पष्ट करा.
५) भारतातील आर्थिक वाढीच्या प्रवृत्तीची चर्चा करा.
६) टीपा लिहा.
   १) चालु क्रयशक्ती समता दराला स्थूल देशांतर्गत उत्पन्न
   २) भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पन्नाच्या क्षेत्रीय रचनेतील बदल
   ३) राष्ट्रीय उत्पन्न आकडेवारीचे महत्त्व
   ४) राष्ट्रीय उत्पन्न मोजमापाच्या पद्धती

❖❖❖❖

munotes.in

मॉड्यूल २

# घटक -३

## उपभोग फलन
## (CONSUMPTION FUNCTION)

**घटक रचना :**

३.० उद्दिष्ट्ये
३.१ प्रस्तावना
३.२ खुल्या अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्नाची ओळख
३.३ केन्सचे उपभोग फलन
३.४ सरासरी व सिमान्त उपभोग प्रवृत्तीमधील संबंध
३.५ उपभोग फलनावर परिणाम करणारे घटक
३.६ उपभोग फलनाचे महत्त्व
३.७ सारांश
३.८ सरावासाठी प्रश्न

## ३.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

- खुल्या अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्नाची ओळख करुन घेणे.
- केन्सची उपभोग फलनाची संकल्पना अभ्यासणे.
- उपभोग फलनाचे महत्त्व समजावून घेणे.

## ३.२ प्रस्तावना (INTRODUCTION)

उपभोग फलन ही संकल्पना उत्पन्न व उपभोग यामधील संबंध स्पष्ट करते. केन्सने उपभोग फलनाचा अभ्यास करताना उपभोग फलनावर व्यक्तिनिष्ठ व वस्तूनिष्ठ घटकांचा प्रभाव पडतो, असे स्पष्ट केले आहे. प्रस्तुत प्रकरणात आपण खुल्या अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्नाची ओळख, उपभोग फलन अर्थ, सरासरी व सिमान्त उपभोग प्रवृत्तीमधील सबंध, उपभोग फलनावर परिणाम करणारे घटक, उपभोग फलनाचे महत्त्व यांचा अभ्यास करणार आहोत.

munotes.in

## ३.३ खुल्या अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्नाची ओळख (NATIONAL INCOME IDENTITY IN AN OPEN ECONOMY)

समग्र अर्थशास्त्राच्या अभ्यासात काही महत्त्वाच्या संकल्पना अभ्यासणे आवश्यक ठरते. आणि या संकल्पनेतील महत्त्वाची संकल्पना म्हणजे खुल्या अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्न होय.

राष्ट्रीय उत्पन्न ही अर्थशास्त्रातील एक महत्त्वाची संकल्पना आहे. राष्ट्रीय उत्पन्न हे एक प्रकारे एका देशाच्या समग्र आर्थिक घडामोडीचा आलेख आहे असे म्हणता येईल. अर्थव्यवस्थेच्या कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रात अनेक प्रकारच्या वस्तू व सेवांचे सतत उत्पादन होत असते अशा उत्पादनाचे पैशाच्या माध्यमातून जे मूल्य व्यक्त केले जाते त्याला राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात.

एका वर्षाच्या कालावधीत अर्थव्यवस्थेत निर्माण झालेल्या सर्व अंतिम वस्तू व सेवांचे बाजारमूल्य म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय.

**बंदिस्थ अर्थव्यवस्थेतील - स्थूल देशांतर्गत उत्पादन (GDP) :**

एका आर्थिक वर्षात देशाच्या भौगोलिक सिमाच्यामध्ये तयार झालेल्या सर्व अंतिम वस्तू व सेवांचे पैशांतील मूल्य म्हणजे स्थूल देशांतर्गत उत्पादन होय. यामध्ये विदेशी स्त्रोतापासून प्राप्त झालेल्या उत्पन्नाचा समावेश होत नाही. सूत्र रुपाने स्थूल देशांतर्गत उत्पादन पुढीलप्रमाणे मांडले जाते.

**१) बंदिस्थ अर्थव्यवस्थेसाठी :**

GDP = C + I + G

GDP = स्थूल देशांतर्गत उत्पादन

C = उपभोग्य वस्तू खर्च

I = भांडवली वस्तू खर्च

G = शासकिय खर्च

**खुल्या अर्थव्यवस्थेतील स्थूल देशांतर्गत उत्पादन :**

खुली अर्थव्यवस्था म्हणजे अशी अर्थव्यवस्था की, ज्या अर्थव्यवस्थेचे जगातील इतर देशाशी व्यापारी संबंध असतात. वस्तू आणि सेवांची आयात निर्यात, विदेशी गुंतवणूक, विदेशी कर्जे इत्यादीचा समावेश होतो. वस्तू व सेवाची निर्यात, विदेशी गुंतवणूक, विदेशी कर्ज यामुळे विदेशातील अर्थव्यवस्थेत चलन प्रवाह येतो. याप्रमाणे आयात, विदेशी गुंतवणूक, विदेशी राष्ट्राना दिलेली कर्जे यामुळे चलनप्रवाह देशाबाहेर जातो. मुक्त अर्थव्यवस्थेत खर्च उत्पादनाबरोबर असतोच असे नाही. तसेच बचत गुंतवणूक समान असण्याची सुद्धा गरज नाही.

**खुल्या अर्थव्यवस्थेसाठी स्थूल देशांतर्गत उत्पादन :**

GDP = C + I + G (X - M)

GDP = स्थूल देशांतर्गत उत्पादन

C = उपभोग खर्च

I = गुंतवणूक खर्च

G = शासकिय खर्च
X = निर्यात
M = आयात
(X - M) = निव्वळ निर्यात

वरील सूत्रातील किंमतीवरुन राष्ट्रीय उत्पन्नाची खुल्या अर्थव्यवस्थेतील खरी ओळख समोर येते.

## ३.४ केन्सचे उपभोग फलन (KEYNESIAN CONSUMPTION FUNCTION)

उपभोग फलन ही संकल्पना केन्सने प्रथम मांडली. केन्सने असे प्रतिपादन केले आहे की, उपभोगखर्चाचा उत्पन्नाशी जो संबंध असतो त्याला उपभोग प्रवत्ती असे म्हणतात. उपभोग फलन ही संकल्पना उत्पन्न व उपभोग यामधील सबंध स्पष्ट करते. केन्सने उपभोग फलनासंबंधी विवेचन करताना उपभोगासंबंधीचा मानसशास्त्रीय नियम स्पष्ट केला आहे. उपभोग फलन हे उत्पन्न व उपभोग यातील सबंध स्पष्ट करते.

C = f (Y)
C = उपभोग
f = फलन
y = उत्पन्न

**उपभोग फलनाचे कोष्टक :**

उपभोग फलन म्हणजे उपभोक्त्याची वेगवेगळ्या उत्पन्नास असणारी उपभोग्य वस्तूची मागणी होय. उपभोग फलनाचे कोष्टक उत्पन्न व उपभोग यामधील फलनात्मक संबंध दर्शविते.


**उपभोग फलनाचे कोष्टक (कोटी रुपये)**

| उत्पन्न | उपभोग | बचत |
|---|---|---|
| ०० | ५० | -५० |
| १०० | १०० | ०० |
| २०० | १९० | १० |
| २५० | २३० | २० |
| ३०० | २७० | ३० |
| ३५० | ३१० | ४० |

वरील उपभोग फलन कोष्टकात विविध उत्पन्न पातळीस असणारा उपभोग दर्शविला आहे. उत्पन्न शून्य असताना उपभोग ५० कोटी रुपये इतका आहे कारण उपभोक्ता उत्पन्न नसले तरी उपभोग खर्च करतोच. अशावेळेस उपभोग कर्जातून किंवा पूर्वीच्या बचतीतून केला जातो. त्यानंतर उत्पन्न १०० कोटी असताना बचत सुद्धा १०० कोटी रुपये आहे. २०० कोटी रुपये उत्पन्न असताना उपभोग १९० कोटी रुपये आहे तर ३५० कोटी रुपये उत्पन्न असताना

munotes.in

उपभोग ३१० कोटी रुपये आहे. उत्पन्नात वाढ होत असताना उपभोगात वाढ होत जाते. परंतू उत्पन्नातील वाढीपेक्षा उपभोगातील वाढ कमी आहे. वाढत्या उत्पन्नातून काही भागाचा उपभोग न घेता व्यक्ती त्या रक्कमेची बचत करते. थोडक्यात उत्पन्न वाढत असताना बचत वाढत असल्यामुळे ज्या प्रमाणात उत्पन्न वाढते त्या प्रमाणात उपभोग खर्च वाढत नाही हे पुढील आकृतीच्या सहाय्याने स्पष्ट करता येईल.




**आकृती ३.१**

वरील आकृतीत OX अक्षावर उत्पन्न आणि OY अक्षावर उपभोग दर्शविला आहे. $45^0$ चा कोन जाणारी रेषा उपभोग = उत्पन्न दर्शविते. सुरुवातीला उत्पन्न कमी आहे पण उपभोग जास्त आहे. A या बिंदूत उपभोग = उत्पन्न आहे.

A बिंदू नंतर मात्र उत्पन्न वाढत असताना उपभोग घटत जातो म्हणून CC हा उपभोग वक्र A बिंदूनंतर खाली सरकतो.

**उपभोग प्रवृत्ती :**

**१) सरासरी उपभोग प्रवृत्ती (Average Propensity to Consume) :**

एकूण उपभोगात खर्च आणि एकूण उत्पन्न यांचे गुणोत्तर म्हणजे सरासरी उपभोग प्रवृत्ती होय.

एकूण उपभोग खर्चास एकूण उत्पन्नाने भागले असता सरासरी उपभोग प्रवृत्ती मिळते.

सूत्र

$$APC = \frac{C}{y}$$

$$\text{सरासरी उपभोग प्रवृत्ती} = \frac{\text{एकुण उपभोग}}{\text{एकुण उत्पन्न}}$$

उदा. जर एकुण उत्पन्न २०० कोटी रुपये असेल आणि समाजाचा उपभोग खर्च १८० कोटी रुपये असेल तर सरासरी उपभोग प्रवृत्ती काढा.

$$APc = \frac{C}{y}$$

$$APc = \frac{180}{200} \qquad C = 180$$
$$\qquad y = 200$$

$$APC = 0.9$$

$\therefore$ 0.9 सरासरी उपभोग प्रवृत्ती आहे.

**२) सिमान्त उपभोग प्रवृत्ती (Marginal Propensity to Consume) :**

एकूण उपभोगात होणाऱ्या बदलांचे एकूण उत्पन्नात होणाऱ्या बदलांशी असणारे प्रमाण म्हणजे सीमान्त उपभोग प्रवृत्ती होय.

उपभोग खर्चात होणाऱ्या बदलास उत्पन्नात होणाऱ्या बदलाने भागले असता सिमान्त उपभोग प्रवृत्ती मिळते.

$$MPC = \frac{\Delta C}{\Delta y}$$

$$\text{सिमान्त उपभोग प्रवृत्ती} = \frac{\text{उपभोग खर्चातील बदल}}{\text{उत्पन्नातील बदल}}$$

उदा. जर एकूण उत्पन्न २०० कोटी रुपयावरुन ४०० कोटी रुपयापर्यंत वाढले असता उपभोग खर्च १८० कोटी रुपयावरुन २८० कोटी रुपयापर्यंत वाढत असेल तर सिमान्त उपभोग प्रवृत्ती काढा.

$$MPC = \frac{\Delta C}{\Delta y}$$

$$MPC = \frac{100}{200}$$

$$MPC = 0.5$$

$\therefore$ सिमान्त उपभोगप्रवृत्ती ०.५ होय.

## ३.५ सरासरी उपभोग प्रवृत्ती आणि सिमान्त उपभोग प्रवृत्ती यामधील संबंध (RELATION BETWEEN APC AND MPC)

१) सरासरी उपभोग प्रवृत्ती एकूण उपभोगाचे एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण दर्शविते तर सिमान्त उपभोग प्रवृत्ती उत्पन्नात बदल झाल्यामुळे उपभोग खर्चात झालेला बदल दर्शविते.

२) उत्पन्नातील वाढीबरोबर सरासरी उपभोग प्रवृत्ती व सिमान्त उपभोग प्रवृत्ती या दोहोंचा ऱ्हास होतो. तथापि, सरासरी उपभोग प्रवृत्तीपेक्षा सिमान्त उपभोग प्रवृत्ती अधिक वेगाने घटते.

munotes.in

३) काही वेळा सिमान्त उपभोग प्रवृत्ती आणि सरासरी उपभोग प्रवृत्ती समान असण्याची शक्यता असते.

४) गरीब समाजात सिमान्त उपभोग प्रवृत्ती अधिक असते आणि श्रीमंत समाजात ती कमी असते कारण श्रीमंत समाजाच्या सर्व मूलभूत गरजा पूर्ण झालेल्या असतात. म्हणून वाढलेल्या उत्पन्नाची बचत केली जाते उलट गरीब समाजाच्या प्राथमिक गरजा पूर्ण झालेल्या नसतात म्हणून वाढलेले उत्पन्न उपभोगावर खर्च केले जाते.

## ३.६ उपभोग फलनावर परिणाम करणारे घटक (FACTORS INFLUENCING CONSUMPTION FUNCTION)

उपभोग फलनावर अनेक व्यक्तिनिष्ठ व वस्तूनिष्ठ घटकांचा परिणाम होतो.

**अ) व्यक्तिनिष्ठ घटक :** उपभोग प्रवृत्ती वाढण्यास अथवा कमी करण्यास प्रेरणा देणाऱ्या मानसिक घटकांचा समावेश व्यक्तिनिष्ठ घटकात होतो.

**१) दूरदृष्टीचा हेतू :** भविष्यकाळात येणाऱ्या गरजाना तोंड देण्यासाठी व्यक्ती आपल्या उत्पन्नाचा काही भाग शिल्लक ठेवतात. उदा. वृद्धापकाळ, मुलांचे शिक्षण, आजारपण इत्यादी.

**२) सावधगिरीचा हेतू :** भविष्यकाळात येणाऱ्या संकटासंबंधी आगाऊ अंदाज करता येत नाही त्यांना तोंड देण्यासाठी व्यक्ती काही रक्कम रोख स्वरुपात ठेवतात. त्यामुळे उपभोग कमी होतो. उदा. आजारपण अपघात इत्यादी.

**३) हिशोबाचा हेतू :** आज कमी उपभोग घेण्यापेक्षा पैसा कर्जाऊ देऊन अधिक व्याज मिळवून पुढील काळात मोठ्या प्रमाणात उपभोग होण्याची इच्छा असेल तर उपभोगात घट होते.

**४) प्रगतीचा हेतू :** प्रत्येक व्यक्तिला आपली आर्थिक प्रगती व्हावी किंवा आर्थिक परिस्थिती सुधारावी असे वाटत असेल तर त्यासाठी व्यक्ती आपल्या उत्पन्नातील काही भाग बचत करतात त्यामुळे उपभोगात घट होते.

**५) स्वावलंबनाचा हेतू :** लोकांकडे अधिक पैसा असेल तर त्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळते. त्यांची खरेदीशक्ती वाढते. असे स्वातंत्र्य मिळविण्याचा हेतू असेल तर लोक अधिकाधिक रोख पैसा जवळ बाळगतात.

**६) व्यवसाय हेतू :** कोणताही व्यवसाय सुरु करण्यासाठी भांडवलाची गरज असते. लोक उपभोग खर्चात घट करुन बचत करतात बचत वाढल्यामुळे भांडवलनिर्मिती होते.

**७) अभिमानाचा हेतू :** लोकांना आपली भरभराट व्हावी आपल्याजवळ संपत्तीचा साठा वाढावा असे वाटत असेल तर ते उपभोगात कपात करतात. त्यामुळे उपभोगात घट होते.

**८) प्रतिष्ठा हेतू :** श्रीमंत लोकांना समाजात प्रतिष्ठा असते. या प्रतिष्ठा हेतून लोक अधिक बचत करुन श्रीमंत होण्याचा प्रयत्न करतात.

**९) कंजुषपणाचा हेतू :** समाजातील काही लोक अतिशय कंजूष असतात. असे कंजुष लोक हावरटपणे उपभोग कमी करुन बचत करतात. त्यामुळे उपभोगात घट होते.

अशा विविध व्यक्तीनिष्ठ घटकांचा उपभोगावर परिणाम होऊन उपभोगात घट होते तर काही व्यक्तीनिष्ठ घटक उपभोगात वाढ घडवून आणण्यासाठी कारणीभूत ठरतात. उधळे, विलासी वृत्ती असणारे किंवा भविष्याची चिंता न करणारे उपभोगावर अधिक प्रमाणात खर्च करतात.

**ब) वस्तूनिष्ठ घटक :**

सर्वसाधारणपणे उत्पन्नात वाढ झाली असता उपभोगात वाढ होते आणि उत्पन्नात घट झाली असता उपभोगात घट होते. उपभोग प्रवृत्तीवर उत्पन्नाबरोबरच इतर अनेक वस्तुनिष्ठ घटकांचा प्रभाव पडतो. हे घटक पुढीलप्रमाणे

**१) किंमत पातळी :** देशाची उपभोगप्रवृत्ती किंमतपातळीवर अवलंबून असते. किंमतपातळी वाढते तेव्हा उपभोगप्रवृत्ती घटते आणि किंमत पातळी घटते तेव्हा उपभोग प्रवृत्ती वाढते.

**२) राजकोषीय धोरण :** राजकोषीय धोरणाचा उपभोग प्रवृत्तीवर परिणाम होतो. उदा. सरकारने मोठ्या प्रमाणात कर आकारणी केली तर त्यामुळे लोकांच्या खर्च योग्य उत्पन्नात घट होते आणि उपभोग घटतो याउलट सरकारने करात कपात केली तर त्यामुळे उपभोग खर्चात वाढ होते.

**३) व्याजाचा दर :** व्याजदर उपभोग प्रवृत्तीवर परिणाम करतो. व्याजाचा दर अधिक असेल तर लोकांना अधिक बचत करण्याची प्रेरणा मिळते. त्यामुळे उपभोग प्रवृत्ती कमी होते. याउलट बाजारातील व्याजदर कमी असेल तर बचत कमी होते आणि उपभोगात वाढ होते.

**४) उत्पन्नाचे विभाजन :** उत्पन्नाचे विभाजन उपभोगाची पातळी निश्चित करते. उत्पन्नाचे विभाजन समान असेल तर उपभोग प्रवृत्ती जास्त असते. उत्पन्नाचे विभाजन विषम असेल तर सरासरी उपभोग प्रवृत्ती कमी असते.

**५) उत्पन्न पातळी :** उत्पन्न पातळी वाढली तर उपभोग वाढतो. उत्पन्नात घट झाली तर उपभोग कमी होतो.

**६) अनपेक्षित लाभ किंवा तोटे :** अनपेक्षित होणारे लाभ आणि तोटे यांचाही उपभोग प्रवृत्तीवर परिणाम होतो. उदा. शेअर्सच्या किंमतीत वाढ होते. तेव्हा भागधारक त्यांची स्थिती चांगली झाल्याचे समजून आपल्या उपभोगात वाढ करतात. याउलट जेव्हा शेअर्सच्या किंमतीत घट होते तेव्हा भागधारकांना अचानक तोटा सहन करावा लागतो. त्यामुळे त्यांच्या उपभोगात घट होते.

munotes.in

**७) बचत प्रवृत्ती :** ज्या लोकांची बचत प्रवृत्ती जास्त असते त्या लोकांची उपभोग प्रवृत्ती कमी असते. आणि ज्या लोकांची बचत प्रवृत्ती कमी असते त्या लोकांची उपभोग प्रवृत्ती जास्त असते.

**८) लोकसंख्येचे स्वरुप :** एकूण लोकसंख्येतील तरुणाचे प्रमाण अधिक असल्यास उपभोग खर्चात वाढ होते. उदा. नवीन फॅशन्स, आवडी-निवडीतील बदल इत्यादी.

**९) कर्जाची उपलब्धता :** जर बँकेकडून कर्ज सहज उपलब्ध होत असेल तर उपभोग खर्चात वाढ होते. सहजपणे कर्ज उपलब्ध होत नाही तेव्हा उपभोग खर्चात घट होते.

वरील सर्व घटकांचा उपभोग प्रवृत्तीवर प्रभाव पडून उपभोग प्रवृत्तीत वाढ किंवा घट होते.

**आपली प्रगती तपासा.**

१) उपभोग फलन संकल्पना स्पष्ट करा.
२) सरासरी व सिमान्त उपभोग प्रवृत्ती म्हणजे काय ?
३) उपभोग फलनावर परिणाम करणारे व्यक्तिनिष्ठ घटक कोणते ?
४) उपभोग फलनावर परिणाम करणारे वस्तुनिष्ठ घटक कोणते ?

## ३.७ उपभोग फलनाचे महत्त्व (IMPORTANCE OF CONSUMPTION FUNCTION)

लॉर्ड केन्सने मांडलेल्या रोजगार सिद्धांतात उपभोग फलन ही संकल्पना महत्त्वाची आहे. पूर्ण रोजगार, बेकारी निवारण, आर्थिक स्थिरीकरण या उद्दिष्टांचा आर्थिक धोरण आखताना पुढील मुद्दे लक्षात घेणे आवश्यक असते.

**१) 'से'चा नियम चुकीचा :** प्रत्येक पुरवठा आपली मागणी आपण निर्माण करतो असे 'से'च्या नियमात सांगितले आहे. याचाच अर्थ अर्थव्यवस्थेत अतिरिक्त उत्पादनाची किंवा बेकारीची शक्यता नसते. परंतू केन्सच्या नियमातून असे स्पष्ट होते की उत्पन्न वाढते तेव्हा सर्व उत्पन्न उपभोगावर खर्च केले जात नाही. त्यामुळे पुरवठ्यापेक्षा मागणी कमी राहून त्यातून अतिरिक्त उत्पादन वाढून बेकारी निर्माण होते.

**२) सरकारच्या हस्तक्षेपाची गरज :** भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उपभोग न्यूनतेमुळे अपूर्ण रोजगाराची परिस्थिती निर्माण होते व ही परिस्थिती दूर करण्यासाठी सार्वजनिक खर्च आवश्यक

असतो म्हणजेच सरकारच्या हस्तक्षेपाची गरज असते याचे स्पष्टीकरण उपभोग फलनाच्या आधारे मिळते.

**३) गुंतवणूकीचे महत्त्व :** लोक आपले वाढलेले सर्वच्या सर्व उत्पन्न उपभोगावर खर्च करीत नाहीत. त्यामुळे उत्पन्न व उपभोग यात अंतर पडते. हे अंतर उपभोग किंवा गुंतवणूक यात वाढ करुन भरुन काढता येते. अल्पकाळात उपभोग फलन स्थिर असल्याने उत्पन्न व उपभोग यातील अंतर केवळ गुंतवणूकीत वाढ करुन भरुन काढता येते. अशाप्रकारे केन्सच्या मानसशास्त्रीय नियमाने गुंतवणूकीच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर भर दिला आहे.

**४) घटती भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता :** ज्या प्रमाणात उत्पन्नात वाढ होते. त्या प्रमाणात उपभोग खर्चात वाढ होत नाही. त्यामुळे उपभोग्य वस्तूची मागणी घटून बाजारात वस्तू शिल्लक रहातात. स्वाभाविक भांडवली वस्तूची मागणी कमी होऊन नफ्याच्या दरात घट होते. आणि भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता घटते. उपभोग प्रवृत्तीत वाढ झाल्याशिवाय भांडवलाच्या सिमान्त कार्यक्षमतेतील घट कमी करता येत नाही.

**५) व्यापारचक्राच्या वळणबिंदूचे स्पष्टीकरण :** तेजीकडून मंदीकडे आणि मंदीकडून तेजीकडे व्यापारचक्र का वळते याचे स्पष्टीकरण उपभोग प्रवृत्तीच्या मदतीने देता येते. समाजातील लोक सर्व उत्पन्न उपभोगावर खर्च करीत नाहीत म्हणून अतिरिक्त उत्पादन होऊन अपसरण सुरु होते. मंदीच्या काळात उपभोगप्रवृत्ती विशिष्ट मर्यादेच्या खाली जात असल्याने उपभोग खर्चाच्या मानाने उत्पादन कमी आहे अस दिसताच भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता वाढून पुनरुज्जीवन सुरु होते.

**६) अपूर्ण रोजगार समतोल :** केन्सने मांडलेली अपूर्ण रोजगार समतोलाची संकल्पना ही उपभोगाच्या मानसशास्त्रीय नियमावर आधारलेली आहे. प्रभावी मागणीचा बिंदू रोजगार पातळीचा समतोल ठरवितो. परंतू तेथे पूर्ण रोजगार पातळीस समतोल साधला जात नसून अपूर्ण रोजगार, पातळीस समतोल साधला जातो. कारण उपभोक्ते त्यांचे सर्व उत्पन्न उपभोगावरती खर्च करीत नाहीत. त्यामुळे एकूण मागणीत कमतरता रहाते. केन्सच्या मते, उत्पन्न व उपभोग यामध्ये निर्माण होणारा फरक जर सरकारने गुंतवणूकीमध्ये वाढ करुन भरुन काढला तर पूर्ण रोजगाराची पातळी गाठली जाऊ शकते.

**आपली प्रगती तपासा.**

१) केन्सच्या उपभोग फलनाचे महत्त्व सांगा.

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

munotes.in

## ३.८ सारांश (CONCLUSION)

उपभोग प्रवृत्ती ही अल्पकाळात स्थिर असते त्यामुळे अल्पकालीन उपभोग प्रवृत्तीत वाढत करता येत नाही. परंतू विशिष्ट उपयोजना केल्यास उपभोग प्रवृत्तीत दीर्घकाळात वाढ करता येते. गरीबांची सिमान्त उपभोग प्रवृत्ती ही श्रीमंताच्या उपभोग प्रवृत्तीपेक्षा जास्त असते. म्हणून गरीबांना अनुकूल असे उत्पन्नाचे वाटप झाल्यास उपभोग प्रवृत्तीत वाढ होते. शहरीकरणाच्या प्रक्रियेला उत्तेजन दिल्यास उपभोग प्रवृत्तीत वाढ होऊ शकते. कारण ग्रामीण भागातील लोकांच्या उपभोग प्रवृत्तीपेक्षा शहरी लोकांची उपभोग प्रवृत्ती जास्त असते. नवीन उत्पादनाचा जेव्हा विविध मार्गाने आकर्षक पद्धतीने प्रचार व प्रसार होतो तेव्हा ह्या नवीन उत्पादना विषयी आकर्षण वाटून उपभोग प्रवृत्तीत वाढ होते.

## ३.९ सरावासाठी प्रश्न (QUESTIONS)

१) 'मुक्त अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्न' टिप लिहा.
२) उपभोग फलनाची संकल्पना स्पष्ट करा.
३) उपभोग फलनावर परिणाम करणारे घटक कोणते ?
४) उपभोग फलनाचे महत्त्व स्पष्ट करा.

❖❖❖❖

munotes.in

# घटक -४

## बचत आणि गुंतवणूक
## (SAVING AND INVESTMENT)

**घटक रचना :**

४.० उद्दिष्ट्ये
४.१ प्रस्तावना
४.२ गुणक अर्थ व व्याख्या
४.३ गुणकाचे कार्य किंवा उत्पन्न प्रसाराची प्रक्रिया
४.४ गुणकांच्या गळत्या
४.५ गुणकाच्या मर्यादा
४.६ भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता
४.७ भांडवलाच्या सिमान्त कार्यक्षमता व व्याजदर सबंध
४.८ भांडवलाच्या सिमान्त कार्यक्षमतेवर प्रभाव पाडणारे घटक
४.९ प्रवेग / त्वरक तत्व
४.१० त्वरकाच्या मर्यादा
४.११ भारतातील बचतीचे स्त्रोत रचना आणि प्रवाह
४.१२ भारतातील भांडवलनिर्मिती रचना आणि प्रवाह
४.१३ सारांश
४.१४ सरावासाठी प्रश्न

## ४.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

- गुंतवणूक गुणक संकल्पना अभ्यासणे.
- भांडवलाच्या सिमान्त कार्यक्षमता संकल्पनेचा अभ्यास करणे.
- प्रवेग तत्व समजावून घेणे.
- भारतातील भांडवलनिर्मिती रचना व प्रवाह अभ्यासणे.

## ४.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

सिमान्त उपभोग प्रवृत्ती ह्या संकल्पनेशी सबंधित अशी दुसरी संकल्पना म्हणजे केन्सचा गुणक होय. गुणक ही संकल्पना १९३१ मध्ये आर. एफ. काहन यांनी मांडली. पण

आधुनिक आर्थिक विश्लेषणात याचा वापर करण्याचे श्रेय केन्सकडे जाते. केन्सने गुणक तत्वाच्या आधारे उत्पन्न प्रसाराची प्रक्रिया स्पष्ट केली आहे. गुणक तत्व हे केन्सने लिहिलेल्या “The Genral Theory of Employment, Interest and Money” या ग्रंथाचे अविभाज्य अंग आहे.

राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करण्याचे (१) उपभोग खर्चात वाढ करणे (२) गुंतवणूक खर्चात वाढ करणे हे ते मार्ग आहेत. अल्पकाळात उपभोगखर्च सामान्यतः स्थिर असल्यामुळे गुंतवणूकीत वाढ करणे हा राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करण्याचा एकमेव उपाय आहे, असे केन्सचे म्हणणे आहे. गुंतवणूकीत वाढ केली असता राष्ट्रीय उत्पन्नात किती पटीने वाढ होते हे सांगणारा आकडा म्हणजे गुणक, असे केन्स म्हणतात.

## ४.२ गुणक - अर्थ व व्याख्या (MULTIPLIER - MEANING AND DEFINITION)

केन्सच्या मते, गुणकाचा सिद्धांत हा रोजगारा बाबतच्या सिद्धांताच्या आधारस्तंभ आहे. केन्सच्या गुणकाच्या सिद्धांतास गुंतवणूक गुणक किंवा उत्पन्न गुणक असे म्हणतात.

आर.एच. गॉडविन - “गुंतवणूकीत आरंभी करण्यात आलेली वाढ व त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात झालेली अंतिम वाढ या दोहोतील संबंध स्पष्ट करणारी कल्पना म्हणजे गुणक होय.”

अर्थव्यवस्थेत गुंतवणूक वाढली असता या गुंतवणूकीमुळे उत्पन्नात किती वाढ होईल हे गुणक तत्वाने दर्शविले जाते. गुंतवणूकीत १ कोटीने वाढ केली असता उत्पन्न ५ कोटीने वाढत असेल तर गुणक ५ होय. गुणक हे उत्पन्नातील बदलाचे गुंतवणूकीतील बदलाशी असलेले गुणोत्तर आहे. गुणक हा सिमान्त उपभोग प्रवृत्तीवर अवलंबून असतो. सिमान्त उपभोग प्रवृत्ती जेवढी जास्त तेवढे गुणकाचे उत्तर जास्त येते.

$$K = \frac{1}{1 - MPC}$$

K = गुणक

MPC = सिमान्त उपभोग प्रवृत्ती

हे सूत्र सिमान्त बचत प्रवृत्तीच्या संदर्भात लिहिता येते. कारण या सुत्राच्या छेदस्थानी असलेल्या 1 - MPC याचा अर्थ सिमान्त बचत प्रवृत्ती होय.

म्हणून हे सूत्र पुढीलप्रमाणे लिहिता येते.

$$K = \frac{1}{MPS}$$

K = गुणक

MPS = सिमान्त बचत प्रवृत्ती

गुणक हा वरील सुत्राच्या सहाय्याने पुढीलप्रमाणे काढता येईल.

| | सिमान्त उपभोग प्रवृत्ती (MPC) | सिमान्त बचत प्रवृत्ती (MPS) | गुणक $K = \frac{1}{1-MPC}$ किंवा $K = \frac{1}{MPS}$ |
|---|---|---|---|
| १) | ०.६ | MPS = 1 - MPC | $K = \frac{1}{MPS}$ |
| | | MPS = 1 - 0.6 | $K = \frac{1}{0.4}$ |
| | | MPS = 0.4 | $K = 2.5$ |
| २) | ०.४ | MPS = 1 - MPC | $K = \frac{1}{MPS}$ |
| | | MPS = 1 - 0.4 | $K = \frac{1}{0.6}$ |
| | | MPS = 0.6 | $K = 1.66$ |

१) वरील विभाग १ वरुन लक्षात येते की, सिमान्त उपभोग प्रवृत्ती जेवढी जास्त तेवढे गुणकाचे उत्तर अधिक येते.
२) सिमान्त उपभोग प्रवृत्ती नेहमी एक पेक्षा कमी आणि शून्यापेक्षा जास्त असते.
३) गुणक हा १(एक) आणि अनंत (infinity) च्या दरम्यान असतो.

## ४.३ गुणकाचे कार्य किंवा उत्पन्न प्रसाराची प्रक्रिया (FUNCTIONS OF MULTIPLIER)

गुणक हे उत्पन्नातील वाढीचे गुंतवणूकीतील वाढीशी असलेले प्रमाण होय.

गुणकाचे सूत्र = $K = \frac{\Delta Y}{\Delta I}$

K = गुणक
$\Delta Y$ = उत्पन्नातील बदल
$\Delta I$ = गुंतवणूकीतील बदल

गुंतवणूकीत वाढ केली असता लोकांना रोजगार मिळत समाजाचे उत्पन्न वाढते. उदा. गुंतवणूकीत १० कोटी रु ची वाढ केली. ह्या गुंतवणूक खर्चामुळे विविध व्यक्तींना १० कोटी रु. चे उत्पन्न मिळाले. राष्ट्रीय उत्पन्नात १० कोटी रु. ची वाढ झाली. परंतू एवढ्यावरच ही प्रक्रिया थांबत नाही. कारण ज्या व्यक्तीचे उत्पन्न गुंतवणूकीमुळे वाढले त्या व्यक्ति वाढलेले सर्व उत्पन्न बचत करणार नाहीत. त्यातील काही भाग उपभोगावर खर्च करतील. किती भाग उपभोगावर खर्च करतील ही गोष्ट सिमान्त उपभोग प्रवृत्तीवर अवलंबून राहील. उत्पन्नातील जो भाग उपभोगावर खर्च होतो तो दुसऱ्या काही व्यक्तीचे उत्पन्न बनते व ह्या उत्पन्नातून पुन्हा खर्च होतो. अशाप्रकारे उपभोग खर्चातून पुन्हा उत्पन्न व उत्पन्नातून पुन्हा उपभोग खर्च असा प्रवाह

munotes.in

सुरु होतो व असा हा प्रवाह सुरु होत असल्यामुळे मुळ गुंतवणूकीत होणाऱ्या वाढीपेक्षा जास्त वाढ एकूण उत्पन्नात होत असते. ही वाढ किती होईल हे गुणकाच्या सहाय्याने कळते. उत्पन्न प्रवाह सुरु होऊन एकूण उत्पन्नात मुळ गुंतवणूकीतील वाढीपेक्षा जास्त वाढ कशी होते हे पुढील उदाहरणाच्या सहाय्याने स्पष्ट करता येईल.

उदा. मूळ गुंतवणूकीत १०० कोटी रुपयानी वाढ केली व सिमान्त उपभोग प्रवृत्ती ०.५ आहे असे गृहीत धरु.

**उत्पन्न प्रसाराची प्रक्रिया**

| फेरी | **प्राथमिक गुंतवणूक** $\Delta I$ | **एकूण उत्पन्न =** $\Delta Y$ | **एकूण उपभोग +** $\Delta C$ | **एकूण बचत** $\Delta S$ |
|---|---|---|---|---|
| १) | १०० कोटी | १००.०० = | ५०.०० | **५०.००** |
| २) | -- | ५०.०० | २५.०० | **२५.००** |
| ३) | -- | २५.०० | १२.५० | १२.५० |
| ४) | -- | १२.५० | ६.२५ | **६.२५** |
| ५) | -- | ६.२५ | ३.१२ | **३.१२** |
| ६) | -- | ३.१२ | १.५६ | १.५६ |
| ७) | -- | १.५६ | ०.७८ | ०.७८ |
| **X** | -- | **X** | **X** | **X** |
| शेवटी | १०० कोटी | २०० कोटी | १०० कोटी | १०० कोटी |

munotes.in

वरील कोष्टकावरुन लक्षात येते की सिमान्त उपभोग प्रवृत्ती (MPC) ०.५ असते तेव्हा गुंतवणूकीत जर १०० कोटीने वाढ केली तर एकूण उत्पन्न २०० कोटी एवढे होते. म्हणजे गुणक हा २ असतो.

सूत्र


$$K = \frac{\Delta Y}{\Delta I}$$

$$K = \frac{200}{100}$$

$$K = 2$$


गुणक २ आहे.

उत्पन्न प्रसारणाची प्रक्रिया आकृतीच्या सहाय्याने पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल




**आकृती ४.१**

वरील आकृतीत OX अक्षावर उत्पन्न आणि OY अक्षावर उपभोग व गुंतवणूक दर्शविली आहे. CC हा उपभोग वक्र आहे. सिमान्त उपभोग प्रवृत्ती 0.5 आहे. उपभोग वक्र CC आणि $45^0$ ची रेषा Y=C+S यांच्यातील फरक हा गुंतवणूक खर्च दर्शवितो. C+I हा वक्र $45^0$ च्या रेषेस $E_1$ बिंदूत छेदतो. तेव्हा उत्पन्नाची पातळी $OY_1$ इतकी असते. जर गुंतवणूकीत $\Delta I$ इतकी वाढ केली तर Y=C+S या रेषेस $C+I+\Delta I$ हा वक्र $E_2$ बिंदूत स्पर्श करेल तेव्हा उत्पन्नाची पातळी $OY_2$ होते. म्हणजेच जर $E_2$ $R_2$ एवढी गुंतवणूकीत वाढ केली असता उत्पन्नातील वाढ $Y_1$ $Y_2$ इतकी आहे. सोबतच्या आकृतीमध्ये उत्पन्नातील वाढ ही गुंतवणूकीतील वाढीच्या दुप्पट आहे असे दर्शविले आहे. आपण जर सिमान्त बचत प्रवृत्ती लक्षात घेतली तर आपणास उत्पन्नातील बदल सारखाच दिसुन येईल. पुढील आकृतीत OX अक्षावर उत्पन्न आणि OY अक्षावर बचत व गुंतवणूक दर्शविली आहे. SS हा बचतीचा वक्र आहे तर II हा गुंतवणूकीचा मूळ वक्र आहे.




**आकृती ४.२**

munotes.in

II हा मुळ गुंतवणूक वक्र OX अक्षास संमातर काढला आहे. SS हा बचतवक्र सिमान्त बचतप्रवृत्ती ही उत्पन्नाच्या प्रत्येक पातळीस स्थिर असते. या गृहितकावर आधारलेला आहे. II हा गुंतवणूक वक्र व SS हा बचतवक्र एकमेकाना E बिंदूत छेदतात. त्यामुळे उत्पन्नाची पातळी OY एवढी असते. गुंतवणूकीत $EE_2$ एवढी घट झाली तर गुंतवणूक वक्र $I_1$ $I_1$ होतो. तो मुळ गुंतवणूक वक्राच्या खाली सरकतो. नवीन गुंतवणूक वक्र ($I_1$ $I_1$) हा SS बचत वक्रास $E_1$ बिंदूत स्पर्श करतो तेव्हा उत्पन्नपातळी $OY_1$ होते. म्हणजे $YY_1$एवढी उत्पन्नात घट होते.

**गुणकाची गृहिते :**

१) सिमान्त उपभोग प्रवृत्ती स्थिर असते.
२) उपभोग वस्तूची मुबलक उपलब्धता
३) अर्थव्यवस्था बंदिस्थ असते.
४) अर्थव्यवस्थेत बेकारी असते.
५) किंमती स्थिर असतात.
६) गुंतवणूकीवरील उपभोग प्रवेगाचा परिणाम विचारात घेतला जात नाही.

## ४.४ गुणकाच्या गळत्या (LEAKAGES IN THE MULTIPLIER)

गुंतवणूकीतील वाढीमुळे उत्पन्नात वाढ होते. उत्पन्न निर्माण झाले की खर्चाच्या रुपाने पुन्हा उत्पन्न निर्माण होते व ते उत्पन्न प्रवाहात मिसळते. उत्पन्न प्रवाहातून जेवढे उत्पन्न बाहेर जाते तेवढ्या प्रमाणात गुणकाचा प्रभाव मंदावतो. यालाच गुणकातील गळती असे म्हणतात.

**१) बचत** - बचत ही गुणक प्रक्रियेतील महत्त्वाची गळती आहे. सर्व उत्पन्न उपभोगावर खर्च न घेता त्यातील काही रक्कमेची बचत केली जाते तेवढे उत्पन्न उत्पन्नप्रवाहातून बाहेर जाते. म्हणूनच बचतीला उत्पन्नप्रवाहातील गळती असे म्हणतात.

**२) कर्जाची परतफेड** - समाजाने उत्पन्नातील वाढ जुन्या कर्जाची परतफेड करण्यासाठी वापरले तर तेवढे उत्पन्न उत्पन्नप्रवाहातून बाहेर जाते. म्हणजेच उत्पन्न प्रवाहात गळती निर्माण होते.

**३) आयात** - जर आयात जास्त असेल तर तेवढ्या प्रमाणात उत्पन्नाचा भाग परदेशी जातो. त्यामुळे देशातील उत्पन्नप्रवाह मंदावतो. म्हणून आयात ही गुणकाच्या दृष्टीने गळतीच आहे.

**४) कर** - करामुळे करदात्याचे उत्पन्न कमी होते त्यामुळे उपभोग खर्चात घट होते. अशारीतीने करात वाढ केल्यामुळे उत्पन्न प्रवाह मंदावतो. आणि गुणकात घट होते.

**५) कर्जरोख्याची खरेदी** - समाजातील व्यक्तिनी वाढलेले उत्पन्न कर्जरोखे, शेअर्स खरेदीसाठी वापरले तर उपभोग खर्च कमी होतो आणि उत्पन्न प्रवाह खंडीत होतो.

**६) किंमतवाढ** - वस्तूच्या किंमती वाढतात तेव्हा वाढीव उत्पन्न वस्तू खरेदी करण्यावर खर्च होतो त्यामुळे गुणकात घट होते.

**गुणकाच्या मर्यादा (Limitations of Multiplier) :**

**१) सिमान्त उपभोग प्रवृत्तीत बदल नाही** - सिमान्त उपभोग प्रवृत्ती स्थिर असेल तर गुणकाचे कार्य प्रभावीपणे होते. मात्र वास्तवात सिमान्त उपभोग प्रवृत्ती स्थिर रहात नाही. ती बदलत असते. त्यामुळे सिमान्त उपभोग प्रवृत्तीतील बदलाच्या दिशेने गुणकाच्या मूल्यातही बदल होतो.

**२) उपभोग आणि उत्पन्न यातील संबंध** - केन्सचा गुणक सिद्धांत, सिमान्त उपभोग प्रवृत्ती शून्यापेक्षा जास्त आणि एकापेक्षा कमी असते असे गृहीत धरुन उपभोग आणि उत्पन्न आणि उत्पन्न व उपभोग यांचा संबंध ठरविणे फार कठीण आहे. उत्पन्न व उपभोग यात अरेखीय संबंध असतो.

**३) स्थितीशील सिद्धांत** - लॉर्ड केन्स् यांचा सिद्धांत स्थितीशील स्वरुपाचा आहे. त्यामुळे गतीशील अर्थव्यवस्थेतील बदलाचे स्पष्टीकरण करण्यास तो असमर्थ ठरतो.

**४) सिमान्त खर्च प्रवृत्ती स्थिर रहात नाही** - गोरडनच्या मते गुणकाची सर्वात मोठी त्रुटी म्हणजे उपभोगावर दिलेला अधिक भर होय. सिमान्त उपभोगप्रवृत्ती या संकल्पनेऐवजी सिमान्त खर्च प्रवृत्ती या संकल्पनेचा अधिक वापर करणे योग्य ठरते.

**५) प्रवेग परिणामाचा विचार नाही** - गुंतवणूक गुणक सिद्धांत उपभोग खर्चातील बदलामुळे उत्पन्नावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करतो परंतू हा सिद्धांत उपभोगाचा गुंतवणूकीवरील परिणाम अभ्यासत नाही. म्हणजेच प्रवेग परिणामाचा विचार केलेला नाही.

गुणक सिद्धांताला मर्यादा असल्यातरी अर्थशास्त्रात या संकल्पनेला महत्त्वाचे स्थान आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) गुंतवणूक गुणकाची उत्पन्न प्रसाराची प्रक्रिया स्पष्ट करा.

munotes.in

## ४.५ भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता (MARGINAL EFFICIENCY OF CAPITAL)

"भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता म्हणजे नवीन भांडवली साधनांपासून किंवा जिंदगीपासून अपेक्षित असणारा लाभप्रदतेचा दर होय." हा भांडवली साधनाच्या सिमान्त नगापासून उत्पादन खर्च वजा जाता अपेक्षिलेल्या सर्वोच्च फलाचा दर होय.

प्रा. कुरिहारा यांच्या मते, "अतिरिक्त भांडवली संपत्तीची अपेक्षित प्राप्ती व पुरवठा किंमत यांचे गुणोत्तर म्हणजेच भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता होय."

सूत्र $$e = \frac{Q}{P}$$

e = भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता

Q = भांडवली गुंतवणूकीपासूनची अपेक्षित प्राप्ती

P = भांडवलाची पुरवठा किंमत

**भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता पुढील दोन घटकावर अवलंबून असते :**

**१) अपेक्षित प्राप्तीचा दर** - एखाद्या भांडवली जिंदगीपासुन किंवा नवीन भांडवली साधनांपासून त्यांच्या आयुष्यकालात अपेक्षिलेले निव्वळ उत्पन्न म्हणजे संभाव्य उत्पन्न होय. या भांडवली साधनांपासून मिळणाऱ्या उत्पन्नातून व्याज वगळता इतर खर्च वजा केले असता अपेक्षित प्राप्ती उत्पन्न समजते.

**२) पुरवठा किंमत** - नवीन यंत्र किंवा भांडवली साधने खरेदी करताना संभाव्य उत्पन्नाबरोबरच त्या यंत्राची पुरवठा किंमतही विचारात घ्यावी लागते. एखादे नवीन यंत्र बसवण्यासाठी द्यावी लागणारी किंमत म्हणजे पुरवठा किंमत होय.

## ४.६ भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता व व्याजदर संबंध (RELATIONSHIP BETWEEN MEC AND INTEREST RATE)

सनातनवादी विचारवंतानी व्याजदर (r) हाच गुंतवणूकीचा एकमेव निर्धारक घटक मानला आहे. केन्सने मात्र गुंतवणूक मागणी हि केवळ व्याज दरावर नव्हे तर भांडवलाच्या सिमान्त कार्यक्षमतेवर अवलंबून असते असे मानले आहे.

केन्सच्या विवेचनात भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता व व्याज दर या दोन घटकांमुळे गुंतवणूक निश्चित झालेली आढळून येते.

I = f(e,r)

I = गुतंवणूक

e = भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता

r = व्याजदर

भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता व व्याजदर यामधील संबंधामुळे गुंतवणूकीवर होणारे बदल पुढीलप्रमाणे.


१) $(e>r)\rightarrow I\uparrow$ याचा अर्थ जेव्हा भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता व्याजदरापेक्षा जास्त असते तेव्हा संयोजकाना गुंतवणूकीस प्रेरणा मिळते कारण नफा जास्त असतो व त्यामुळे ते गुंतवणूकीत वाढ करण्याचा प्रयत्न करतात.

२) $(e<r)\rightarrow I\downarrow$ याचा अर्थ जेव्हा भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता व्याजदरापेक्षा कमी असते तेव्हा अर्थव्यवस्थेत मंदीचे वातावरण असते. त्यामुळे संयोजक गुंतवणूकीत वाढ करणार नाही.

३) $(e=r)\rightarrow I$ याचा अर्थ भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता आणि व्याजदर दोन्ही समान असल्यामुळे गुंतवणूकीत कोणताही बदल होणार नाही. गुंतवणूक स्थिर राहील.

वरील तीन अवस्था पुढील आकृतीच्या सहाय्याने स्पष्ट केल्या आहेत.

**भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता व व्याजदर सबंध**




**आकृती ४.३**

वरील आकृतीत OX अक्षावर गुंतवणूक आणि OY अक्षावर भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता व व्याजदर दर्शविला आहे. भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता MEC या रेषेने दर्शविली आहे.

१) $P=e>r=P$ या बिंदूचा विचार करता भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता व्याजदरापेक्षा जास्त असल्याने संयोजक गुंतवणूकीत वाढ करेल.

२) $Q=e=r=Q$ या बिंदूचा विचार करता भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता व व्याजदर समान असल्याने गुंतवणूक स्थिर राहील. I एवढी गुंतवणूक स्थिर राहील.

३) $R = e < r = R$ या बिंदूचा विचार करता भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता व्याजदरापेक्षा कमी असल्याने गुंतवणूकीत घट होईल.

## ४.७ भांडवलाच्या सिमान्त कार्यक्षमतेवर प्रभाव पाडणारे घटक (FACTORS INFLUENCING MFC)

भांडवलाच्या सिमान्त कार्यक्षमतेवर प्रामुख्याने दोन प्रकारचे घटक प्रभाव पाडतात.

अ) अल्पकालीन घटक

ब) दिर्घकालीन घटक

**अ) अल्पकालीन घटक :**

**१) मागणीसबंधीच्या अपेक्षा :** भविष्यात एखाद्या वस्तूची मागणी वाढण्याची अपेक्षा असेल तर भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता वाढते व गुंतवणूकीत वाढ होण्याची शक्यता असते. याउलट एखाद्या वस्तूच्या मागणीत घट होण्याची अपेक्षा असेल तर भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता कमी होते.

**२) उपभोग प्रवृत्ती :** अल्पकाळात उपभोगप्रवृतीत वाढ झाल्यास भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता वाढेल कारण उपभोगातील वाढीमुळे मागणी वाढून नफा वाढेल. याउलट उपभोग प्रवृत्तीत घट झाल्यास भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता घटेल कारण मागणी घटल्यामुळे उपभोगात घट होईल.

**३) उत्पन्नातील चढउतार :** अल्पकाळात उत्पन्नात वाढ झाल्यास भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता वाढेल आणि उत्पन्नात घट झाल्यास भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता घटेल.

**४) आशावाद व निराशावाद :** व्यवसायात उद्योजक आशावादी असतील तर भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता वाढेल आणि उद्योजक निराशावादी असतील तर भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता घटेल.

**ब) दिर्घकालीन घटक :**

**१) लोकसंख्या :** लोकसंख्या वाढल्यास वस्तू व सेवाची मागणी वाढते आणि वस्तू व सेवांच्या उत्पादनात वाढ होते त्यामुळे भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता वाढते. याउलट लोकसंख्येत घट होत असेल तर अर्थव्यवस्थेतील वस्तू व सेवांचे उत्पादन कमी राहून भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता कमी रहाते.

**२) उत्पादन तंत्रात सुधारणा :** उत्पादन तंत्रात सुधारणा झाल्यास कमी खर्चात उत्पादन करणे शक्य होऊन नफ्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता निर्माण होते. या परिस्थितीत भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता जास्त रहाते.

**३) देशातील स्थिती :** जर देशात शांततेचे व स्थिरतेचे वातावरण असेल तर भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता वाढते. याउलट राजकीय बदलती परिस्थिती, नैसर्गिक आपत्ती, युद्ध यामुळे अस्थिरता जास्त असेल तर भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता कमी होते.

**आपली प्रगती तपासा.**

१) भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता म्हणजे काय ?
२) भांडवलाच्या सिमान्त कार्यक्षमतेवर परिणाम करणारे अल्पकालीन व दीर्घकालीन घटक कोणते ?
३) भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता आणि व्याजदर सबंध स्पष्ट करा.

## ४.८ प्रवेग / त्वरक तत्व (PRINCIPAL OF ACCELERATION)

त्वरक तत्वाला प्रवेग तत्वही म्हणतात. प्रवेग तत्व हे गुणक तत्वाच्या बरेच आधी मांडण्यात आले आहे. त्वरक तत्वाची संकल्पना प्रथम फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ ॲफ्टॉलिऑन यांनी प्राथमिक स्वरुपात मांडली व नंतर अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ क्लार्क यांनी १९१४ मध्ये विकसित केली. गुणक व त्वरक ह्या दोन संमातर संकल्पना असून त्यांचा एकत्रित प्रभाव दिसून येतो.
व्याख्या : प्रवेग तत्व
हिक्स : गुंतवणूक व उत्पादन यांच्यातील प्रमाण म्हणजे प्रवेग होय.
कुरिहारा : प्रवेग सहगुणक म्हणजे प्रेरित गुंतवणूक आणि उपभोग खर्चातील सुरुवातीचा बदल यामधील गुणोत्तर होय.

**प्रवेग / त्वरक तत्वाची मांडणी :**

उपभोग्य वस्तूंकरिता असणाऱ्या मागणीत वाढ झाल्यास उपभोग्य वस्तू तयार करणाऱ्या यंत्रसामुग्रीसारख्या भांडवली वस्तूंच्या मागणीत वाढ होते. उपभोग्य वस्तूंकरिता मागणी घटल्यास भांडवली वस्तूकरिता असणारी मागणी घटते. अशाप्रकारे भांडवली वस्तूकरिता असणारी मागणी ही उपभोग्य वस्तूंच्या मागणीवर अवलंबून असते. म्हणून भांडवली वस्तूकरिता असणाऱ्या मागणीला व्युत्पन्न-मागणी म्हणतात. म्हणूनच त्वरक तत्वाला व्युत्पन्न मागणीचे तत्व असे म्हणतात.

अर्थव्यवस्थेत भांडवली वस्तुकरिता असणारी मागणीही चालू उपभोग मागणीतून निष्पन्न होते. ह्या तत्वावरच त्वरकाची संकल्पना आधारलेली आहे. उपभोग्य वस्तूंच्या मागणीत झालेली वाढ ही भांडवली वस्तूंच्या मागणीत वाढ घडवून आणते. एवढेच नव्हे तर भांडवली वस्तूंच्या

munotes.in

मागणीत होणारी वाढ ही उपभोग्य वस्तूच्या मागणीत होणाऱ्या वाढीपेक्षा जास्त असते. ह्यामुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेला चालना मिळते.

उपभोग्य वस्तुंकरिता मागणी वाढल्यामुळे नवीन यंत्राच्या मागणीत वाढ होते व त्यामुळे गुंतवणूकीत वाढ हाते. ह्या प्रकारच्या गुंतवणूकीला प्रेरित गुंतवणूक असे म्हणतात. प्रेरित गुंतवणूकीतील बदल व उपभोग्य खर्चातील बदल ह्यांचे गुणोत्तर म्हणजे त्वरक होय.

सूत्र

$$\text{त्वरक} = \frac{\text{प्रेरित गुंतवणूकीत होणारा बदल}}{\text{उपभोग खर्चात होणारा बदल}}$$

$$a = \frac{\Delta I}{\Delta C}$$

$a =$ त्वरक

$\Delta I =$ गुंतवणूकीतील बदल

$\Delta C =$ उपभोगातील बदल

उदा. उपभोग खर्चात १०० कोटी रुपयानी वाढ झाली व त्यामुळे गुंतवणूकीत ३०० कोटी रुपयांनी वाढ झाली असेल तर

$$\text{त्वरक} = \frac{\Delta I}{\Delta C}$$

$$\text{त्वरक} = \frac{\text{३०० कोटी रु}}{\text{१०० कोटी रु}}$$

$\text{त्वरक} = \text{३}$

म्हणजेच प्रवेगाचे मूल्य ३ होईल.

**त्वरकाची गृहिते :**

१) उपभोग्य वस्तूंच्या उद्योगात अतिरिक्त उत्पादन क्षमतेचा अभाव

२) भांडवली वस्तूच्या उत्पादन वाढीवर कोणतेही नियंत्रण नाही.

३) उपभोग्य व भांडवली वस्तूंकरिता निर्माण झालेली मागणी पूर्ण केली जाते.

४) उत्पादन वाढीच्या दरात होणाऱ्या वाढीनुसार गुंतवणूकीत वाढ होते.

५) प्रवेग तत्व हे फक्त औद्योगिक क्षेत्रातच लागू होते.

६) भांडवल उत्पादन गुणोत्तर स्थिर असते.

**त्वरक / प्रवेग तत्वाचे उदाहरणाद्वारे स्पष्टीकरण :**

उदा. एका विशिष्ट उपभोग्य वस्तू असून तिच्या १००० नगाची मागणी आहे. एक यंत्र १० नगाचे उत्पादन करते असे समजू. ह्यामुळे १००० नगाचे उत्पादन करण्याकरिता 1000/10 =100 यंत्राची गरज आहे. प्रत्येक यंत्राचे आयुष्य १० वर्ष आहे असे गृहित धरल्यास १० वर्षानंतर सर्व यंत्रे निरुपयोगी होतील. त्यामुळे दरवर्षी सरासरीने (100/10=10) यंत्राचे प्रतिस्थापन करावे लागेल. ह्याचा अर्थ दरवर्षी १० यंत्राची मागणी राहिल.

munotes.in

काही कारणाने उपभोग्य वस्तूंची मागणी १००० नगांऐवजी वाढून ११०० नगांची झाली म्हणजेच उपभोग्य वस्तूंच्या मागणीत १०% वाढ झाली. जास्तीच्या १०० नगाचे उत्पादन करण्याकरिता जास्तीच्या १० यंत्राची मागणी राहील. अशाप्रकारे वाढती मागणी पूर्ण करण्याकरिता १० जास्त यंत्राची व प्रतिस्थापन करण्याकरिता १० नवीन यंत्राची म्हणजे एकूण 10+10=20 यंत्राची मागणी राहील. उपभोग्य वस्तूच्या मागणीत १०% वाढ झाल्यामुळे भांडवली यंत्राच्या बाबतीत १००% वाढ झाली. अशाप्रकारे उपभोग्य वस्तूंच्या मागणीत झालेला १०% बदल हा भांडवली वस्तूच्या मागणीत १००% बदल घडवून आणतो.

$$\text{त्वरक} = \frac{\text{गुंतवणूकीतील वाढ}}{\text{उपभोगातील वाढ}}$$

$$\text{त्वरक} = \frac{\text{१००\%}}{\text{१०\%}}$$

$$\text{त्वरक} = \text{१०}$$

त्वरकाचा आकार हा जसा उपभोगात होणाऱ्या मागणीवर अवलंबून असतो तसाच तो भांडवली वस्तूच्या कार्यकालावर किंवा टिकाऊपणावर अवलंबून असतो. भांडवली वस्तूचे आयुष्य जेवढे जास्त तेवढा त्वरकाचा आकार मोठा असतो. भांडवली वस्तूचे आयुष्य किंवा टिकाऊपणा कमी तेवढा त्वरकाचा आकार लहान असतो.

## ४.९ त्वरकाच्या मर्यादा (LIMITATIONS OF ACCELERATION)

**१) उपभोग्य वस्तूंच्या क्षेत्रात अतिरिक्त उत्पादन क्षमतेचे अस्तित्व** - उद्योगाच्या उत्पादन क्षमतेएढे उत्पादन होत नसल्यास उद्योगात अतिरिक्त उत्पादन क्षमता निर्माण होते. उदा. एखादे यंत्र १२ हजार रुपयाचे उत्पादन करते पण मागणी अभावी ८ हजार रुपयाचे उत्पादन झाले तर याचा अर्थ यंत्राची ४ हजार रुपयाचे उत्पादन करण्याची क्षमता वापरली गेलेली नाही. दुसऱ्या वर्षी मागणीत वाढ झाली तर काही मागणी अतिरिक्त उत्पादन क्षमतेचा वापर करुन पूर्ण करावी लागेल. परिणामी प्रवेग तत्व योग्यप्रकारे कार्यवाहीत होणार नाही.

**२) उपभोग्य वस्तूंच्या मागणीतील वाढ तात्पुरत्या स्वरुपाची असणे** - त्वरकाची ही दुसरी मर्यादा आहे. उपभोग्य वस्तूकरिता वाढलेली मागणी ही अल्पकाळ टिकणारी असेल तर उद्योजक भांडवली वस्तूत गुंतवणूक वाढवण्यास तयार रहाणार नाही व त्वरक कार्यान्वित होणार नाही. यावरुन दिसून येते की त्वरक केवळ हा नफ्यासंबधीच्या अपेक्षावरही अवलंबून असतो.

**३) भांडवल उत्पादन गुणोत्तर** - उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाकरिता आवश्यक असणारे भांडवल व त्या वस्तूचे उत्पादन यांचे गुणोत्तर स्थिर आहे असे प्रवेग तत्वात गृहित धरले आहे. प्रत्यक्षात नवीन तंत्राचा वापर, श्रम व भांडवल यांच्या वेतनातील व व्याजातील बदल यामुळे हे गुणोत्तर बदलते.

**४) पतपुरवठ्याची लवचिकता** - उपभोगात वाढ झाल्यास प्रेरित गुंतवणूकीत वाढ होण्याकरिता उत्पादकास बँकांची कर्जे पुरेशा प्रमाणात उपलब्ध व्हायला पाहिजेत. पतपुरवठा

ताठर असेल तर व्याजदर वाढून गुंतवणूक खर्च कमी होईल व गुंतवणूक घटेल. म्हणून प्रवेग परिणाम कमी होईल.

**५) अलवचिक अर्थव्यवस्था** - देशाची अर्थव्यवस्था लवचिक असेल तर गुंतवणूकीतील बदलाचा प्रभाव माहित करुन घेता येतो. परंतू अर्थव्यवस्था अलवचिक असेल तर प्रवेग तत्वाचे आकलन होत नाही.

## ४.१० त्वरक / प्रवेग तत्वावरील आक्षेप (CRITICISMS AN PRINCIPLE OF ACCELERATION)

१) भांडवल उत्पादन गुणोत्तर स्थिर असते - हे गृहीतक बरोबर नाही कारण आधुनिक युगात उत्पादन तंत्र बदलत असतात.
२) पूर्ण रोजगाराचे गृहित अवास्तव - कारण प्रत्यक्षात पूर्ण रोजगार आढळत नाही.
३) भांडवली वस्तूचा पुरवठा लवचिक असतो हे गृहित बरोबर नाही - कारण भांडवली वस्तूच्या पुरवठ्यात वाढ करता येत नाही.
४) क्लिष्ट व गुंतागुंतीचे - केन्सच्या मते त्वरक तत्व हे क्लिष्ट व गुंतागुंतीचे आहे म्हणून त्वरक तत्वाचा वापर टाळला आहे.

**महत्त्व :**

त्वरक तत्वावर आक्षेप घेण्यात आले असले तरी हे तत्व आर्थिक विश्लेषणासाठी महत्त्वाचे साधन आहे.

१) पूर्ण कल्पना येण्याकरिता गुणकाला त्वरक तत्वाची जोड हवी.
२) व्यापार व उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात चढउतार का होतात याचे स्पष्टीकरण त्वरक तत्वामुळे होते.
३) प्रा. हिक्सचा व्यापार तत्वाचा सिद्धांत प्रामुख्याने त्वरक तत्वावरच आधारलेला आहे.
४) प्रा. हॅरॉड ह्यांनी मांडलेल्या संथविकास सिद्धांताला त्वरक संकल्पनेचा आधार आहे.
५) त्वरक तत्वावरुन कळून येते की उपभोग्य वस्तूंच्या उद्योगात अल्प बदल होतात परंतू त्यांचा परिणाम भांडवली-वस्तू उद्योगावर मोठ्या प्रमाणावर होतो.

प्रवेग तत्वावरुन स्पष्ट होते की, समाजाचा उपभोग थोडा जरी वाढला तरी गुंतवणूकीत जास्त प्रमाणात वाढ होते. उपभोगात थोडी घट झाल्यास त्यापेक्षा जास्त घट गुंतवणूकीत होते. म्हणजेच त्वरक हा पुढील व मागील दिशांनी कार्यान्वित होत असतो.

## ४.११ भारतातील बचतीचे स्त्रोत, रचना आणि प्रवाह (SOURCE, STRUCTURE AND FLOW OF SAVING IN INDIA)

भारतीय अर्थव्यवस्थेतील स्थूल देशांतर्गत बचतीमध्ये सार्वजनिक, खाजगी / कॉर्पोरेट आणि घरगुती क्षेत्राच्या बचतीच्या समावेश होतो. भारतातील बचतीचा दर सातत्याने जास्त राहिला आहे.

**भारतातील बचतीचे स्त्रोत :**

**१) घरगुती क्षेत्राची बचत** - कुटुंबाकडे येणाऱ्या एकूण उत्पन्नापैकी एकुण खर्च वजा केला असता बँक, पोस्ट आदींमध्ये ठेवलेली बचत म्हणजे घरगुती बचत होय. भारतात १९५० च्या दशकात घरगुती क्षेत्राची बचत ७% इतकी होती त्यात वाढ होऊन १९९० च्या दशकात १८.५% इतकी झाली. २००० च्या दशकात घरगुती बचतीचा दर २३% इतका वाढला परंतू २०१४-१५ मध्ये तो १९.१% एवढा कमी झाला.

**२) सार्वजनिक क्षेत्राची बचत** - शासनाने संघराज्यांना व घटक राज्यांना दिलेली कर्जे त्याचप्रमाणे उत्पादक क्षेत्रामध्ये केलेली गुंतवणूक यांना सार्वजनिक बचत असे म्हणतात. १९७० च्या दशकात सार्वजनिक क्षेत्रातील बचतीत वाढ होऊ लागली. परंतू त्यानंतर मात्र सार्वजनिक क्षेत्राची बचत घटत गेली. २००३-०४ पासून सार्वजनिक क्षेत्रातील बचतीत मात्र वाढ झाली. २००३-०४ मध्ये बचतीचा दर १% होता तो २००७-०८ मध्ये ५% झाला आणि २०१४-१५ मध्ये तो १.२% इतका राहिला.

**३) खाजगी / कॉर्पोरेट क्षेत्राची बचत** - उद्योगानी उत्पादन वृद्धीकरिता उत्पादक घटकांमध्ये केलेली गुंतवणूक म्हणजे खाजगी किंवा कॉर्पोरेट बचत होय. खाजगी क्षेत्राची बचत १९९० च्या दशकात ३.७% दराने वाढली तर २०१४-१५ मध्ये ही बचत १२.७% इतकी वाढली.

**बचतीची रचना :**

भारतातील बचतीची रचना खुल्या स्वरुपाची आहे. यामध्ये घरगुती बचत, खाजगी बचत व सार्वजनिक बचत यांचा समावेश होतो. अर्थव्यवस्थेचे उदारीकरण आणि व्यवसायासाठी अनुकूल वातावरण यामुळे खाजगी गुंतवणूकीत वाढ होत आहे.

भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूकीचा हिस्सा दिवसेंदिवस कमी होत आहे. सरकारचे निर्गुतवणूक धोरण गुंतवणूक कमी होण्यास कारणीभूत आहे.

भारतीय बचतीमध्ये घरगुती बचतीचा वाटा सर्वाधिक आहे कारण ही बचत बँक, पोस्ट, विमा, शेअर बाजार यामध्ये मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या गुंतवणूकीच्या स्वरुपात असते. घरगुती क्षेत्रामध्ये व्यक्ति, असंयुक्त व्यावसायिक संस्था खाजगी आणि विश्वस्थ संस्था इत्यादीचा समावेश होतो.

**बचतीचे प्रवाह :**

भारतातील बचत ही सातत्याने व्याजदर व महागाई दर यावर थेटपणे अवलंबून असल्याने हा प्रवाह विस्कळीत स्वरुपाचा आहे. एवढे असून सुद्धा भारतातील एकूण बचत सातत्याने वाढत असल्याचे दिसून येते.

munotes.in

## ४.१२ भारतातील भांडवलनिर्मिती रचना आणि प्रवाह (STRUCTURE AND FLOW OF CAPITAL FORMATION IN INDIA)

आर्थिक क्रियाद्वारे होणाऱ्या खर्चातून निर्माण होणाऱ्या उत्पादक मालमत्तांना भांडवल असे म्हणतात. भारतात सार्वजनिक क्षेत्र, खाजगी क्षेत्र, आणि घरगुती क्षेत्राद्वारे होणाऱ्या गुंतवणूकीत निर्माण होणाऱ्या उत्पादक मालमत्ताना भांडवलनिर्मिती म्हणतात.

**भांडवलनिर्मितीची रचना :**

**१) सार्वजनिक क्षेत्र** - यामध्ये शासनाने दिलेल्या अंतर्गत व बाह्य कर्जाचा समावेश होतो. तसेच या कर्जावरील व्याजातून मिळणाऱ्या नफ्यास सार्वजनिक भांडवल म्हटले जाते. याशिवाय निर्गुंतवणूकीद्वारे शासनास मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश देखील भांडवलात केला जातो. १९९०-९१ ते १९९९-२००० या कालावधीत सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक वाढीचा दर स्थूल देशांतर्गत उत्पन्नाच्या ८.६% होता. तो २०१४-१५ साली तो ७.५% झाला. १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरणाचा स्विकार केल्यानंतर सार्वजनिक क्षेत्राची वर्चस्वाची भूमिका कमी झाली त्यामुळे सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूकीच्या दरात सातत्याने घट होत गेली.

**२) खाजगी क्षेत्र** - खाजगी क्षेत्रामध्ये कृषी क्षेत्र उद्योग क्षेत्र व सेवा क्षेत्र या तीन क्षेत्राचा समावेश होतो. १९९०-९१ ते २००३-०४ या कालावधीत खाजगी प्रमंडळ क्षेत्राची सरासरी गुंतवणूक दर स्थूल देशांतर्गत उत्पन्नाच्या ६.१% इतका होता. २०१४-१५ मध्ये तो स्थूल देशांतर्गत उत्पन्नाच्या १२.३% इतका झाला. या वाढीच्या दरास उदारीकरण कारणीभूत आहे.

**३) घरगुती क्षेत्र** - घरगुती क्षेत्रामध्ये कुटूंबाद्वारे जमीन, गृह प्रकल्प, विमा, बँक व पोस्टातील ठेवी यामध्ये होणाऱ्या गुंतवणूकीचा समावेश होतो. १९९०-९१ ते १९९९-२००० या काळात खाजगी घरगुती क्षेत्राची गुंतवणूक स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ७.९% इतकी होती ती २०११-१२ मध्ये वाढ होऊन १५.७% झाली तर २०१४-१५ या वर्षी ११% इतकी होती.

**भांडवलनिर्मितीचा प्रवाह** - अर्थव्यवस्थेची स्थिती व चलनाची क्रयशक्ती यावरुन प्रामुख्याने भांडवल निर्मितीचा प्रवाह निश्चित होत असतो. भारतामध्ये १९९१ नंतर खुल्या आर्थिक धोरणाच्या वापरामुळे भांडवलनिर्मिती मध्ये सातत्याने वाढ होत आहे. यामुळे भारतातील भांडवलनिर्मितीचा प्रवाह चढत्या स्वरुपाचा आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) भारतातील बचतीचे स्त्रोत रचना आणि प्रवाह.

२) भारतातील भांडवल निर्मिती रचना आणि प्रवाह.

munotes.in

## ४.१३ सारांश (CONCLUSION)

केन्स व त्यांच्या अनुयायानी गुणक संकल्पनेला अवास्तव महत्त्व दिले आहे. अशा प्रकारची टिका अनेक अर्थतज्ञांनी केली आहे. तरीदेखील व्यापारचक्राच्या अवस्था मोजण्यासाठी गुणकाची संकल्पना महत्त्वाची आहे. मंदीच्या काळात शासनाने करावयाच्या उपाययोजनाचे दिग्दर्शन गुणकामुळे मिळू शकते. तसेच उत्पन्न व रोजगार उच्च पातळीला टिकवून ठेवावयाचे असतील तर उत्पन्नातील विषमता कमी करणे शक्य होते हे गुणकामुळे समजते. गुणकाचे मूल्य आणि गुणकाचा कालखंड यावरुन सरकारने आपल्या गुंतवणूकीसाठी कोणती वेळ निवडावी आणि गुंतवणूक वाढीचे कालखंड कसे निवडावेत याचे मार्गदर्शन गुणकामुळे होते. थोडक्यात, आर्थिक विश्लेषणाचे एक साधन म्हणून तसेच आर्थिक धोरणाचा मार्गदर्शक म्हणून गुणकाला फार महत्त्व आहे. त्याचप्रमाणे त्वरकाच्या संकल्पनेमुळे उत्पन्न प्रसाराची प्रक्रिया अधिक स्पष्ट होण्यास मदत होते. गुणकाने उत्पन्न प्रसाराचा एक भाग स्पष्ट होतो तर त्वरकाने या प्रक्रियेचा दुसरा भाग स्पष्ट होतो. गुंतवणूक हा एकूण खर्चाचा एक घटक आहे. त्यात वाढ झाल्यास उत्पन्नावर होणारा परिणाम गुणकाने समजतो. पण एकूण खर्चाचा दुसरा घटक उपभोग खर्च हा असतो. या उपभोग खर्चात वाढ झाल्यास त्या वाढीचा गुंतवणूकीवर काय परिणाम होईल हे त्वरकाच्या सहाय्याने समजते. म्हणजेच उत्पन्न प्रसाराची प्रक्रिया संपूर्णपणे समजण्यासाठी गुणक आणि त्वरक या दोहोंचा विचार करावा लागतो. या दोन संकल्पना परस्पर पूरक आहेत.

## ४.१४ सरावासाठी प्रश्न (QUESTIONS)

१) गुंतवणूक गुणकाची प्रक्रिया स्पष्ट करा.
२) गुंतवणूक गुणकाच्या गळत्या व मर्यादा सांगा.
३) भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता व व्याज दर सबंध स्पष्ट करा.
४) भांडवलाच्या सिमान्त कार्यक्षमतेवर परिणाम करणारे अल्प व दिर्घकालीन घटक सांगा.
५) प्रवेग तत्वाचे वर्णन करा.
६) प्रवेगाच्या मर्यादा सांगा.
७) प्रवेगाची कार्यपद्धती स्पष्ट करा.
८) टिप लिहा.
   १) गुणकाच्या गळत्या
   २) गुणकाच्या मर्यादा
   ३) भारतातील भांडवलनिर्मिती रचना व प्रवाह
   ४) भारतातील बचतीची रचना
   ५) भांडवलाच्या सिमान्त कार्यक्षमतेवर परिणाम करणारे घटक

❖❖❖❖

munotes.in

मॉड्यूल ३

# घटक -५

# सार्वजनिक उत्पन्न व सार्वजनिक खर्च

# (PUBLIC REVENUE & PUBLIC EXPENDITURE)

**घटक रचना :**

५.० उद्दिष्ट्ये
५.१ शासन व सरकारी हस्तक्षेप
५.२ सामाजिक वस्तू व गुणवत्ता वस्तू
५.३ सामाजिक वस्तुचे वैशिष्ट्ये
५.४ सार्वजनिक उत्पन्नाचे स्त्रोत
५.४.१ कर उत्पन्न
५.४.२ करेतर उत्पन्न
५.५ कराघात, करभार आणि करसंक्रमण
५.६ सार्वजनिक खर्च व त्याची वैशिष्ट्ये
५.७ सार्वजनिक खर्चाचे प्रकार
५.८ तुटीच्या विविध संकल्पना
५.९ तुटीचा अर्थ भरणा
५.१० सरावासाठी प्रश्न

## ५.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

- शासन व सरकारी हस्तक्षेप या संकल्पना समजून घेणे.
- सार्वजनिक उत्पन्नाचे स्त्रोत जाणून घेणे.
- करघात, करभार व करसंक्रमण अभ्यासणे.
- सार्वजनिक खर्चाचा अभ्यास करणे.
- सार्वजनिक खर्चाचे प्रकार व वैशिष्ट्ये जाणून घेणे.
- तुटीच्या विविध संकल्पना व तुटीचा अर्थभरणा यांचा आढावा घेणे.

munotes.in

## ५.१ शासन व सरकारी हस्तक्षेप (GOVERNMENT AND GOVERNMENT INTERVENTION)

शासन किंवा सरकार ही संपुर्ण समाजाच्या हितासाठी कार्य करणारी एक संघटित संस्था आहे. मनुष्य जेव्हा समुह करुन राहू लागला, तेव्हा अंतर्गत कलह सोडविण्यासाठी एखाद्या संघटित संस्थेची गरज भासू लागली व त्यातून शासनाची निर्मिती झाली.

अर्थव्यवस्थेत चालणाऱ्या सर्व व्यवहारांबद्दल सरकारने नियम व नियंत्रण करणे म्हणजेच सरकारी हस्तक्षेप होय. अर्थव्यवस्थेत उत्पादन, उपभोग, विनिमय व वितरण या चार क्रिया होत असतात. या चार क्रिया योग्य रितीने होण्यासाठी सरकारकडून नियमावली तयार केली जाते. आणि नियमांचा भंग करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई होत असते. अशाप्रकारे सरकारी हस्तक्षेप म्हणजे अर्थव्यवस्थेत चालणाऱ्या क्रियांवर किंवा व्यवहारांवर सरकारने नियंत्रण ठेवणे होय. उदा. विविध प्रकारच्या धोरणांची आखणी व अंमलबजावणी करविषयक धोरण, खर्चविषयक धोरण, आयातनिर्यात विषयक धोरण, परकिय भांडवल विषयक धोरण इ.

## ५.२ सामाजिक वस्तू व गुणवत्ता वस्तू (PUBLIC GOODS AND MERIT GOODS)

ज्या वस्तुंचा व सेवांचा उपभोग सामुहिकरित्या घेतला जातो त्यांना सामाजिक वस्तू म्हणतात अंतर्गत शांतता व सुव्यवस्था, प्रजेचे संरक्षण, वाहतुक दळणवळण व्यवस्था, विजपुरवठा, पाणीपुरवठा, पोस्ट, दुरध्वनी व तारसेवा यांचा उपभोग सामुहिकरित्या घेतला जातो. या सेवा पुरवठ्याचे कार्य शासनच करु शकते. खाजगी व्यक्तीला या सेवा पुरविणे शक्य नसते. त्याचप्रमाणे शिक्षण, आरोग्य, अन्नाची तरतुद यासारख्या गुणवत्ता वस्तू शासनामार्फत पुरवल्या जातात. अशाप्रकारच्या वस्तुंमुळे समाजकल्याणात भर पडते.

सामाजिक वस्तु व गुणवत्ता वस्तुंची तरतुद अर्थव्यवस्थेत व्हावी आणि लोकांच्या कल्याणात भर पडावी यासाठी सरकारी हस्तक्षेप आवश्यक असतो.

## ५.३ सामाजिक वस्तुंची वैशिष्ट्ये (FEATURES OF PUBLIC GOODS)

१) **अविभाज्यता (Indivisible) :** सार्वजनिक वस्तू अविभाज्य स्वरुपाच्या असतात म्हणजेच या वस्तूंचा उपभोग सर्वच उपभोक्त्यांकडून एकाचवेळी सामुहिकरित्या घेतला जातो.

२) **अवर्तन (Non-exclusion) :** खाजगी वस्तूच्या बाबतीत जे त्या वस्तूची किंमत देत नाहीत त्यांना त्या वस्तुचा उपभोग घेता येत नाही. याऊलट सार्वजनिक वस्तुंच्या बाबतीत अवर्तन तत्वाचा वापर करता येत नाही. उदा. समुद्रातील दीपस्थंभाचा उपयोग सर्वच जहाजांना सारखाच होतो व कोणालाही अवर्तन करता येत नाही.

३) **नफा हेतू नसतो (No Profit Motive) :** खाजगी वस्तूंचा हेतू नफा हा असतो तर सार्वजनिक वस्तुंचा हेतू सामाजिक उद्धार हा असतो.

४) **घटता उत्पादन खर्च (Dimiishing Production Cost) :** सर्व वस्तूच्या उत्पादनासाठी सीमांत खर्च शून्य असतो. म्हणजेच एका उपभोक्त्यात वाढ झाल्यामुळे एकूण उत्पन्न खर्चात वाढ होत नाही व सरासरी उत्पादन खर्चात घट होते.

## ५.४ सार्वजनिक उत्पन्नाचे स्त्रोत (SOURCES OF PUBLIC REVENUE)

सरकारला सर्व मार्गांनी मिळणारे उत्पन्न म्हणजे सार्वजनिक उत्पन्न होय. सरकारला विविध मार्गांनी उत्पन्न मिळते, त्यात कर, कर्ज, जामीन, दंड, नुकसान भरपाई, देणग्या, अनुदान स्टॅम्प ड्युटी, नोंदणी फी, परवाना फी, विविध प्रकारचे आकार, लाभांश, खंड, भाडे, तुटीचा अर्थभरणा इ. मार्गांचा समावेश केला जातो. या सर्व मार्गांमध्ये कर हे सरकारी उत्पन्नाचे प्रमुख व प्रभारी साधन आहे. बहुतेक सर्व देशात शासनाला करांपासून जास्त उत्पन्न प्राप्त होते. तसेच कर परत करण्याची जबाबदारी नसते. वर्तमान काळात सरकारी खर्चात प्रचंड वाढ झाली आहे. हा खर्च भरुन काढण्यासाठी सरकारला जास्तीचे उत्पन्न मिळवावे लागते व उत्पन्नाच्या नविन स्त्रोतांचा शोध घ्यावा लागतो. सामान्यतः सार्वजनिक उत्पन्नाचे स्त्रोत दोन घटकांत विभागले जातात.

अ) कर उत्पन्न

ब) करेत्तर उत्पन्न

### ५.४.१ कर उत्पन्न :

कर हे सरकारी उत्पन्नाचे प्रमुख व प्रभावी साधन आहे. करांपासून सरकारला जास्तीत जास्त उत्पन्न प्राप्त होते. कराची व्याख्या वेगवेगळ्या अर्थतज्ञांनी पुढीलप्रकारे केल्या आहेत.

१) **ॲडम स्मिथ :** “कर म्हणजे राज्यासाठी लोकांनी केलेले योगदान होय.”

२) **फेड्रीक टेलर :** “कोणत्याही लाभाची अपेक्षा न करता नागरिकांनी सरकारला दिलेले सक्तीचे अंशदान म्हणजे कर होय.”

३) **डॉ. डाल्टन :** कर हे सक्तीचे देणे असून त्याचा सममूल्य सेवेशी काहीही संबंध नसतो.

**करांची वैशिष्ट्ये :**

१) कर हे सक्तीचे देणे असते.

२) कराच्या रक्कमेचा वापर समाज कल्याणासाठी केला जातो.

३) कर भरल्याने व्यक्तीला प्रत्यक्ष फायदा मिळत नाही.

४) कर वसुलीला कायद्याची मान्यता असते.

**करांचे वर्गीकरण :**

अ) प्रत्यक्ष कर

ब) अप्रत्यक्ष कर

**अ) प्रत्यक्ष कर :** प्रा. मिलच्या मतानुसार जेव्हा सरकारचा उद्देश ज्या व्यक्तीवर कर आकारला त्याच व्यक्तीने तो भरावा असा असतो. तेव्हा तो प्रत्यक्ष कर होय. प्रत्यक्ष कराचा कारभार जेव्हा एकाच व्यक्तीवर किंवा संस्थेवर पडतो त्यास प्रत्यक्ष कर संबोधतात. प्रत्यक्ष कराच्या बाबतीथ संक्रमण (shifting) मुळीच होत नाही.

**अ) प्रत्यक्ष कराचे गुण (Merits of direct tax) :** प्रत्यक्ष करात पुढील गुण प्राकर्षाने दिसून येतात.

१) **समता (Equity) :** प्रत्यक्ष कराचा भार गरिबांच्या तुलनेत श्रीमतांवर अधिक पडतो. कारण प्रत्यक्ष कर हे पुरोगामी स्वरुपाचे असतात व त्यामुळे ते समता तत्वाची प्रतिस्थापना करतात.

२) **काटकसर (Economy) :** प्रत्यक्ष करात काटकसरीचे किंवा आर्थिकतेचे तत्व दिसून येते. प्रत्यक्ष कर वसूल करण्याचा खर्च तुलनेत कमी येतो कारण करदाता स्वतःच प्रत्यक्ष कराची रक्कम सरकारला देतो.

३) **निश्चितता (Certainity) :** प्रत्यक्ष कराबाबत करदात्याला तो किती भरावयाचा, केव्हा व कुठे द्यावयाचा, कराचे दर त्याबाबत निश्चित अशी माहिती असते. तसेच प्रत्यक्ष करापासून सरकारला किती उत्पन्न मिळेल. याचा अंदाज घेता येतो व त्यानुसार खर्चाची व्यवस्था करता येते.

४) **लवचिकता (Elasticity) :** प्रत्यक्ष कर उत्पादक लवचिक आहेत. त्याचा उत्पादनावर अनिष्ठ परिणाम होत नाही. तसेच प्रत्यक्ष कराच्या दरात बदल करुन राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करता येते एवढे नव्हे तर लोकांच्या उत्पन्नात जसजशी वाढ होते तसतशी या करापासून मिळणाऱ्या उत्पन्नात आपोआप वाढ होते.

५) **आर्थिक विषमतेत घट (Reduction in Inequalities) :** प्रत्यक्ष कर हे पुरोगामी स्वरुपाचे असतात. वाढत्या उत्पन्नाला कराचे दर वाढते असतात. त्यामुळे प्रत्यक्ष कराचा श्रीमंतावर अधिक भार पडतो. परिणामतः आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होते.

६) **जागरुकता (Conciosness) :** प्रत्यक्ष कराच्या बाबतीत सरकार व करदाते यांचा प्रत्यक्ष संबंध येत असल्यामुळे ते सरकारच्या खर्चाविषयी जागरुक असतात. कर देता याची जाणीव होत असल्यामुळे करदाते सरकारच्या खर्चाकडे बारकाईने लक्ष ठेवतात.

**ब) प्रत्यक्ष कराचे दोष (Demerits of Direct Taxes) :**

प्रत्यक्ष करांचे दोष खालीलप्रमाणे आढळून येतात.

१) **अप्रिय कर (Unpopular) :** प्रत्यक्ष कर हा अप्रिय असतो कारण तो इतरांवर ढकलता येत नाही. करदात्याला कराचा भार स्वतःच सहन करावा लागतो.

munotes.in

२) **कर टाळणे (Tax Fusion) :** अप्रामाणिक व्यक्ती सरकारला खोटी माहिती पुरवून प्रत्यक्ष कर टाळू शकते. परंतु प्रत्यक्ष कर पूर्णपणे भरावा लागतो म्हणूनच प्रत्यक्ष कर हा प्रामाणिकपणा वरील कर आहे असे म्हटले आहे.

३) **गैरसोय (Inconvinient) :** कर निर्धारण होण्यासाठी करदात्याला द्यावे लागतात. उत्पन्नाचे स्त्रोत करावे लागतात व कराची रक्कम एकाच हप्त्यात भरावी लागते. त्यामुळे हे कर गैरसोयीचे ठरतात.

४) **काटकसरीचा अभाव (Uneconomical) :** प्रत्यक्ष कर वसूल करताना प्रत्येक करदात्याला कागदपत्रांची तपासणी व मूल्यांकन करावे लागते. त्यामुळे करवसुलीचा खर्च वाढतो. हे मितव्ययता तत्वाच्या विरुद्ध आहे.

५) **अन्यायाची शक्यता (Possibility of Injustice) :** आयकर हा उत्पन्नावरील कर होय. परंतु लोकांच्या उत्पन्नाचे व संपत्तीचे बिनचूक मोजमाप करणे कठीण असते त्यामुळे काही करदात्यांवर अन्याय होण्याची शक्यता असते.

प्रत्यक्ष कराचे हे दोष प्रशासकीय यंत्रणेच्या कारभारातून निर्माण झालेले आहेत. त्यांना मुलभूत तत्वाचा आधार नाही. विद्यमान परिस्थितीला प्रत्यक्ष कर हे लाभदायक व अनिवार्य ठरलेले आहेत.

अ) **अप्रत्यक्ष कर (Indirect Taxes) :** अप्रत्यक्ष कराची व्याख्या पुढीलप्रमाणे :

१) कराधात व करभार एकाच व्यत्तीवर न पडता निरनिराळ्या व्यक्तीवर पडत असेल तर त्यास अप्रत्यक्ष कर म्हणतात.

२) **प्रो. जे. एस. मिल :** "एखाद्या व्यक्तीवर कर आकारल्यानंतर ती व्यक्ती तो कर दुसऱ्या व्यक्तीकडून वसूल करुन भरेल अशी शासनाची अपेक्षा करते. अशा कराला अप्रत्यक्ष कर म्हणतात."

३) **डॉ. डाल्टन :** "ज्या व्यक्तीवर कर आकारला जातो त्या व्यक्तीकडून तो भरला जात नाही तर दुसऱ्या व्यक्तीकडून भरला जातो तेव्हा त्यास अप्रत्यक्ष किंवा परोक्ष कर असे म्हणतात."

**अप्रत्यक्ष कराचे गुण व दोष (Merits and Demerits of Indirect Taxes) :**

**अ) अप्रत्यक्ष कराचे गुण (Merits of Indirect Taxes) :**

१) **लवचिकता (Elasticity) :** सरकार या करामध्ये केव्हाही वाढ करु शकते व आपले उत्पन्न वाढवू शकते. त्यामुळे अप्रत्यक्ष कर हे लवचिक असतात.

२) **सोयीस्कर (Convienient) :** अप्रत्यक्ष कर हे एकाच हप्त्यात द्यावे लागत नाही. हे वस्तू व सेवांच्या किंमतीमध्ये समाविष्ट असतात. त्यामुळे कर देतो त्याची जाणीव होत नाही व त्यांचाही भार वाटत नाही.

३) **पुरोगामी होवू शकतात (Can be Progressive) :** चैनीच्या वस्तूवर मोठ्या प्रमाणावर कर आकारुन व आवश्यक वस्तू करमुक्त ठेवून अप्रत्यक्ष कर पूरोगामी बनू शकतात.

४) **कर टाळता येत नाही (Difficult to Avoide Tax) :** अप्रत्यक्ष कर वस्तूच्या किंमतीत समाविष्ट असल्यामुळे ते टाळता येत नाहीत. वस्तु खरेदी करतानाच हे कर द्यावे लागतात.

५) **उत्पादक (Productive) :** अप्रत्यक्ष करात उत्पादकता हा गुणधर्म असतो. ज्या वस्तूची मागणी अलवचिक आहे. अशा ठराविक वस्तूवर अधिक करारोपण केल्यास सरकारला अप्रत्यक्ष करापासून भरपूर उत्पन्न मिळू शकते.

६) **व्यापक आचार (Broad Based) :** अप्रत्यक्ष कर हे समाजातील सर्व व्यक्तीवर आकारण्यात येतात त्यामुळे ह्या कराचा आचार व्यापक असतो.

७) **सामाजिक कल्याण (Social Welfare) :** ज्या वस्तू आरोग्य, विघातक तसेच अनावश्यक आहेत अशा वस्तूंवर मोठ्या प्रमाणात कर लावून त्याचा उपयोग मर्यादित किंवा बंद करणे अप्रत्यक्ष करामुळे शक्य होते.

**ब) अप्रत्यक्ष कराचे दोष (Demerits of Indirect Taxes) :**

१) **प्रतिगामी स्वरुपाचे (Regressive in Nature) :** अप्रत्यक्ष करामुळे श्रीमंतापेक्षा गरीबावर अधिक कर भार पडतो. म्हणून अप्रत्यक्ष कर हे प्रतिगामी स्वरुपाचे असतात.

२) **अनिश्चितता (Uncertainity) :** अप्रत्यक्ष करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा सरकारला निश्चित अंदाज करता येत नाही.

३) **वसुलीचा खर्च जास्त (Uneconomical) :** अप्रत्यक्ष कराच्या वसुलीचा खर्च मोठ्या प्रमाणावर येतो. कर निर्धारण व वसूली ह्याकरिता फार मोठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज ठेवावी लागते. अप्रत्यक्ष कर लहान लहान रक्कमांपैकी असंख्य लोकांकडून वसूल करावे लागतात. त्यामुळे वसुलीचा खर्च बराच जास्त असतो.

४) **बचतीवर प्रतिकूल परिणाम (Unfavourable effect on Saving) :** हे वस्तूवरील कर असल्यामुळे वस्तूच्या किंमतीत समाविष्ट असतात. त्यामुळे लोकांचा खर्च वाढून बचत कमी होते.

५) **जागरुकता नसते (Unconciousness) :** अप्रत्यक्ष करांचा हा वस्तूच्या किंमतीत समाविष्ट असल्यामुळे तो देताना जाणवत नाहीत त्यामुळे करदात्यामध्ये जागरुकता निर्माण होत नाही. सरकार आपल्या पैशाचा कसा उपयोग करते ह्याबाबत नागरिक उदासीन असतात.

### ५.४.२ करेतर उत्पन्न (Non Tax revenue) :

सरकारला मिळणाऱ्या उत्पन्नाचा सर्वात महत्त्वाचा मार्ग हा कर जरी असला तरी कराव्यतिरिक्त मिळणाऱ्या उत्पन्नाचाही, एकूण खर्चात महत्त्वाचा वाटा असतो. करेतर उत्पन्नामध्ये खालील मार्गाचा समावेश होतो :

१) **अनुदान व देणग्या (Grants and Gifts) :** एक सरकार दुसऱ्या सरकारला जे अर्थसहाय्य करते त्यास अनुदाने म्हणतात. म्हणजेच केंद्र सरकारकडून राज्यसरकारला तसेच राज्यसरकारकडून स्थानिक सरकारला जी सार्वजनिक अथवा विशेष आर्थिक मदत

केली जाते त्यास अनुदाने म्हणतात. उदा. भारत सरकार पाणीपुरवठा योजना, पुनर्वसन योजना, झोपडपट्टी सुधारणा, रस्ते बांधणे, घरकुल योजना इत्यादी.

सरकारला जे खाजगी संसथेकडून अथवा व्यक्तीकडून जी आर्थिक मदत मिळते त्यास देणग्या असे म्हणतात. देणग्या ह्या नैसर्गिक आपत्ती, युद्ध यावेळी देशप्रेम व जनकल्याण या भावनेने दिल्या जातात. उदा. महाराष्ट्रातील लातूर परिसरात भूकंप झाल्यानंतर अनेक संस्थांनी भूकंपग्रस्तांना पुनर्वसनासाठी देणग्या दिल्या होत्या.

२) **प्रशासकीय उत्पन्न (Administrative Revenue) :** प्रशासकीय उत्पन्नात पुढील बाबींचा समावेश केला जातो.

i) शुल्क (Fees)
iii) परवाना शुल्क (Licenses)
iii) दंड (Fine)

जर सरकार एखादी सेवा उपभोगावयाची असेल तर त्यास शुल्क भरावे लागते. उदा. जन्म, मृत्यु, विवाह नोंदणी शुल्क इ.


व्यक्तींना किंवा संस्थांना एखादा उद्योग किंवा सेवा सुरु करण्यापूर्वी सरकारकडून परवाना मिळवावा लागतो. तेव्हा त्यास परवाना शुल्क भरावे लागते. उदा. मोटार, वाहतूक, उद्योग परवाना.

एखाद्या व्यक्तीने किंवा संस्थेने सरकारच्या नियमावलीचे उल्लंघन केल्यास त्यास दंड भरावा लागतो. उदा. वाहतूक नियमाचे उल्लंघन, रेल्वे नियमांचे उल्लंघन, कर नियमांचे उल्लंघन केल्यास दंड भरावा लागतो.

३) **व्यापारी उत्पन्न (Commercial Revenue) :** सरकार, सरकारी उद्योगाद्वारे काही आवश्यक वस्तू आणि सेवांचे उत्पादन होऊन त्यांचा पुरवठा करीत असते. हा सरकारी उत्पन्नाचा प्रमुख भाग आहे. उदा. पोस्ट खात्याचे उत्पन्न, रेल्वेचे उत्पन्न, व्याज, सरकारी कारखाने यांचे उत्पन्न इ.

अशाप्रकारे सार्वजनिक उत्पन्नाचे कर व करेतर उत्पन्न असे दोन मार्ग आहेत व पुढील तक्त्याद्वारे ते समजणे अजून सोपे होईल.

**तक्ता क्र. ५.१ सार्वजनिक उत्पन्न**



## ५.५ कराघात, करभार आणि करसंक्रमण (IMPACT, INCIDENCE & SHIFTING OF TAX)

कराघात, करभार आणि करसंक्रमण या तिन्ही संकल्पना कर आकारणीशी संबंधित आहेत. कर आकारणी व वसूली या प्रक्रियेत वरील तीन्ही संकल्पनांचा समावेश केला जातो. ज्या व्यक्तीवर कर आकारला जातो त्याच व्यक्तीकडून तो वसूल केला जात नाही. कर आकारला जाणारी व्यक्ती वेगळी असते आणि कर देणारी व्यक्ती वेगळी असते. या बाबींशी कराघात, करभार, करसंक्रमण या संकल्पना संबंधित आहेत.

### अ) कराघात (Impact of tax) :

कराचा आघात ज्या व्यक्तिवर सुरुवातीला पडतो त्यास कराघात म्हणतात. ज्या व्यक्तीवर सुरुवातीला कराघात पडतो ती व्यक्ती कायदेशीररित्या कर भरण्यास जबाबदार असते. त्या व्यक्तीवर करघात होत असतो. उदा. शासन उत्पादकांवर सुरुवातीला कर आकारतो तेव्हा उत्पादकांना सरकारने त्यांच्यावर जेवढ्या रकमेची कर आकारणी केलेली आहे तेवढा कर भरावा लागतो. म्हणजेच त्यांच्यावर कराघात पडत असतो.

### ब) करभार (Incidence of tax) :

सार्वजनिक सत्तांनी लावलेल्या कराचे ओझे अंतिमतः कुणावर पडते हे सांगणे म्हणजे करभार होय. कराचा भार शेवटी ज्या व्यक्तीला सहन करावा लागतो त्यास करभार म्हणतात. करसंक्रमणाची प्रक्रिया जेथे संपते तेथे करभार पडतो. कराचा भार सहन करणारी व्यक्ती अंतिम उपभोक्ता असते. ती कुणाकडेही कर ढकलू शकत नाही तर स्वतः कराचा भार सहन करत असते.

**करभारावर परिणाम करणारे घटक (Factors affecting incidence of tax) :**

**१) वस्तु व सेवांची मागणी** - वस्तु व सेवांच्या मागणीवर करभार अवलंबून असतो. वस्तु व सेवांची मागणी वाढल्यास करभारात वाढ होते. याउलट वस्तु व सेवांच्या मागणीत घट झाल्यास करभारात घट होते.

**२) वस्तुचे स्वरुप** - अन्नधान्यासारख्या जीवनावश्यक वस्तुंच्या किंमतीत वाढ झाली तर लोकांची मागणी कमी होत नाही म्हणून जीवनावश्यक वस्तुंवर जास्त करभार असतो. याउलट चैनीच्या वस्तुंची मागणी लवचिक असल्याने, त्यांच्या किंमती वाढल्यास त्यांची मागणी कमी होते. म्हणून चैनीच्या वस्तुंवर कमी करभार असतो.

**३) करांचे दर** - करांचे दर जास्त असल्यास करभार जास्त असतो, आणि करांचे दर कमी असल्यास करभार कमी असतो. कारण शासनाकडून आकारल्या जाणाऱ्या कराचे पूर्णपणे संक्रमण पुढच्या व्यक्तीकडे होत असते.


**४) पुरवठ्याचे स्वरुप** - पुरवठा लवचिक असेल व त्यात तात्काळ वाढ करता येत असेल तर करभार कमी असतो. कारण ज्या वस्तुंचा पुरवठा जास्त, त्यांची खरेदी आवश्यकतेप्रमाणे केली जाते. याउलट पुरवठा अलवचिक असल्यास व त्यात तात्काळ वाढ होत नसेल तर मनुष्य अशा वस्तुंची खरेदी करुन ठेवतो म्हणून पुरवठा अलवचिक असेल तर करभार जास्त असतो.

**५) उत्पन्नाचे स्वरुप** - व्यक्तीचे उत्पन्न जास्त असल्यास मागणी जास्त असते आणि मागणी जास्त असते म्हणून करभार जास्त असतो. याउलट उत्पन्न कमी असल्यास मागणी कमी असते आणि मागणी कमी म्हणून करभारही कमी असतो.

**६) तेजी, मंदीची परिस्थिती** - तेजीच्या परिस्थितीत लोकांच्या हातात उत्पन्न जास्त असते व ते मागणी जास्त करत असतात म्हणून करभार जास्त असतो. याउलट मंदीच्या परिस्थितीत लोकांच्या हातात उत्पन्न कमी असते, मागणीत घट झालेली असते त्यामुळे करभार कमी असतो.

**करभाराचे प्रकार :**

डॉ. डाल्टन यांनी पुढील करभाराचे प्रकार सांगितले आहेत.




**१) मौद्रिक करभार** - मौद्रिक करभार म्हणजे पैशाच्या रुपात दिल्या जाणारा कर. व्यक्ती आपल्या उत्पन्नातून विशिष्ट रक्कम कर म्हणून देते तेव्हा तिच्यावर मौद्रिक करभार घडत असतो. मौद्रिक करभाराचे पुढील दोन प्रकार आहेत.

**अ) प्रत्यक्ष मौद्रिक करभार** - व्यक्ती मुद्रेच्या किंवा पैशाच्या स्वरुपात जी रक्कम सरकारला देते तो कराचा प्रत्यक्ष मौद्रिक भार होय. व्यक्ती आपल्या उत्पन्नातून हा कर देत असते.

**ब) अप्रत्यक्ष मौद्रिक करभार** - ज्यावेळेस कर उत्पन्न मिळविण्याआधीच वसूल केले जातात त्यास अप्रत्यक्ष मौद्रिक करभार असे म्हणतात. उदा. उत्पादन, व्यापारी, उत्पन्न मिळण्याआधीच कर देत असतात. वस्तुची विक्री झाल्यानंतर ते हा कर वसूल करतात.

**२) वास्तविक करभार** - कर दिल्यामुळे व्यक्तींना जो त्याग सहन करावा लागतो त्याला वास्तविक करभार असे म्हणतात. वास्तविक करभाराचे दोन प्रकार पुढीलप्रमाणे -

**अ) प्रत्यक्ष वास्तविक करभार** - कर दिल्यामुळे व्यक्तीला आपल्या सुखाचा त्याग करावा लागतो. आपल्या गरजा कमी कराव्या लागतात, हा त्याग म्हणजेच वास्तविक करभार होय.

**ब) अप्रत्यक्ष वास्तविक करभार** - कर आकारणीमुळे वस्तुची किंमत वाढते त्यामुळे त्या वस्तुची मागणी कमी होते. म्हणजेच तीचा उपभोग कमी होतो हा अप्रत्यक्ष वास्तविक करभार होय.

**क) कर संक्रमण -**

कर दुसऱ्याकडे ढकलण्याच्या प्रक्रियेस कर संक्रमण म्हणतात. ज्या व्यक्तीवर कर आकारला जातो ती व्यक्ती शासनाला कर देते पण ती व्यक्ती कराचा भार सहन करतेच असे नाही. ती व्यक्ती तो कर पुढे किंवा मागे ढकलते. या कर ढकलण्याच्या प्रक्रियेत करसंक्रमण म्हणतात. त्याचे दोन प्रकार पुढीलप्रमाणे -

munotes.in

**१) पुढे होणारे कर संक्रमण / पुरोगामी कर संक्रमण -**

जेव्हा कर पुढे ढकलला जातो तेव्हा त्याला पुरोगामी कर संक्रमण म्हणतात. उदा. जेव्हा उत्पादकावर कराघात होतो तेव्हा हा कर तो किरकोळ विक्रेत्याकडे ढकलतो व किरकोळ विक्रेता ग्राहकाकडे ढकलतो, अशाप्रकारे पुरोगामी करसंक्रमण होऊन ही प्रक्रिया ग्राहकांवर येऊन थांबते.

**२) मागे होणारे करसंक्रमण / प्रतिगामी करसंक्रमण -**

जेव्हा कर मागे ढकलला जातो तेव्हा त्यास प्रतिगामी करसंक्रमण म्हणतात. उदा. उत्पादकाकडून कच्च्या मालाचा पुरवठा करणाऱ्या व्यापाराकडे आणि कच्च्या मालाचा पुरवठा करणाऱ्या व्यापाऱ्याकडून कराच्या मालाच्या उत्पादकाकडे कराचे संक्रमण होऊ शकते. या प्रक्रियेला मागे होणारे करसंक्रमण असे म्हणतात.

**करसंक्रमणाचे सिद्धांत :**

करदाता करसंक्रमण का करतो? कसे करतो? कोणत्या दिशेने करतो? त्यामागचे कारण, या सर्व प्रश्नांची योग्य उत्तरे मिळाली तरच करभारासंबंधी अचूक अभ्यास करणे शक्य होते. निरनिराळ्या अर्थशास्त्रज्ञांनी करांचे संक्रमण कसे होते, यावर पुढील प्रमुख सिद्धांत मांडले आहेत.

**१) केंद्रिकरण सिद्धांत (Concentration Theory) :** करसंक्रमाचा केंद्रिकरण सिद्धांत मांडण्याचे श्रेय निसर्गवादी अर्थशास्त्रज्ञांना दिले जाते. त्यांच्यामते सर्व करांचे ओझे शेवटी समाजातील एका घटकावर केंद्रित होते. म्हणून त्याला केंद्रिकरण सिद्धांत म्हणतात. निसर्गवादी अर्थशास्त्रज्ञांच्या मते कराचा भार शेवटी जमिनदार वर्गावर पडतो. कारण ही निर्वाहपातळी खाली असल्याने त्यावर कर बसविता येत नाही. व्याज हे भांडवलाच्या वापराबद्दल दिले जाते. त्यामुळे भांडवलावरही कर बसविता येत नाही. फक्त भूमीवर कर बसविणे शक्य असते. म्हणून सर्व करांचा भार शेवटी भूमीमालकावर किंवा जमिनदारावर पडतो, म्हणून सर्व कर भूमीच्या उत्पन्नातूनच दिले जातात. निसर्गवादी अर्थशास्त्रज्ञांच्या मते विविध प्रकारचे कर रद्द करुन फक्त भूमीच्या उत्पन्नावर कर आकारण्यात यावा.

**२) विकेंद्रीकरण किंवा प्रसरण सिद्धांत (Diffusion Theory) :** फ्रेंच अर्थतज्ञ प्रो. मॅन्सफिल्ड व कॅनार्ड यांच्या मते, कराचा भार कोणत्याही एका वर्गावर केंद्रित होत नसतो तर करभाराचे वितरण होऊन सर्व समाजघटकाला कर भरावे लागतात. करसंक्रमणाच्या सहाय्याने कराच्या ओझ्याचे विभाजन किंवा वाटणी होत राहते. याचा अर्थ कराचे संक्रमण होत असल्याने करभार विकेंद्रित होतो. प्रा. मॅन्सफिल्ड यांनी याबाबतीत असे म्हटले आहे, तळ्यात पडणाऱ्या दगडाने जशी वलये तयार होतात तसेच करभाराचे असते.

प्रा. कॅनार्ड यांनी असे म्हटले आहे की, भूमी, श्रम व भांडवल कर योग्य अधिवयाची निर्मिती करतात आणि क्रय विक्रयाच्या व्यवहारातून करांचे समाजाच्या विविध घटकांमध्ये वितरण होते. याचाच अर्थ करभार विकेंद्रित होतो.

**३) आधुनिक सिद्धांत :** करसंक्रमणाच्या आधुनिक सिद्धांत हा डॉ. मार्शलच्या सिद्धांतावर आधारित आहे. प्रा. सेलिगमन आणि प्रा. एजवर्थ यांनी डॉ. मार्शल यांचा मूल्य सिद्धांत आधारभूत मानून करसंक्रमणाबाबत जे विचार मांडले आहेत त्यांना करसंक्रमणाचा आधुनिक सिद्धांत म्हणतात.

आधुनिक सिद्धांतानुसार कर हा उत्पादन खर्चाचा एक भाग असतो आणि तो किंमतीमध्ये समाविष्ट केला जातो. म्हणूनच कर संक्रमण किंमतीत बदल होऊनच घडून येते. जर कराचा काहीच परिणाम किंमतीवर होत नसेल तर ते संक्रमित केले जात नाही. करसंक्रमण व करभार या दोन्ही गोष्टी किंमत निर्धारण प्रक्रियेवर अवलंबून असतात. आणि किंमत निर्धारण प्रक्रिया ही मागणी पुरवठ्याच्या संकलनातून ठरते. म्हणून जे घटक मागणी आणि पुरवठ्याला प्रभावित करतात तेच घटक करभार, करसंक्रमण प्रक्रियेवरही परिणामकारक ठरतात.

## ५.६ सार्वजनिक खर्च (PUBLIC EXPENDITURE)

सार्वजनिक अपव्ययाचा महत्त्वाचा भाग म्हणजे सार्वजनिक खर्च हा होय. अलिकडच्या काळात सार्वजनिक खर्चाचे महत्त्व वाढत आहे. पूर्वीच्या काळी सरकारची कार्ये मुख्यत्वे करुन अंतर्गत शांतता व परकीय आक्रमणापासून संरक्षण यापर्यंत मर्यादित होती. परंतू आज सरकारची कार्ये मोठ्या प्रमाणावर वाढली आहेत. आणि लोक कल्याणकारी राज्य ही संकल्पना सर्वसामान्य झाली आहे. १९३० च्या महामंदीच्या काळानंतर खर्चाचे महत्त्व प्रा. जे.एम. केन्स यांनी पूर्ण रोजगार निर्माण करण्याच्या दृष्टीने मान्य केले होते.

ॲडॉल्फ वॅगनर या जर्मन अर्थशास्त्रज्ञाने फार पूर्वी आधुनिक अर्थव्यवस्थेत राज्याच्या वाढत्या उपक्रमाबाबतच्या सिद्धांत मांडला होता. त्यांच्या निरिक्षणात आले की जगात सर्वत्र सरकारी खर्च वेगवेगळ्या कारणाने वाढत गेला आहे. सरकारला विविध स्वरुपाची कार्ये तर करावी लागतात पण याशिवाय संरक्षण, शिक्षण, दळणवळण इत्यादी परंपरांगत स्वरुपाच्या कार्यावर सरकारला खर्च करावा लागतो. विकसित व अविकसित अशा दोन्ही अर्थव्यवस्थेत हा खर्च सतत वाढतो आहे.

**सार्वजनिक खर्चाची वैशिष्ट्ये :**

१) संरक्षण मुलभूत उद्योग त्यावरील सरकारचा खर्च अनिवार्य असतो तो खाजगी संस्था किंवा व्यक्ती करु शकत नाही.

२) सार्वजनिक खर्चाचा उद्देश हा नफा मिळवणे नसून महत्तम सामाजिक लाभ हा असतो. खाजगी खर्चाचा उद्देश महत्तम नफा प्राप्त करणे हा असतो.

३) काही अतिमहत्त्वाचे खर्च देखील सरकार स्वतः करतो. उदा. शिक्षण, स्वास्थ्य, म्हातारपणाची तरतूद.

४) सरकारी खर्चाचा व्याप सतत वाढत असल्यामुळे सरकारी खर्चात वाढ सतत वाढ होत असते.

५) सरकारी खर्च हा काही वेळा अनावश्यक असतो. काही विशिष्ट भावना जाणण्याकरिता, काही रुढी व संकेत पाळण्याकरिता तो करावा लागतो म्हणून तो अनावश्यक असला तरी टाळता येत नाही.

munotes.in

## ५.७ सार्वजनिक खर्चाचे प्रकार (CLASSIFICATION OF PUBLIC EXPENDITURE)

**१) महसूली खर्च आणि भांडवली खर्च:**

भारताच्या अंदाजपत्रकाचे दोन भागात विभाजन केले जाते, अ) महसूली खाते, ब) भांडवली खाते. महसूली खात्यावर महसूली उत्पन्न आणि महसूली खर्चाचा समावेश केला जातो. तर भांडवली खात्यावर भांडवली उत्पन्न आणि भांडवली खर्चाचा समावेश केला जातो.

**अ) महसूली खर्च** - महसूली खर्चालाच ‘चालू खर्च’ असे म्हणतात. महसूली खर्च म्हणजे असा खर्च वाढ होत नाही किंवा सरकारची देणी समाप्त होत नाही. महसूली खर्च हा सरकारच्या दैनंदिन बाबींवर होणारा खर्च असतो. महसूली खर्चाचे योजना खर्च व योजनेवर खर्च असे वर्गीकरण केले जाते. केंद्र सरकारच्या योजना महसूली खर्चात कृषी व कृषीशी संबंधित व्यवहार, ग्रामीण विकास जलसिंचन व पूरनियंत्रण, ऊर्जा, उद्योग व खनिज, वाहतूक व दळणवळण, विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण, सामान्य व सामाजिक सेवा, शिक्षण, आरोग्य इ. वरील चालू खर्चाचा समावेश केला जातो तर योजनेतर महसूली खर्चा व्याज, संरक्षण, अनुदान, निवृत्ती वेतन, पोलिस, अर्थ साहाय्य, नैसर्गिक आपत्ती निवारण खर्चाचा समावेश केला जातो.

**ब) भांडवली खर्च** - भांडवली खर्च म्हणजे असा खर्च की ज्यामुळे देशाच्या मालमत्तेत वाढ होते. सरकारची देणी कमी होतात. भांडवली खर्चाचा संबंध दीर्घकाळाशी येत असतो. भांडवली खर्चाचेही योजना खर्च व योजनेतर खर्च असे वर्गीकरण केले जाते. योजना खर्चात केंद्रसरकारच्या विविध विकासात्मक योजना, राज्यांना विकासात्मक योजनांसाठी दिलेले अनुदान, मदत इ. चा समावेश केला जातो. तर योजनेतर खर्चात भांडवली संरक्षण खर्च, सार्वजनिक उपक्रमांना कर्ज, राज्यांना कर्ज, विदेश सरकारला कर्ज इ. खर्चाचा समावेश केला जातो.

**२) विकास व विकासेतर खर्च (Development and Non-development expenditure) :** अंतर्गत सुरक्षितता, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी केला जाणारा खर्च हा विकासेतर खर्च समजला जातो. उदा. सार्वजनिक कर्जाचे व्याज, पोलिस, तुरुंग, न्यायालय, सैन्य इत्यादी बाबींवरील खर्च या स्वरपाचा असतो.

विकास खर्चात जलसिंचन, प्रकल्प, रेल्वे व रस्ते वाहतूक, शेती व औद्योगिक विकास इत्यादी दिर्घकालीन खर्चाचा समावेश केला जातो. शिक्षण व संशोधन यावरील खर्चही विकास खर्च मानला जातो.

**अनुदान (Subsidy) :** शासकीय अनुदान हे शासनाने व्यक्ती, व्यापारी वा संस्थांना दिलेले लाभ होय. बहुतेकवेळा हे पैसा किंवा करसवलत अशा प्रकारे दिली जाते. भारतात अनुदान खर्च हा शासनाचा मोठा खर्च आहे.

munotes.in

## ५.८ तुटीच्या संकल्पना (CONCEPTS OF DEFICIT)

देशाचे अंदाजपत्रक तयार करताना आघामी आर्थिक वर्षात जमा होणारा महसूल आणि करावा लागणारा खर्च यांचा विचार होत असतो. अनेक राष्ट्रांमध्ये विकासखर्च व विकासेतर खर्च वाढल्याने अंदाजपत्रकात तूट निर्माण होत असते. अशावेळी त्या देशाच्या शासनास तुटीचा अर्थभरणा करावा लागतो. लोकांकडून उचल घेणे, मध्यवर्ती बँकेकडून उचल घेणे अशा मार्गांचा अवलंब केला जातो.

**तुटीच्या विविध संकल्पना :**

**१) महसूली तूट (Revenue deficit) :** शासनाच्या अंदाजपत्रकात जमा होणारी महसूली प्राप्ती आणि महसूली खर्च यांचा समावेश होतो. जेव्हा महसूली खर्च हा महसूली प्राप्तीपेक्षा जास्त असतो तेव्हा महसूली तूट निर्माण होते. शासनाला महसूली प्राप्ती दोन स्त्रोतांपासून होते, ते म्हणजे कर व करेतर स्त्रोत अनेक प्रत्यक्ष कर जसे आयकर, व्यवसाय कर, इत्यादी तसेच अप्रत्यक्ष कर जसे, विक्रिकर यांपासून आणि विविध करेतर स्त्रोतांपासून उदा. कर्जावरील प्राप्त झालेले व्याज, दंड, शिक्षा, शुल्क, लाभांश इत्यादी मार्गातूनही सरकारी तिजोरीत महसूल जमा होतो. त्याचप्रमाणे सरकारला घेतलेल्या कर्जावरील देणी देणे, संरक्षण, सामान्य प्रशासन, आरोग्य, दळणवळणाची सुविधा यावर महसूली खर्च करावा लागतो.

अंदाजपत्रकातील महसूली खात्यावर जेव्हा असा महसूली खर्च हा महसूली प्राप्तीपेक्षा अधिक होतो, तेव्हा महसूली तूट उद्भवते. ही तूट कमी करण्यासाठी शासनास एकतर करांचे प्रमाण वाढवून महसूली प्राप्ती वाढवावी लागते. अन्यथा महसूली खर्चात कपात करावी लागते. महसूली तूटीत भांडवली खात्यावरील तुटीचा समावेश होत नाही.

**२) अंदाजपत्रकीय तूट (Budgetary deficit) :** अंदाजपत्रकीय तूट ही महसूली तूटीपेक्षा व्यापक अशी संकल्पना आहे. यात शासनाची एकूण प्राप्ती आणि एकूण खर्च यातील तूट विचारात घेतली जाते. अर्थात याप्रकारच्या तुटीत महसूली खात्यावरील तसेच भांडवली खात्यावरील तूटही समाविष्ट होत असते. अशी ही व्यापक तूट भरुन काढण्यासाठी शासनाला आपल्या रिझर्व्ह बँकेकडील ठेवींमध्ये कपात करावी लागते किंवा ९१ दिवसांची ट्रेझरी बिले जारी करुन रिझर्व्ह माध्यमातून पैसा उभारावा लागतो. अशा रीतीने अंदाजपत्रकीय तूट भरुन काढण्याच्या प्रक्रियेलाच तुटीचा अर्थभरणा असे म्हटले जाते. परंतु त्यामुळे अर्थव्यवस्थेत चलनविस्तार होतो आणि भाववाढ होण्याचा धोका असतो.

अंदाजपत्रकीय तूटीचे समीकरण पुढीलप्रमाणे मांडले जाते.

$$BD = (RE + CE + NDL) - (RR + G + DB + FB) = TB + CB$$

येथे BD - अंदाजपत्रकीय तूट
RE - महसूली खर्च
CE - भांडवली खर्च
NDL - निव्वळ देशांतर्गत कर्ज वितरण

RR - महसूली प्राप्ती
G - अनुदाने
DB - देशांतर्गत उत्पन्न
FB - विदेशी उत्पन्न
TB - ट्रेझरी बिले
CB - रोख शिल्लक (रिझर्व्ह बँकेकडील)

**३) राजकोषीय तूट (Fiscal deficit) :** १९८५ च्या चक्रवर्ती समितीच्या मते अंदाजपत्रकीय तूट ही खऱ्या अर्थाने तूट मापण्याचे योग्य साधन आहे. राजकोषीय तूट ही अंदाजपत्रकीय तुटीपेक्षा व्यापक संकल्पना असून त्यात सरकारची बाजारातील उत्पन्न आणि देयतेचाही समावेश होतो. थोडक्यात राजकोषीय तूट ही महसूली आणि भांडवली खात्यावरील शासनाच्या जमाखर्चाशिवाय कर्जपरतफेड होणे तसेच अनुदान मिळणे यासारख्या भांडवली प्राप्तीचाही समावेश होतो.

सुत्ररुपात : FD = RR + CR - TE

FD - राजकोषीय तूट
RR - महसूली प्राप्ती
CR - भांडवली प्राप्ती
TE - एकूण खर्च
BD - अंदाजपत्रकीय तूट

राजकोषीय तूट ही शासनाची बाजारातील उचल व देयता यांचाही उल्लेख करीत असल्याने सरकारचा कर्जबाजारीपणा दर्शविणारे ते एक साधन आहे असे मानतात. देशी व विदेशी उचल होवून राजकोषीय तूट कमी केली जाते.

**४) प्राथमिक तूट (Primary deficit) :** याआधी पाहिलेल्या राजकोषीय तूटीत शासनाने यापूर्वी उचललेल्या कर्जावरील व्याजाचाही समावेश केला जातो. सध्याची तूट रास्तपणे दर्शविण्यासाठी प्राथमिक तूट ही संकल्पना वापरली जाते. अर्थात राजकोषीय तूटीतून मागील कर्जावरील व्याजाची रक्कम वजा केल्यास आपणास प्राथमिक तूट उपयोगी ठरते.

**५) मुद्राधारित तूट (Monetised deficit) :** पारंपारिक पद्धतीने जी अर्थसंकल्पीय तूट मांडली जाते असे. त्यात श्री. सुखमय चक्रवर्ती (१९८५) यांनी सुधारणा सुचविली आणि मध्यवर्ति बँकेकडून शासनाला दिलेल्या पैशाच्या आधारे शासनाचे राजकोषीय व्यवहार तपासता येतील. थोडक्यात रिझर्व्ह बँकेच्या शासनास होणाऱ्या पतपुरवठ्यातील बदलानुसार व्यक्त होणाऱ्या तुटीस मुद्राधारित तूट असे म्हणतात.

सुत्ररुपात :

MD = TB + GS with RBI
MD - मुद्राधारित तूट
TB - ट्रेझरी बिले
GS - रिझर्व्ह बँकेकडील तारणे

## ५.९ तूटीचा अर्थभरणा (IMPORTANCE OF DEFICIT FINANCING)

१९२९ च्या जागतिक महामंदीच्या पार्श्वभूमीवर १९३६ मध्ये केन्सने 'केन्सन थिअरी' नावाचे पुस्तक लिहिले व त्यानंतर तुटीचा अर्थभरणा ही संकल्पना जगभरात प्रचलित झाली. तत्कालीन बेरोजगारी कमी करण्याचा उपाय म्हणून केन्सने तूटीच्या अर्थभरणाची शिफारस केली होती. "जेव्हा सरकारी अंदाजपत्रकातील खर्च हा प्राप्तीपेक्षा अधिक असतो तेव्हा त्यात तूट निर्माण होते. ही तूट विविध मार्गांनी भरुन काढण्याची प्रक्रिया म्हणजेच तुटीचा अर्थभरणा होय." तुटीच्या अर्थभरणाचे महत्त्व खालीलप्रमाणे -

**१) पैशाच्या पुरवठ्यात वृद्धी** - त्रूटीच्या अर्थभरणा करण्यासाठी शासन एकतर मध्यवर्ती बँकेकडून उचल घेते किंवा नवीन चलननिर्मिती करुन ते अर्थव्यवस्थेत विकासकामांच्या माध्यमातून आणते. परिणामी लोकांची उत्पन्नपातळी आणि क्रयशक्ती वाढते. मध्यवर्ती बँकेचा शासनाला होणारा पतपुरवठा वाढल्याने बँकेला राखीव निधीत वाढ करावी लागते. परिणामी मद्रागुणक तत्वानुसार राखीव निधीच्या काही पटीने पैशाचा अर्थव्यवस्थेतील पुरवठा वाढतो. आर्थिक मंदीची परिस्थिती दूर करण्यासाठी केन्सच्या मते परिणामकारक मागणीच्या कमतरतेमुळे आर्थिक मंदी येते. यापरिस्थितीत लोकांकडे उत्पन्न नसते व मागणी कमी होते, या परिस्थितीवर मात करण्यासाठी सरकार सार्वजनिक खर्चात वाढ करुन रोजगार संधी निर्माण करु शकतो. परंतु मंदिच्या काळात तेही शक्य नसल्याने नवीन चलनाची निर्मिती करुन तूटीचा अर्थभरणा केला जातो.

**२) युद्धकालीन खर्च भागविण्यासाठी :** युद्धकाळात सरकारच्या खर्चात अचानकपणे वाढ होते. युद्धकालीन खर्च टाळता येत नाही. हा अचानकपणे निर्माण झालेला खर्च करण्यासाठी तूटीच्या अर्थभरण्याचा अवलंब केला जातो.

**३) आर्थिक विकास साध्य करण्यासाठी** - अल्पविकसित राष्ट्रांना आर्थिक विकासाचा दर उंचावण्यासाठी अनेक विकासात्मक योजना राबवाव्या लागतात. त्यासाठी प्रचंड प्रमाणावर खर्च करावा लागतो. हा खर्च करण्यासाठी अल्पविकसित राष्ट्रांकडे पुरेसे भांडवल नसते म्हणून तूटीचा अर्थभरणा करुन हा खर्च केला जातो.

**४) गुंतवणूकीचा दर वाढविण्यासाठी :** अल्पविकसित देशातील लोकांचे दरडोई उत्पन्न कमी असते त्यामुळे त्यांची बचत कमी असते. आणि त्यामुळे गुंतवणूक कमी असते व भांडवलनिर्मिती करण्यासाठी अडचणी येतात. अशा स्थितीत गुंतवणूक करण्यासाठी सरकारला पुढाकार घ्यावा लागतो. सरकार तुटीचा अर्थभरणा करुन देशातील सार्वजनिक उपक्रमामध्ये गुंतवणूक करते. त्यातून उत्पादनात, रोजगारात आणि उत्पन्नात वाढ होते.

**५) कल्याणकारी योजनांवर खर्च करण्यासाठी** - आधुनिक काळात जगातील अनेक राष्ट्रांनी कल्याणकारी राज्याचा स्विकार केला आहे. त्यामुळे शिक्षण, आरोग्य, राहणीमान, स्वच्छता, पाणीपुरवठा, विजपूरवठा, वाहतूक व्यवस्था यांच्यावर सरकारला प्रचंड प्रमाणावर खर्च

munotes.in

करावा लागतो. देशातील प्रत्येक नागरिकाच्या हिताच्या दृष्टीने हा खर्च केला जातो. या कल्याणकारी योजनांवर खर्च करण्यासाठी तुटीचा अर्थभरणा आवश्यक असतो.

**६) अर्थव्यवस्थेतील पैशाची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी** - अर्थव्यवस्थेत अनेक कारणांनी पैशाची मागणी केली जाते. वर्तमानकाळात वस्तुविनिमय जाऊन पैसारुप विनिमय होऊ लागला आहे. तसेच गुंतवणूकीत वाढ करण्यासाठी पैशाची मागणी केली जाते. त्याचप्रमाणे विकासामुळे लोकांच्या उत्पन्नात वाढ होते, लोक रोखतेला प्राधान्य देतात व पैशाची मागणी वाढते. ही वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी तुटीचा अर्थभरणा उपयुक्त असतो.

## ५.१० सरावासाठी प्रश्न (QUESTIONS)

१) सामाजिक वस्तु म्हणजे काय? त्यांची वैशिष्ट्ये लिहा.
२) टीप लिहा - गुणवत्ता वस्तू
३) सार्वजनिक उत्पन्नाच्या स्त्रोतांचे वर्गीकरण करा व स्पष्ट करा.
४) टीपा लिहा.
   १) कर उत्पन्न
   २) करेतर उत्पन्न
   ३) प्रत्यक्ष कर
   ४) अप्रत्यक्ष कर
   ५) करघात
   ६) करभार
   ७) करसंक्रमण
५) प्रत्यक्ष कर व अप्रत्यक्ष कर यांतील फरक स्पष्ट करा.
६) करभार, कराघात व करसंक्रमण या संकल्पना स्पष्ट करा.
७) सार्वजनिक खर्च म्हणजे काय? त्याची वैशिष्ट्ये लिहा.
८) सार्वजनिक खर्चाचे प्रकार कोणते आहेत?
९) तुटीच्या विविध संकल्पना स्पष्ट करा.
१०) तुटीच्या अर्थभरणाचे महत्त्व स्पष्ट करा.

❖❖❖❖

# घटक -६

# वस्तू व सेवा कर
# (GOODS AND SERVICE TAX - GST)

**घटक रचना :**

६.० उद्दिष्ट्ये
६.१ संकल्पना
६.२ भारतात GST
६.३ GST मध्ये वर्ग होणारे कर
६.४ GST चे फायदे
६.५ GST ची व्याप्ती
६.६ सरावासाठी प्रश्न
६.७ संदर्भसूची

## ६.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

- वस्तु व सेवा कराची संकल्पना अभ्यासणे.
- GST चे वर्गीकरण अभ्यासणे.
- GST चे फायदे व व्याप्ती यांचा आढावा घेणे.

munotes.in

## ६.१ संकल्पना (CONCEPT)

वस्तू व सेवा कर ही उत्पादकापासून उपभोक्त्यापर्यंत वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्याच्या प्रत्येक टप्प्यावर लागू केलेली एकेरी करप्रणाली आहे, जेणेकरुन संपूर्ण देशासाठी एकच अप्रत्यक्ष कर असेल ज्यामुळे भारत एक एकीकृत सामाईक बाजार प्रस्थापित होईल. हा कर मूल्यवर्धनावर लागू होईल व ग्राहकावर केवळ शेवटच्या विक्रेत्याने आकारलेल्या कराचे ओझे पडेल. त्यामुळे संपूर्ण पुरवठा साखळीतील ‘करावरील कर’ परिणाम (tax on tax) नष्ट होण्यास मदत होईल.

सध्या जगातील सुमारे १६० देश VAT / GST प्रणालीचा वापर करीत आहेत. त्यामधील सर्वाधिक देश युरोपातील आहेत. तर चीनमध्येदेखील GST लागू करण्याची प्रक्रिया चालू आहे.

## ६.२ भारतात GST (GST IN INDIA)

GST ही संकल्पना सर्वप्रथम २००४ च्या विजय केळकर समितीने मांडली. २००६-०७ च्या अर्थसंकल्पनात अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी १ एप्रिल २०१० पासून GST लागू

करण्याची घोषणा केली. मात्र  ते शक्य न झाल्याने दरवर्षी पुढे ढकलण्यात आले. दरम्यान तत्कालीन काँग्रेस सरकार GST लागू करण्यासाठी आवश्यक असलेल्या घटादुरुस्तीसाठी ११५ वे घटनादुरुस्ती विधेयक २०११ साली संसदेत मांडले. मात्र १५ वी लोकसभा विसर्जित झाल्याने विधेयक व्यपणत झाले.

- नरेंद्र मोदी सरकारने १९ डिसेंबर २०१४ रोजी, नविन १२२ वे घटनादुरुस्ती विधेयक, २०१४ लोकसभेत माडंले. ६ मे २०१५ रोजी लोकसभेत विधेयक पारित केल्यानंतर ते राज्यसभेकडे पाठविण्यात आले. २२ जुलै, २०१५ रोजी प्रवर समितीने आपला अहवाल राज्यसभेला सादर केला.
- ३ ऑगस्ट, २०१६ रोजी राज्यसभेने विधेयक काही सुधारणासहित पारित केले. त्यांपैकी काही सुधारणा लोकसभेने स्विकारल्या, तर काही स्विकारल्या नाहीत.
- त्यानंतर विधेयक राज्यांच्या संमतीसाठी पाठविण्यात आले. विधेयकाला संमती देणारे आसाम हे पहिले, महाराष्ट्र १० वे तर ओडिसा १६ वे राज्य ठरले. एकूण २३ राज्यांनी विधेयक पारित केले.
- ८ सप्टेंबर, २०१६ रोजी राष्ट्रपतींनी विधेयकास संमती दिली. १२२ वे घटनादुरुस्ती विधेयक १०१ वा घटनादुरुस्ती कायदा म्हणून स्विकारण्यात आले.
- १ एप्रिल, २०१७ पासून देशभरात GST लागू करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

## ६.३ GST मध्ये वर्ग होणारे कर (TAXES TO BE SUBSUMED IN GST)

भारतात कॅनडाप्रमाणे 'दुहेरी GST ' (Dual GST) व्यवस्था असेल त्यामध्ये केंद्र सरकारर्माथ आकारला जाणारा 'केंद्रीय जी.एस.टी.' (Central GST) आणि राज्यामार्फत आकारला जाणारा 'राज्य जी.एस.टी.' (State GST) यांचा समावेश असेल. त्यामध्ये वर्ग होणारे कर पुढीलप्रमाणे :

### A) CGST मध्ये वर्ग होणारे कर :

i. केंद्रीय उत्पादन शुल्क / अबकारी कर
ii. अतिरिक्त उत्पादन शुल्क
iii. औषधी व सौंदर्य प्रसाधने कायद्यांतर्गत आकारले जाणारे उत्पादन शुल्क
iv. सेवा कर
v. अतिरिक्त सीमा शुल्क (काऊंरवेलिंग ड्युटी)
vi. विशेष अतिरिक्त सीमा शुल्क
vii. केंद्रीय अधिभार व उपकर

### B) SGST मध्ये वर्ग होणारे कर :

i. विक्री कर / व्हॅट
ii. करमणूक कर

iii. केंद्रीय विक्री कर

iv. लकझरी कर

v. लॉटरी, जुगार व सट्टा यांवरील कर

vi. खरेदी कर

vii. राज्य अधिभार व उपकर

## ६.४ GST चे फायदे (BENEFITS OF GST)

**अ) उद्योग व व्यवसायांच्या दृष्टीने फायदे :**

**१) कर पालन सोपे** - GST व्यवस्था एका सर्वसमावेशक माहिती तंत्रज्ञान व्यवस्थेवर आधारित असेल, त्यामुळे नोंदणी, परतावे, पेमेंट इत्यादी करसेवा ऑनलाईन उपलब्ध होतील. त्यामुळे करपालन सोपे व पारदर्शक होईल.

**२) कर दरांची एकरुपता** - संपूर्ण देशात चे कर दर सारखेच असल्याने कर दरांची एकरुपता निर्माण होईल. त्यामुळे व्यवसाय करण्याची निश्चितता व सुगमता वाढेल. देशात कोठीही व्यवसाय करणे कर तटस्थ (tax neutral) बनेल.

**३) करावर कर परिणाम दूर होईल** - देशभरात संपूर्ण पुरवठा साखळीत अखंडितपणे आदान कर पत (input tax credit) प्राप्त झाल्याने करावर कर लावला जाण्याचा परिणाम जवळजवळ संपुष्टात येईल. त्यामुळे व्यवसाय करण्यातील छुपे खर्च कमी होतील.

**४) स्पर्धा क्षमतेमध्ये सुधारणा** - व्यवसाय करताना होणारा व्यवहार खर्च कमी झाल्याने उद्योगव्यापारांच्या स्पर्धा क्षमतेमध्ये सुधारणा होईल.

**५) निर्यातदारांना फायदे** - देशात उत्पादित वस्तू व सेवांचे मूल्य कमी झाल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात भारतीय वस्तू व सेवांची स्पर्धाक्षमता वाढल्याने निर्यातदारांना फायदा होईल.

**ब) अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने फायदे :**

१) GST लागू झाल्याने वरील अपेक्षित फायदे होऊन जी.डी.पी. मध्ये १ ते २ टक्यांची वृद्धी होईल असा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

**२) एकेरी राष्ट्रीय बाजार** - संपूर्ण भारतातील कराचे सारखे दर व कायद्यांमुळे भारत वस्तू व सेवांचे एक सिंगल मार्केट बनेल.

**क) केंद्र व राज्य सरकारांना फायदे :**

**१) प्रशासनाची साधी व सोपी प्रणाली** - केंद्र व राज्य स्तरावरील विविध अप्रत्यक्ष कर संपुष्टात आल्याने कर प्रशासन सोपे व सुलभ होईल.

**२) गळतीवर चांगले नियंत्रण** - माहिती तंत्रज्ञानाच्या आधारामुळे व अखंडित आदान कर पत व्यवस्थेमुळे व्यापाऱ्यांमार्फत होणारी कर चुकवेगिरीला आळा बसेल.

**३) अधिक महसुली कार्यक्षमता** - GST मुळे सरकारचा कर वसुलीचा खर्च कमी झाल्याने महसुली कार्यक्षमता सुधारेल.

**ड) ग्राहकांसाठी फायदे -** एकंदरीत कर ओझ्यात घट - गळतीवर नियंत्रण व कर वसुली कार्यक्षमतेमध्ये सुधारणा झाल्याने ग्राहकांसाठी बहुतेक वस्तुंच्या बाबतीत कर ओझ्यात घट होऊन त्यांच्या किंमती कमी होण्याची शक्यता आहे.

## ६.५ GST ची व्याप्ती (SCOPE OF GST)

१) GST जवळजवळ सर्वच वस्तू व सेवांना लागू होईल. मात्र तो मानवी वापराच्या अल्कोटोलवर होणार नाही.

२) सुरुवातीला पुढील पाच प्रकारच्या पेट्रोलियम पदार्थांवर लागू होणार नाही. कच्चे पेट्रोलियम, हाय स्पिड डिझेल, मोटर स्पिरिट (पेट्रोल), नैसर्गिक वायू आणि एव्हिएशन टर्बाइन फ्युअल. मात्र भविष्यात GST परिषदेमार्फत त्यांवर केव्हा कर लावायचा ते ठरविले जाईल.

३) तंबाखू व तंबाखू पदार्थांवर GST लागू असेल. तसेच त्यांच्यावर केंद्र सरकार केंद्रीय उत्पादन शुल्क सुद्धा लागू करु शकेल.

४) निर्यातीवर GST लागू होणार नाही.

५) CGST तसेच SGST लागू होण्यासाठी टर्नओव्हरची सारखीच कमकुवत मर्यादा असेल. त्यापेक्षा कमी टर्नओव्हर असलेले व्यापारी करापासून मुक्त असतील.

६) GST लागू न होण्याऱ्या वस्तू व सेवांची संख्या कमीत कमी असेल. तसेच त्यांची यादी केंद्र व राज्यांसाठी अधिकाधिक सारखी ठेवण्याचा प्रयत्न केला जाईल.

## ६.६ सरावासाठी प्रश्न (QUESTIONS)

१) GST ची संकल्पना सखोल स्पष्ट करा.

२) GST मध्ये करांचे वर्गीकरण कशाप्रकारे केले जाते ?

३) GST चे फायदे लिहा.

४) टीप लिहा - GST ची व्याप्ती

## ६.७ संदर्भसूची (REFERENCE)

१) N. Gregory Mankiw, Principles of Macro-Economics, Cengage Learning, 2015

२) डॉ. महादेव देशमुख, डॉ. सोमनाथ विभूते - प्रगत आर्थिक सिद्धांत.

३) H.L. Ahuja, Macro Economics, S. Chand.

❖❖❖❖

मॉड्यूल ४

# घटक -७

## व्यवहारतोल
## (BALANCE OF PAYMENT - BOP)

**घटक रचना :**

७.० उद्दिष्ट्ये
७.१ प्रस्तावना
७.२ व्यवहारतोल रचना
७.३ व्यवहारतोल असमतोलाचे प्रकार व कारणे
७.४ व्यवहारतोल असमतोल दुरुस्त करण्याचे उपाय
७.५ सारांश
७.६ सराव प्रश्न

## ७.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

अर्थशास्त्रात रुढ असलेल्या सुक्ष्म व स्थुल या संकल्पना आंतरराष्ट्रीय व्यापारातही वापरल्या जातात. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रात आंतरराष्ट्रीय व्यवहारतोल किंवा आंतरराष्ट्रीय व्यवहारशेष ही संकल्पना समष्टी (स्थुल) दृष्टीकोनातून अभ्यासली जाते. आपण सदर प्रकरणात आंतरराष्ट्रीय व्यवहारतोलाचा अभ्यास करणार आहोत. या पाठाची प्रमुख उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. आंतरराष्ट्रीय व्यवहारतोलाची संकल्पना व संरचना समजवून घेणे.
२. द्विनोंद पद्धती समजून घेणे
३. प्रतिकूल व्यवहारतोलाचा अर्थ व त्याचे विविध प्रकार व कारणे अभ्यासणे.

## ७.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

एका देशाचे दुसऱ्या देशाबरोबरचे पैशातील देणे-घेणे फक्त व्यापारी वस्त्राच्या आयाती - निर्याती मधूनच निर्माण होते असे नाही तर अशा अनेक बाबी आहेत की, त्याच्यामुळे देश दुसऱ्या देशाला काही देणे लागतो व त्याचवेळेस दुसऱ्या देशातून काही उत्पन्नही येत असते.

व्यापारी बाबींना किंवा वस्त्राच्या आयात निर्यातीला दृश्य बाबी असे म्हणतात. या बाबींची नोंद बंदरावरील कस्टम अधिकाऱ्यांकडे असते. म्हणजे आपल्या देशातून किंती वस्तू

बाहेरच्या देशात निर्यात झाल्या आणि किती आयात झाल्या याची प्रत्यक्ष नोंद बघण्यास मिळते. म्हणून या बाबींना दृश्य बाबी असे म्हणतात.

'अदृश्य बाबी म्हणजे ज्याची नोंद बंदरावरील कस्टम अधिकाऱ्याकडे होत नाही, परंतु देशाच्या बाबतीत देणे आणि घेणे निर्माण होत असते. उदा. वाहतूक, बँक व विमानसेवा, पर्यटन इत्यादी. उदा. समजा, आपल्या देशातील बँकेने परकीयांना सेवा दिली तर परकीय लोक त्याचा काही मोबदला आपल्या बँकेला देतील. त्यामुळे ते आपल्या देशाचे उत्पन्न असते.' आंतरराष्ट्रीय व्यवहार देणे आणि घेणे अशा दोन गटात वर्गीकरण केले जाते.

B = RF - PF

व्यवहारतोल = परकीय येणे - परकीय खर्च

B = व्यवहारतोल

RF = परकीय येणे

PF = परकीय खर्च

परिस्थिती ऋण फरकाची असेल तर त्यास तुटीचा व्यवहारतोल असे म्हणतात.

## ७.२ व्यवहारतोल संरचना (STRUCTURE OF BOP)

**व्यवहारतोलात समाविष्ट केल्या जाणाऱ्या बाबी (Compoments of Balance of payment) :**

व्यवहारतोलात दोन विभाग समाविष्ट आहेत.

१) चालू खाते (Current Account)

२) भांडवली खाते (Capital Account)

त्याचप्रमाणे आर्थिक व्यवहारांचे (१) वास्तव व्यवहार व (२) वित्तीय व्यवहार असे दोन प्रकार केले जातात. उदा. आयात निर्यात. निर्यात उत्पन्न निर्माण करते, तसेच देशातील लोक परकीयांकडून वस्त्र व सेवा खरेदी करतात. त्याला आपण आयात म्हणतो. ती परकीयांसाठी उत्पन्न निर्माण करते. म्हणून वस्त्र व व्यवहार उत्पन्न निर्माण करणारे असतात. याउलट पैशाच्या किंवा चलनाच्या स्वरुपात होणारे व्यवहार वित्तीय व्यवहारात मोडतात. वित्तीय व्यवहार बऱ्याचदा भांडवली व्यवहार म्हणून ओळखले जातात. हे व्यवहार देशाच्या उत्पन्न पातळीवर प्रत्यक्षपणे परिणाम करत नाहीत व व्यवहारामध्ये फक्त भांडवल व भांडवली संपत्ती तसेच देशाची देयत्ता यांच्यात बदल होत असतो. म्हणून उत्पन्न निर्माण करणारे व्यवहार किंवा वास्तव व्यवहार व्यवहारतोलाच्या चालू खात्यांमध्ये येतात तर वित्तीय किंवा भांडवली व्यवहार भांडवली खात्यात येतात.

## व्यवहारतोलाची संरचना (Structure of BOP)

| प्राप्ती (पत) / येणे (जमा | | देणी (खर्च) | |
|---|---|---|---|
| १. | मालाची निर्यात | अ) | मालाची आयात |
| **व्यापारी (खाते) (१ - अ)** | | | |
| २. | सेवांची निर्यात | ब) | सेवांची आयात |
| ३. | व्याज नफा आणि लाभांश प्राप्ती | क) | व्याज, नफा आणि लाभांश देणी |
| ४. | एकपक्षी प्राप्ती | ड) | एकपक्षी देणी |
| **चालू खाते** | | | |
| **(१ + २ + ३ + ४) - (अ + ब + क + ड)** | | | |
| ५. | परकिय गुंतवणूक | इ) | परदेशात केलेली गुंतवणूक |
| ६. | अल्पकालीन कर्जे | ई) | अल्पकालीन कर्जे |
| ७. | मध्यम आणि दीर्घकालीन कर्जे घेणे | प) | मध्यम व दीर्घकालीन कर्जे देणे |
| **भांडवली खाते** | | | |
| **(५ + ६ + ७) - (इ + ई + प)** | | | |
| ८. | दोष आणि त्रुटी | फ) | दोष आणि त्रुटी |
| ९. | साठ्यातील बदल (FER) (+) | ग) | साठ्यातील बदल (FER) (-) |
| **(८ + ९+) - (फ + ग)** | | | |
| **एकुण प्राप्ती = एकुण देणी** | | | |
| **Total Receipts = Total Payments** | | | |
| **(१ ते ९) - (अ ते ग)** | | | |

munotes.in

### १) चालू खाते :

चालू खात्यामध्ये दोन मुख्य बाबी असतात.

१) दृश्यबाबी किंवा दृश्य खाते

२) अदृश्यबाबी किंवा अदृश्य खाते

दृश्य खात्यांमध्ये वस्तूची आयात आणि निर्यात समाविष्ट होते तर अदृश्य खात्यामध्ये सेवांचे मोबदले किंवा देणग्या यांचा समावेश होतो. म्हणजेच बदली देण्यांचा समावेश या खात्यात होतो. सर्वसाधारणपणे बँक, विमा, कर्जावरील व्याज, पर्यटकांचा खर्च, वाहतूक शूल्क आणि

देणग्या यांचा समावेश या विभागात होतो. आंतरराष्ट्रीय नाणे निधीने (IMF) पुढील बाबींचा समावेश अदृश्य बाबींमध्ये केला आहे.

१) वस्तूंची आंतरराष्ट्रीय वाहतूक, यामध्ये वाहतूक करताना कराव्या लागणाऱ्या साठवणूक खर्च आणि इतर खर्चाचाही समावेश होतो.

२) व्यवहार, शिक्षण, आरोग्य आंतरराष्ट्रीय समारंभ इत्यांदीसाठीचा प्रवास खर्च.

३) विम्याचे हप्ते आणि दावे.

४) व्याज, खंड, लाभांश आणि नफा यांसारखे गुंतवणूक उत्पन्न.

५) जाहिरात, दलाली, सिनेमांचे भाडे, निवृत्तीवेतन, पेटंट फी, रॉयल्टीज आणि नियतकालीकाची वर्गणी.

६) देणग्या

७) भांडवली गुंतवणूकीवरील घसारा.

**२) भांडवली खाते :**

कर्ज आणि इतर दावे भांडवली खात्यात येतात. आयात-निर्यातीसाठी करण्यात येणारा भांडवल पुरवठा तसेच आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून येणारा भांडवल पुरवठा होणाऱ्या कर्जाऊ व्यवहाराचा समावेश या खात्यात होतो. त्यानुसार खाजगी भांडवली, आंतरराष्ट्रीय संस्था भांडवली खाते आणि सरकारी भांडवली खाते, अशी विविध खाती भांडवली खात्यात येतात.

खाजगी भांडवली खात्यात महामंडळे आणि व्यापारी बँका यांचे आंतरराष्ट्रीय भांडवली व्यवहार येतात. हे व्यवहार अल्पकालीन आणि दीर्घकालीन असू शकतात. आंतरराष्ट्रीय भांडवली खात्यात जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय वित्त पुरवठा महामंडळ, आंतरराष्ट्रीय विकास संस्था, बँक फॉर इंटरनॅशनल सेटलमेंट यासारख्या संस्थानी अल्पकालीन आणि दीर्घकालीन केलेल्या भांडवली व्यवहारांचा समावेश होतो. सरकारी भांडवली खात्यात अनुदाने, अल्पकालीन आणि दीर्घकालीन कर्जाचे सरकारी पातळीवर होणारे व्यवहार समाविष्ट असतात.

**३) समायोजन खाते :**

यालाच सरकारची संरक्षित मालमत्ता असेही म्हटले जाते. इंग्लंड आणि अमेरिकेच्या बाबतीत प्रदेश-देश स्वतंत्र दाखवता येतात. त्याचे व्यवहार स्वतंत्र असल्याने सरकार निव्वळ सरकारी राखीव संपत्ती ठेवते. सरकार तडजोडीने देयता बदलते. देयकाची जबाबदारी सरकारवर असते. प्रत्येक वर्षी सरकारी राखीव संपत्तीत बदल होतो. सरकारी राखीव संपत्ती परकीय चलनात बदलता येते आणि तशी तरतूद आंतरराष्ट्रीय नाणे निधी (IMF) मध्ये आहे.

**४) चूक आणि भूल :**

जमाखर्चाची तिन्ही खाती बरोबर असल्यास त्यामुळे समतोल होतो ही देशाच्या व्यवहारतोल समतोलाची बाब आहे. देशाच्या व्यवहारतोल द्विनोंदी लेखाकर्म पद्धतीने तयार केला जातो. त्यामुळे प्रत्येक बाब देणे आणि घेणे बाजूला येते. त्यामुळे लेखाकर्माच्या दृष्टीने येणे आणि घेणे दोन्ही सारखे दिसतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) व्यवहारतोल म्हणजे काय ?
२) व्यवहारतोलाच्या संरचनेतील प्रमुख घटक / खाते सांगा.
३) व्यवहारतोलाची द्विनोंद पद्धत म्हणजे काय ?

## ७.३ व्यवहारतोल असमतोलाचे प्रकार व कारणे (TYPES AND REASONS OF BOP DISEQUILIBRIUM)

जेव्हा एखाद्या देशाच्या एकूण दृश्य व अदृश्य आयातीचे मूल्य हे एकूण निर्यात मूल्यापेक्षा जास्त असते तेव्हा देशाचा व्यवहारतोल प्रतिकुल होतो. या उलट एखाद्या देशाच्या एकूण दृश्य व अदृश्य आयात मूल्यापेक्षा निर्यात मूल्य जास्त असेल तर त्या देशाला व्यवहार शेष अनुकूल आहे असे म्हणतात. एकूण व्यवहारतोलाचा विचार केल्यास त्यामध्ये नेहमी समतोल असतो.

देशाच्या व्यवहारतोलात समतोल साधणे हे भांडवली खात्यातील समायोजनातून शक्य होते. जेव्हा चालू खात्यावरील येणी आणि देणी समान होतात; तेव्हा व्यवहारतालोचा समतोल साधला जातो. तथापि, अशा प्रकारचा समतोल क्वचित दिसून येतो. चालू खात्यावरील तूट किंवा शिल्लक ही भांडवली खात्यावर हस्तांतरित करुन समतोल साधला जातो. यासाठी प्रामुख्याने पुढील तीन निर्णय घेतले जातात.

१) देशाच्या राखीव निधीचा वापर केला जातो.
२) विदेशातून कर्ज घेतले जाते.
३) सोन्याची निर्यात केली जाते तसेच नाणे निधीकडून अल्पकालीन मदत घेतली जाते.

व्यवहारतोलातील प्राप्ती खर्चाच्या असमतोलातून संतूलन निर्माण होते त्याचे प्रमुख चार प्रकार पडतात.

पुढील सूत्रानुसार व्यवहारतोल समतोल अभ्यासता येईल.
वरील सूत्रानूसार,

BOP = R - P
R = एकूण प्राप्ती
P = एकूण खर्च

वरील सूत्रानूसार,
जर R > P तर BOP = 0 किंवा +ve BOP असमतोल
जर R > P तर BOP = 0 किंवा -ve BOP असमतोल
जर R = P तर BOP = 0 - असमतोल

munotes.in

**व्यवहारतोल असमतोलाचे प्रकार :**

**१) संरचनात्मक असमतोल :**

देशात निर्माण होणाऱ्या रचनात्मक बदलातून आयात आणि निर्यात वस्तूंच्या मागणी पुरवठ्यात रचनात्मक स्वरुपाचे बदल होतात आणि त्यातून व्यवहारतोलात संरचनात्मक असमतोल निर्माण होतो.

समजा, भारताची ज्यूट वस्तूंची विदेशातील मागणी कमी झाली म्हणून भारताचा ज्युट उद्योगांतील साधनांना इतर निर्यात उद्योगात स्थानांतरीत करावे लागेल. जर ते शक्य झाले नाहीतर भारताच्या निर्यातीत घट होईल आणि त्याच वेळेला आयात पूर्वीसारखीच राहील आणि व्यवहारतोलात असमतोल निर्माण होईल. या असमतोलाला संरचनात्मक असमतोल असे म्हणतात.

**२) दीर्घकालीन असमतोल :**

हा समतोल काही मूलभूत कारणांमुळे निर्माण होत असतो आणि तो दीर्घकाळ टिकून राहतो. भांडवलनिर्मिती, लोकसंख्या वाढ, प्रादेशिक विस्तार, तांत्रिक सुधारणा, नवनिर्मिती इत्यादी. यासारख्या कारणांमुळे असा असमतोल निर्माण होतो. नवीन विकसनशील अर्थव्यवस्थेत आर्थिक वृद्धीसाठी अंतर्गत

**३) दीर्घकालीन असमतोल :**

हा समतोल काही मुलभूत कारणांमुळे निर्माण होत असतो आणि तो दीर्घकाळ टिकून राहतो. भांडवलनिर्मिती, लोकसंख्या वाढ, प्रादेशिक विस्तार, तांत्रिक सुधारणा, नवनिर्मिती इत्यादी. यासारख्या कारणांमुळे असा समतोल निर्माण होतो. नवीन विकसनशील अर्थव्यवस्थेत आर्थिक वृद्धीसाठी अंतर्गत बचतीपेक्षा मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करावी लागते. म्हणून आयात मोठ्या प्रमाणात होऊन व्यवहारतोलात असमतोल निर्माण होतो. असा असमतोल एकाएकी दुरुस्त करता येत नाही. तो दीर्घकाळ टिकून राहतो. म्हणून त्याला दीर्घकालीन असमतोल असे म्हणतात. त्याचप्रमाणे एखाद्या देशामध्ये लोकसंख्या वाढ वेगाने होत असेल तर, या देशाची आयात वाढते. त्याचवेळेला निर्याती घट होते आणि अर्थव्यवस्थेत दृढमूल (Chronic) स्वरुपाचा असमतोल निर्माण होतो.

**४) अल्पकालीन असमतोल :**

व्यवहार शेषातील जो असमतोल अस्थायी किंवा तात्पुरत्या स्वरुपाचा असतो त्यास अल्पकालीन असमतोल म्हणतात. जेव्हा एखादा देश नाणे निधीसारख्या संस्थेकडून अल्पकाळासाठी पैशाची उचल होतो तेव्हा असा असमतोल उद्भवण्याची शक्यता असते. परंतु जेव्हा विशिष्ट कालावधीत ही उचल परत केली जाते तेव्हा असा असमतोल आपोआप दूर होत असतो. परंतु जर हा असमतोल योग्य वेळेत सोडविला नाही तर त्याचे जुनाट स्वरुपाच असमतोलात रुपांतर होते.

**५) चक्रीय असमतोल :**

व्यापारचक्रिय बदलांच्या प्रभावामुळे व्यवहारतोलात चक्रिय असमतोल निर्माण होतो. त्याची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**अ) व्यापारचक्राचे स्वरुप :**

वेगवेगळ्या देशात व्यापारचक्राचे स्वरुप वेगवेगळे असते तसेच व्यापारचक्राचा कालावधी आणि निर्माण होण्याची वेळ वेगवेगळ्या देशात वेगवेगळी असते.

ब) वेगवेगळ्या देशात समतोलासाठी सारख्याच प्रकारचे कार्यक्रम आणि उपाययोजना केल्या जात नाहीत.

क) वेगवेगळ्या देशात आयात मागणीची किंमत लवचिकता वेगवेगळी असते.

ड) वेगवेगळ्या देशातील आयातीच्या मागणीची उत्पन्न लवचिकताही वेगवेगळी असते.

त्याचप्रमाणे लोकांची पसंती, फॅशन, सवयी, उत्पन्न, आर्थिक प्रगती यांसारख्या कारणानेही मागणीत बदल होतो. आयात प्रवृत्तीत बदल होतो. काही आयात वस्तूची मागणी वाढते. तर काही वस्तूंची मागणी घटते. त्यामुळे देखील व्यवहारतोलात असमतोल निर्माण होतो.

**प्रतिकूल व्यवहारतोलाची कारणे (Causes of disequilibrium in BOP) :**

एक किंवा अनेक घटकांतील बदलांमुळे व्यवहारतोलात असमतोल निर्माण होत असतो. हे घटक क्लिष्ट स्वरुपाचे असतात. त्यांचा एकमेकांवरही परिणाम होत असतो. व्यवहारतोलावर दिसणारा प्रत्यक्ष परिणाम पुन्हा वेगळा असतो. व्यवहारतोलातील असमतोलाचे स्वरुप देशागणिक वेगवेगळे असते. व्यवहारतोलाच्या रचनेवर अनेक बाबी परिणाम करत असतात. त्यामध्ये दृश्य-अदृश्य आयात-निर्यातीचे देशांचे एकमेकांबरोबरचे परिणाम करत असतात. एखाद्या घटकांमध्ये एकाच बाजूचे कायमस्वरुपी बदलत असेल तर त्यामुळेही व्यवहारतोलात असमतोल निर्माण होतो. व्यवहारतोलात असमतोल निर्माण करणारी काही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

याची विभागणी दोन गटात केली जाते.

अ) आर्थिक कारणे

ब) आर्थिकेत्तर कारणे

**अ) आर्थिक कारणे :**

**१) विकास कार्यावरील खर्च :**

अनेक विकसनशील राष्ट्रांकडून जलद आर्थिक विकासासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च केला जातो. परिणामी देशातील लोकांच्या क्रयशक्तित वाढ घडून येते. वाढत्या क्रयशक्तिमुळे लोकांच्या आयात क्षमतेत वाढ होते आणि देशाची आयात वाढते. मात्र याचवेळी देश विकासाच्या प्राथमिक अवस्थेत असल्याने अशी देशांची निर्यातक्षमता कमी असते. याचा परिणाम म्हणून व्यापारतूट निर्माण होते आणि कालांतराने त्याचे रुपांतर व्यवहारशेषातील असमतोलात होतो.

**२) व्यापार चक्रे :**

अनेक देशातील आर्थिक घटनांमध्ये सातत्याने चक्रिय स्वरुपाचे बदल घडून येतात. अर्थव्यवस्थेत कधी तेजी तर कधी मंदीची चक्रे सतत येत असतात. त्याचा परिणाम संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेवर होत असतो. ज्या देशातील तेजीची अवस्था दीर्घकाळ राहते. त्या देशाची आयात वाढते. परिणामी त्या देशाची व्यापारतूट वाढते आणि व्यवहारशेषात असमतोल निर्माण होतो.

**३) आयात लवचिकतेतील बदल :**

जेव्हा आपल्या देशाची आयात लवचिकता बदलते तेव्हा आपली आयातीची क्षमता बदलते. तसेच जेव्हा देशांची आयात लवचिकता बदलते तेव्हा त्या देशाची आयातक्षमता बदलत असते. तर आयात लवचिकता बदलल्यामुळे एखाद्या देशाची आयात वाढत असेल तर अन्य देशातील उत्पादन, रोजगार, गुंतवणूक आदी गोष्टींना चालना मिळते. आणि त्याची निर्यातक्षमताही बदलते. परिणामी व्यापार असमतोल व नंतर व्यवहार असमतोल निर्माण होतो.

**४) बाह्य उचल :**

जेव्हा एखाद्या देशाकडून मोठ्या प्रमाणावर विदेशी उचल घेतली जाते तेव्हा भांडवली खात्यावर पैसा जमा होत असले तरीही त्यामुळे भविष्यातील देयता मोठ्या प्रमाणावर वाढते. याचा परिणाम म्हणून व्यवहारशेषात तूट असेच असमतोल निर्माण होतो.

**५) भाववाढ :**

आर्थिक विकासासाठी केलेल्या खर्चामुळे देशातील लोकांची क्रयशक्ती मोठ्या प्रमाणावर सुधारते. परिणामी जनतेकडून देशी तसेच विदेशी वस्तूंची आयात मोठ्या प्रमाणावर होते. देशी वस्तूंच्या वाढत्या मागणीमुळे वस्तूंची टंचाई निर्माण होते. त्यामुळे त्या देशाची निर्यात घटण्याची शक्यता असते. तसेच वाढत्या मागणीमुळे देशात भाववाढीची स्थिती निर्मान होऊन आयातवृद्धी होण्याची शक्यता असते त्यामुळेही व्यवहारशेषात असमतोल निर्माण होतो.

**६) वाढती लोकसंख्या :**

अविकसित देशात लोकसंख्या झपाट्याने व मोठ्या प्रमाणावर वाढत असते. अशा सतत वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे देशाच्या आयातीत वाढ होते तर निर्यातीत घट होते आणि त्यामुळे देशाचा व्यवहार समतोल बिघडतो.

**७) प्रदर्शन प्रभाव :**

प्रदर्शन प्रभाव हे विशेषतः अविकसित देशाच्या व्यवहारशेषातील असमतोलाचे कारण होय. जेव्हा अविकसित देश आर्थिक, राजकीय, सामाजिक बंधनामुळे विकसित देशांच्या संपर्कात येतात तेव्हा विकसित देशांच्या राहणीमानाचा प्रभाव पडून अविकसित देशांची विविध वस्तूंकरिता मागणी वाढते त्यामुळे आयात वाढते.

**८) विकसित देशांकडून गुंतवणूकीचा अभाव :**

विकसित देशांनी अविकसित देशात जर मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली तर अविकसित देशात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली तर अविकसित देशात उद्योगधंदे वाढून रोजगार निर्मिती व उत्पादनात वाढ होते. परिणामी निर्यात वाढते आणि त्यामुळे व्यवहारशेषातील असमतोल दुर होऊ शकतो. परंतु अलिकडच्या काळात विकसित देश अविकसित देशात गुंतवणूक करण्यास असमती ठरले आहेत त्यामुळे अविकसित देशांच्या व्यवहारशेषात असमतोल आढळून येतो.

**९) नावलौकिक :**

बऱ्याच विकसनशील देशांनी आपल्या मालाविषयी नावलौकिकता कमावलेली आहे कारण त्या देशांत माल चांगला, टिकाऊ, दर्जेदार व खात्रीलायक असतो अशी जगभर प्रसिद्धी

झालेली असते. त्यामुळे बहुतांशी देशात अशा देशातीलच मालाची मागणी केली जाते. आज Made in U.S.A., Made in Japan असा शिक्का असणाऱ्या मालाला भरपूर मागणी आहे. त्यामुळे जागतिक अनेक देश अशा देशांकडून मालाची मोठ्या प्रमाणावर आयात करतात. परिणामी आयातीत झालेल्या वाढीमुळे व्यवहारशेषात असमतोल निर्माण होतो.

**१०) आर्थिक विषमता :**

अविकसित देशाच्या विकास होत असताना देशात आर्थिक विषमता वाढते. आर्थिक विषमतेमुळे अविकसित देशात श्रीमंतांचा एक वर्ग निर्माण होतो. हा श्रीमंतांचा वर्ग परदेशी प्रवास करणे, परदेशी वस्तू अधिक प्रमाणात वापरणे अशा अनेक गोष्टी करतात. त्यामुळे अविकसित देशातील पैसा परदेशात जातो. देशाची परदेशी मालाची आयात वाढते आणि त्याचा परिणाम म्हणून देशाच्या व्यवहारशेषात असमतोल निर्माण होतो.

**ब) आर्थिकेत्तर कारणे :**

**१) राजकीय घटक :**

देशात जर राजकीय अस्थिरता असेल तर मोठ्या प्रमाणावर परकीय भांडवल देशाबाहेर जाऊ शकते तसेच देशांतर्गत गुंतवणूकीचे प्रमाणही घटत जाते. परिणामी देशातील उत्पादन प्रक्रियेत अडथळे येतात व ती मंदावते. या सर्वाचा परिणाम त्या देशाच्या व्यवहारशेषात तूट किंवा असमतोल निर्माण होतो.

**२) सामाजिक घटक :**

लोकांच्या सवयी, आवडी, सामाजिक चालीरिती, रुढी-परंपरा, सतत बदलणारी फॅशन इत्यादी अनेक घटकांचा प्रभाव देशाची आयात प्रभावित करतात. तसेच लोकसंख्यावाढ, देशी वस्तूंबाबतच पूर्वग्रह इत्यादी अनेक घटकांमुळेही त्या देशाच्या निर्यातक्षमतेवर प्रभाव पडतो. अशा प्रकारे या सामाजिक घटकातील बदलांमुळेही व्यवहारशेष असमतोल आढळतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) व्यवहारतोल असमतोलाचे प्रकार सांगा.

२) व्यवहारतोल असमतोलाची विविध कारणे कोणती आहेत ?

## ७.४ व्यवहारतोल असमतोल दुरुस्त करण्याचे उपाय (MEASURES TO CORRECTING DISEQUILIBRIUM IN BOP)

देशाच्या व्यवहारतोलात दीर्घकाळ असंतुलन टिकून राहत असेल तर ते आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी आणि त्या देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी अयोग्य असते. व्यवहारतोलात जेव्हा तूट

असते, तेव्हा त्या देशांच्या वस्तूंची व सेवांची निर्यात आयातीच्या तुलनेने अधिक घटते. व्यवहारतोलात सतत तूट किंवा आधिक्य राहणे, अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने अयोग्य राहते.

व्यवहारतोलातील तूटीचे आधिक्यापेक्षा देशाच्या आर्थिक वृद्धीवर अधिक गंभीर परिणाम होत असतात. म्हणून व्यवहारतोलातील तूट लवकरात लवकर भरुन काढण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. पतिकूल व्यवहारतोल दुरुस्त करण्यासाठी निर्यातीला प्रोत्साहन आणि आयातीला प्रतिबंध असू शकेल. अशा प्रकारच्या उपाय योजना कराव्या लागतात.

प्रतिकूल व्यवहारतोल दुरुस्त करण्यासाठी वापरण्यात येणारे उपाय दोन प्रकारात स्पष्ट केले जातात.

अ) चलनी साधने :
१) चलनसंकोच
२) चलनाच्या बाह्यमूल्यात घट / ऱ्हास
३) अवमूल्यन
४) विनिमय नियंत्रण
या साधनांचा समावेश होतो.

ब) गैरचलनी साधने :
१) आयात जकाती
२) आयात कोटा
३) निर्यात प्रोत्साहन धोरण आणि कार्यक्रम इत्यादींचा समावेश होतो

व्यवहारतोल स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी योजण्यात येणाऱ्या चलनी साधनांचा दुहेरी परिणाम होत असतो. चलनी साधने एका बाजूला निर्यात वृद्धीसाठी उपयुक्त होतात तर दुसऱ्या बाजूला आयात कमी करण्यासाठी मदत करतात, चलनी साधनांचा परिणाम अप्रत्यक्षपणे होत असतो. तर दुसऱ्या बाजूला गैरचलनी साधनांचा परिणाम अप्रत्यक्षपणे होत असतो. तर दुसऱ्या बाजूला गैरचलनी साधनांचा परिणाम प्रत्यक्षपणे होत असतो. हा परिणाम प्रभावी असला तरी तो एकांगी असतो.

### अ) चलनी साधने (Monetary Measures) :

प्रतिकूल व्यवहारतोल दुरुस्त करण्यासाठी सामान्यपणे चलनीसाधने निर्माण वाढीला आणि आयात घटीला मदत करत असतात. काही प्रमुख चलनी साधने पुढीलप्रमाणे आहेत.

### १) चलनसंकोच :

व्यवहारतोलातील असमतोल दुरुस्त करण्यासाठी सनातन अर्थशास्त्रज्ञांनी हा उपाय सुचविला होता. चलनसंकोच म्हणजे महाग पैसा आणि पतधोरण स्वीकारुन देशातील पैशाच्या संख्येत घट केली जात असते. त्यामुळे देशी वस्तूंचा खर्च आणि किंमतीमध्ये घट होते. त्यामुळे देशाच्या निर्यात वस्तू विदेशी बाजारपेठांमध्ये स्वस्त होतात. म्हणून विदेशी बाजारपेठांमधील त्यांची मागणी वाढून देशाच्या चलनसंकोचामुळे उत्पन्न घट होऊन लोकांच्या देशी वस्तूंची मागणी

कमी केली जाते. त्यामुळे जास्तीत जास्त वस्तू निर्यातीसाठी उपलब्ध होतात व देशाची निर्यात वाढण्यास मदत होते. चलन संकोचामुळे देशातील लोकांचे उत्पन्न घटते त्यामुळे त्याची आयात प्रवृत्ती कमी होऊन आयात घटीस चालना मिळते. म्हणून चलन संकोचकारक चलनी धोरणामुळे जेव्हा निर्यात वाढते आणि आयात कमी होते तेव्हा व्यवहारतोलातील तूट आपोआप दुरुस्त होते.

### २) चलनाच्या बाह्य मूल्यात घट :

प्रतिकूल व्यवहारतोल दुरुस्त करण्यासाठी वापरण्यात येणारे महत्त्वाचे साधन म्हणून देशी चलनाच्या बाह्य मूल्यात घट करण्याचे धोरण याकडे बघितले जाते. जेव्हा देशात बदलते विनिमयदर धोरण स्वीकारलेले असते तेव्हाच या साधनांचा वापर करता येतो आणि चलनाच्या बाह्य मूल्यात घट करणे शक्य होते. एका देशाच्या चलनाचे दुसऱ्या देशातील चलनातील मूल्य जेव्हा कमी होते तेव्हा त्याचा अर्थ चलनाच्या बाह्य-मूल्यात ऱ्हास होत आहे असा होतो.

देशी चलनाच्या बाह्य मूल्यात ऱ्हास झाल्याने देशी वस्तू परकीयांना स्वस्त वाटतात. त्यामुळे निर्यात वाढीस चालना मिळते. याउलट आयात वस्तू देशी लोकांना महाग होतात. म्हणून त्यांची मागणी कमी होऊन आयातीत घट होते. त्यामुळे व्यवहारतोलात असलेली तूट कमी होऊन व्यवहारातील देशासाठी अनुकूल होण्यास मदत होते. देशाची आयात आणि निर्यात वस्तूंची मागणीची लवचिकता बऱ्यापैकी लवचिक असेल तर चलनाच्या बाह्य-मूल्यातील नाममात्र घट देखील व्यवहारतोलातील तूट सहजपणे दुरुस्त करण्यास मदत करणारी ठरते.

### ३) अवमूल्यन :

प्रतिकूल व्यवहारतोल असलेल्या देशामध्ये वापरले जाणारे महत्त्वाचे साधन म्हणजे चलनाचे अवमूल्यन होय. अवमूल्यन म्हणजे कायदेशीररित्या चलनाचे बाह्यमूल्य कमी करणार आहे. हे अवमूल्यन सर्व देशांच्या चलनाच्या बाबतीत किंवा सोन्याच्या संदर्भात केलेले असते. परंतु कधी-कधी काही निवडक देशांच्या चलनाच्या बाबतीतही केलेले असते. उदा. ६ जून १९६६ रोजी भारतीय डॉलरच्या संदर्भातील मूल्य ५७.५% कमी केले जाते. त्यामुळे अमेरिकन डॉलरच्या रुपयातील विनिमय दर = २२ सेंट ऐवजी १ = १३.३% सेंट असा निश्चित करण्यात आला.

चलनाच्या अवमूल्यनामुळे नियमित वृद्धीसाठी मदत होते. कारण परकीयांना आपल्या वस्तू स्वस्त वाटू लागतात. त्यामुळे ते आपल्या वस्तू अधिक प्रमाणात खरेदी करतात. याउलट परकीय वस्तू आपल्या देशातील ग्राहकांना देशी वस्तूंच्या तुलनेत महाग वाटतात. म्हणून आपले लोक त्या वस्तूंना फारशी पसंती देणार नाहीत. या सर्वांचा एकत्रितपणे परिणाम असा होतो की निर्याती मोठी वाढ होते आणि आयातीत घट होते.

### ४) विनिमय नियंत्रण :

व्यवहारतोलातील असमतोल दुरुस्त करण्यासाठी विविध देशांमध्ये वापरण्यात येणारे आणखी एक महत्त्वाचे साधन म्हणजे विनिमय नियंत्रण होय. व्यवहारतोलातील असमतोल खात्रीशिरपणे दूर करण्यासाठी या साधनांचा वापर होतो. या पद्धती अंतर्गत विनिमय नियंत्रण मंडळ किंवा मध्यवर्ती बँक निर्यातदारांना त्यांचे परकीय चलनातील सर्व उत्पन्न मध्यवर्ती बँकेकडे जमा करण्यास सांगते आणि हे परकीय चलन परवानाधारक आयातदारांना नियंत्रित दराने वाटते.

munotes.in

म्हणूनच विनिमय नियंत्रणामध्ये फक्त आयात परवाना धारकांनाच वस्तूची आयात करण्याची परवानगी असते. आयातीचा कोटाही निश्चित केलेला असतो त्यामुळे देशाची आयात-निर्यात उत्पन्नाच्या मर्यादेमध्येच ठेवली जाते आणि व्यवहारतोल असमतोल निर्माण होऊ दिला जात नाही.

## ब) गैरचलनी साधने किंवा राजकोषीय साधने (Non Monetary or Fiscal Measures) :

गैरचलनी साधनांमध्ये आयात जकाती आणि कोटा यांचा प्रामुख्याने उपयोग केला जात असतो. या साधनांमुळे निर्यातीला प्रोत्साहन मिळत असते. आयातीत घट घडून येते आणि देशी उद्योगांना संरक्षण मिळून आयात पर्यायीकरण आणि त्याचवेळेला काही प्रमाणात निर्यात वाढीला चालना मिळत असते त्यामुळे देशाच्या प्रतिकूल व्यवहारतोलात दुरुस्त होण्यास मदत होते.

### १) आयात जकाती :

प्रतिबंधात्मक उपाय म्हणून आयात शुल्क या साधनांचा वापर केला जातो. निवडक आयात वस्तुंवर आयात शुल्क लादल्यामुळे त्यांच्या आपल्या देशातील किंमती वाढतात. म्हणून त्या वस्तूंच्या मागणी घट होते. जर निर्यात परिणाम काय राहत असेल किंवा वाढत असेल आणि आयातीत घट होत असेल तर देशाच्या प्रतिकूल व्यवहारतोलात दुरुस्त होण्यास मदत होते.

### २) आयात कोटा :

प्रतिकूल व्यवहारतोलात दुरुस्त करण्यासाठी आयात कोटा हे एक उपयुक्त साधन म्हणून वापरण्यात येते. या आयात कोटा पद्धतीत सरकार आयात वस्तूंची परिणाम किंवा मूल्य निश्चित करते आणि तेवढेच त्या विशिष्ट कालावधीमध्येच आयात करता येते. त्यामुळे विदेशातील होणारी आयात मर्यादित साधली जाते आणि व्यवहारातील तूट त्या प्रमाणात कमी केली जाते.

व्यवहारतोलातील असमतोल दुरुस्त करण्याची एक प्रत्यक्ष पद्धती म्हणून आयात कोटा हे एक उपयुक्त साधन मानले जाते. कोटा पद्धतीचा लगेच परिणाम होतो. पाहिजे असल्यास आयात शून्यावर देखील आणता येते.

### ३) निर्यात प्रोत्साहन धोरण आणि कार्यक्रम :

वरील साधनांव्यतिरिक्त व्यवहारतोलात तूट असलेला देश निर्यात प्रोत्साहनाचे धोरण आणि कार्यक्रम राबवितो. निर्यात शुल्क कमी करणे, निर्यात उद्योगांना अनुदाने देणे यासारख्या साधनांचा वापर करुन निर्यातीला वेगाने चालना देता येते. आयात पर्यायी वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या उद्योगांना सरकार वेगवेगळ्या प्रकारे आर्थिक मदत आणि सहकार्य करुन त्यांच्या विकासासाठी प्रयत्न करते.

प्रतिकूल व्यवहारतोल दुरुस्त करण्यासाठी ही गैरचलनी साधने अधिक परिणामकारक असतात. त्यामुळे या साधनांचा वापर उपयोग चलनी साधनांऐवजी केला जातो.

munotes.in

**आपली प्रगती तपासा :**

१) असमतोल व्यवहारतोल दुरुस्त करणाऱ्या मौद्रिक पद्धती (उपाय) कोणत्या आहेत ?
२) अवमूल्यन म्हणजे काय ?
३) असमतोल व्यवहारतोल दुरुस्त करण्याची गैरचलनी साधने कोणती ?

## ७.५ सारांश (CONCLUSION)

समष्टी अर्थशास्त्रात व्यवहारतोल ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची आहे. विशिष्ट काळात स. आयात व निर्यात होणाऱ्या सर्व आर्थिक व्यवहाराची पद्धतशीरपणे नोंद ठेवणे म्हणजे व्यवहारतोल होय. व्यवहारतोलाची रचना व व्यवहार दुहेरी नोंद पद्धतीप्रमाणे होत असतात. व्यवहारतोल असमतोलाचे अल्पकालीन, दिर्घकालीन, मुलभूत चक्रीय असे विविध प्रकार आहेत. तसेच अनेक आर्थिक व आर्थिकेत्तर घटकांचा प्रभाव व्यवहारतोल असमतोल होण्यास दिसून येतो. प्रत्येक देशाची अर्थव्यवस्था किंवा शासन व्यवहार तोल असमतोल दुरुस्त करण्यासाठी मौलिक (Monetary), राजस्व (Fiscal) आणि प्रत्यक्ष उपयांचा उपयोग करुन व्यवहारतोलातील असमतोल साधण्याचा प्रयत्न करते. साधारणतः जागतिक अर्थव्यवस्थेत प्रामुख्याने अविकसित, विकसनशील देश चालु खात्यावरील आणि भांडवली खात्यावरील व्यवहारतोल समायोजनासाठी प्रयत्नशील असतात.

## ७.६ सराव प्रश्न (QUESTIONS)

१) व्यवहारतोल म्हणजे काय ? व्यवहारतोलाची संरचना स्पष्ट करा.
२) व्यवहाराची संज्ञा स्पष्ट करुन व्यवहाराच्या संरचनेचे आणि घटकांचे थोडक्यात वर्णन करा.
३) व्यवहारतोल असमतोलाची विविध कारणे कोणती आहेत ?
४) व्यवहारतोल असमतोलास जबाबदार असणाऱ्या विविध घटकांची चर्चा करा.
५) व्यवहारतोल असमतोल दुरुस्त करण्याचे विविध उपाय थोडक्यात स्पष्ट करा.
६) व्यवहारतोल असमतोल दुरुस्त करण्याचे मौद्रिक व राजकोषीय उपाय स्पष्ट करा.
७) टिप लिहा. व्यवहारतोल असमतोलाचे विविध प्रकार.

❖❖❖❖

# घटक -८

# विनिमय दर निर्धारण
# (DETERMINATION OF EXCHANGE RATE)

**घटक रचना :**

८.० उद्दिष्ट्ये
८.१ प्रस्तावना
८.२ विनिमय दर निर्धारण
८.३ विदेशी मुद्रा व त्याचे घटक
८.४ माहितीचे स्त्रोत
८.५ सारांश
८.६ सराव प्रश्न

## ८.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

परकिय विनिमय बाजार आणि परकिय विनिमय दर या संकल्पनांना आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रात एक आगळे वेगळे स्थान आहे. चलनाची अदलाबदल हे विदेशी विनिमय बाजाराचे प्रमुख कार्य आहे याच अनुषंगाने या पाठात पुढील महत्त्वाच्या उद्दिष्टांचा विचार करणार आहोत.

१. परकिय विनिमय बाजार, विनिमय दर याचा अर्थ समजुन घेणे.
२. विदेशी विनिमय दराचे निर्धारण कसे होते हे अभ्यासणे.
३. विदेशी मुद्रा व त्याचे घटक जाणून घेणे.
४. विदेशी विनिमयदराविषयी माहिती व तिचे स्त्रोत अभ्यासणे.

## ८.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

आंतरराष्ट्रीय व्यापारात दोन किंवा दोन पेक्षा जास्त देशात व्यवहार होत असतात. प्रत्येक देशाची चलनपद्धती वेगवेगळी असते. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विचार करताना विनिमय दराचा विचार करावा लागतो. प्रस्तुत प्रकरणात परकिय विनिमय बाजार, त्यांचे घटक व कार्ये, विनिमय दर निर्धारण विदेशी मुद्रा (FOREX) व त्याचे घटक इत्यादी घटकांचा अभ्यास विचारात घेतला आहे.

## ८.२ विनिमय दर निर्धारण (EXCHANGE RATE DETERMINATION)

परकिय विनिमय व्यवहारात उत्पन्न आणि संपत्तीच्या हक्कांचे एका देशाच्या चलनाचे परिवर्तन दुसऱ्या देशाच्या चलनात करता येते. या पद्धतीत काही बाबींचा अभ्यास केला जातो.

कोणत्याही देशाचे चलन भौतिकदृष्ट्या (Physically) बदलता येत नाही. त्याचा कायदेशीररित्या संबंधित देशात विनिमय केला जातो व त्याची नोंद घेतली जाते.

ज्या बाजारात परकीय चलनाच्या खरेदी विक्रीचे व्यवहार केले जातात त्या बाजारात विनिमय बाजारपेठ असे म्हणतात.

परकीय विनिमय बाजार ही एक अशी संख्यात्मक यंत्रणा असते की, त्यामध्ये बँका, व्यापारी, व्यक्ती, संस्था, सरकार इ. च्या द्वारे परकीय चलनांची खरेदी विक्री होत असते. या बाजारात व्यापारी, दलाल, बँका आणि मध्यवर्ती बँका परकीय विनिमय बाजारातील प्रमुख खरेदीदार असतात. विनिमय बाजारातील मध्यस्थ दलाल परकीय चलनाची खरेदी विक्री करुन लाभ मिळवतात. परकीय विनिमय बाजार हे नाणेबाजाराचे वित्तीय केंद्र आहे.

विदेशी विनिमय बाजार म्हणजेच एक अशी यंत्रणा की, ज्याद्वारे विदेशी चलनाची खरेदी आणि विक्री केली जाते. या बाजारपेठेत विदेशी चलनाचे खरेदीदार आणि विक्रेते यांचा तसेच मध्यस्थांचा समावेश होतो. अत्याधुनिक दळणवळणाच्या साधनाद्वारे या बाजारात चलनांची खरेदीविक्री होत असते. या बाजारात विविध दलालांचा समावेश होतो.

**विदेशी चलनाचे व्यवहारकर्ते / घटक :**

विदेशी विनिमय बाजारपेठेतील चलनाच्या देवाणघेवाणीचे व्यवहार करणारे प्रमुख घटक पुढीलप्रमाणे :

१) विदेशी चलनाचे ग्राहक
२) पर्यटक
३) व्यापारी बँका - i) लाभक्षमता ii) धोक्याचे व्यवस्थापन iii) ग्राहकाभिमुख सुविधा
४) केंद्रिय (मध्यवर्ती) बँक
५) बिलांचे दलाल (Bill brokers)
६) स्वीकृती गृहे (Acceptance House)
७) वटाव गृहे (Discount Houses)

**विदेशी विनिमय दराचा अर्थ :**

विदेशी विनिमय दर म्हणजे एक चलनाची दुसऱ्या चलनात व्यक्त केलेली किंमत होय. विनिमय दरामुळे दोन देशातील चलनाचा परस्परांशी असणारा संबंध स्पष्ट होतो. विनिमय दराची अशी व्याख्या करता येते की देशांतर्गत चलनाच्या शर्तीत परकीय चलनाच्या एका एकाकाची किंमत होय.

विनिमयाचा दर रुपया आणि डॉलरचा विचार करता किती रुपयामध्ये डॉलरची खरेदी केली जाते किंवा १ डॉलरमध्ये किती रुपये मिळतील यावर विनिमय दर अवलंबून असतो. जर विनिमय दर रुपया आणि डॉलर भारताच्या (point) पासून (expressed) रुपये ४५=$१ अमेरिकन डॉलर असा असेल तर त्याचा अर्थ भारताचा १ डॉलर मिळविण्यासाठी ४५ रुपये खर्च करावे लागतात.

**विदेशी विनिमय दर निश्चिती :**

आंतरराष्ट्रीय व्यापारात विदेशी विनिमय दर ही संकल्पना फारच महत्त्वाची आहे. परकीय विनिमय दरामुळे दोन देशातील चलनांचा परस्परांशी असणारा संबंध स्पष्ट होतो. विनिमय दर निश्चितीचे अनेक सिद्धांत आहेत त्यापैकी विदेशी विनिमय दर निश्चित व्यवहारतोल सिद्धांतानुसार विनिमय दर हा पुढील दोन घटकांवर आधारित असतो.

i) विदेशी चलनाची मागणी (Demand for Foreign Exchange DF)
ii) विदेशी चलनाचा पुरवठा (Supply of Foreign Exchance SF)

सूत्र रुपाने $\boxed{F.E.R = f\left(Df.Sf\right)}$

वरील सुत्रात
FER = Foreign Exchange Rate विदेशी विनिमय दर
F = Functional Relationship फलनात्मक संबंध
Df = Demand for Foreign Exchange विदेशी चलनाची मागणी
Sf = Supply of Foreign Exchange विदेशी चलनाचा पुरवठा

**विदेशी चलनाची मागणी :**

विदेशी चलनाची केली जाणारी मागणी पुढीलप्रमाणे हेतून होत असते.

**१) वस्तूची आयात :**

हे विदेशी चलनाचे मागणीचे एक प्रमुख कारण आहे. या सेवा पुढील दोन प्रकारच्या असू शकतात.

अ) व्यक्तीगत सेवा - (डॉक्टर्स, वकील, प्राध्यापक, संगीतकार इ.)
ब) संस्थात्मक सेवा - (बँका, विमा कंपन्या, शिक्षण, संस्था, वाहतूक, दळणवळण, पर्यटन इ.)

अशा सेवांच्या किंमती व्यक्त करण्यासाठी विदेशी चलनाला मागणी होत असते.


**२. विदेशातील देणी :**

अनेकदा इतर देशांना बक्षीस, देणग्या, अनुदाने, वित्तीय मदत इ. देणी देण्यासाठी विदेशी चलनाची मागणी होत असते.

परकीय चलनाची किंमत ज्यावेळी अधिक असते त्यावेळी परकीय चलनासाठी केली जाणारी मागणी कमी असते तर ज्यावेळी परकीय चलनाची किंमत कमी असते अशावेळी परकीय

munotes.in

चलनाची मागणी अधिक केली जाते. म्हणूनच विदेशी चलनाच्या मागणीचा वक्र पुढील आकृतीत दर्शविल्याप्रमाणे ऋणात्मक उताराचा दिसून येतो.




**आकृती ८.१**

वरील आकृतीत X अक्षावर डॉलर्स संदर्भात पाऊंडला असलेली मागणी तर Y अक्षावर विदेशी विनिमय दर दर्शविलेला आहे. Df हा विदेशी चलनाचा मागणीचा वक्र असून तो डावीकडून उजवीकडे वरुन खाली येणारा ऋणात्मक उताराचा वक्र आहे. हा वक्र विदेशी विनिमय दर आणि विदेशी चलनाची मागणी यातील व्यस्त संबंध दर्शवतो.

ज्यावेळी डॉलर $ आणि पाऊंड ₤ यामधील विनिमय दर 2$ = 1₤ असा आहे त्यावेळी इंग्लंडच्या १०००₤ पाऊंडला मागणी केली जाते. परंतु ज्यावेळी विनिमय दर घडून १.५ डॉलर्स -१ पाऊंड झाल्यास डॉलरच्या तुलनेत पूर्वीपेक्षा पाऊंड स्वस्त झाल्याने पाऊंडसाठी मागणी वाढून ती १५०० पौंड अशी वाढलेली दिसून येते.

**विदेशी चलनाचा पुरवठा :**

विदेशी चलनाचा पुरवठा पुढील घटकांमार्फत निर्धारित होतो.

**१) सेवांची निर्यात :**

सेवा निर्यातीमध्ये व्यक्तीगत सेवा आणि संस्थात्मक सेवा अशा सेवांचा समावेश होतो. अशा सेवांची विदेशातील निर्यात जितकी अधिक तितका विदेशी चलनाचा पुरवठा अधिक राहिल.


**२) वस्तूंची निर्यात :**

विदेशी येण्याचा पर्यायाने विदेशी चलनाच्या पुरवठ्याचा हा प्रमुख मार्ग आहे. विदेशी चलनाचा पुरवठा हा वस्तूच्या निर्यातीचा आकार निर्यात वस्तूंची किंमत यावर अवलंबून असतो. निर्यातीचा आकार अधिक असताना किंवा निर्यात मालाच्या किंमती अधिक असताना विदेशी चलनाचा पुरवठा देखील अधिक राहतो.

**३) विदेशी येणी :**

देणग्या, अनुदाने, विदेशी वित्तीय मदत, व्याज अशा विदेशी येण्यातून विदेशी चलनाचा पुरवठा वाढतो.

ज्यावेळी विदेशी विनिमय दर अधिक त्यावेळी विदेशी चलनाचा पुरवठा अधिक ज्यावेळी विनिमय दरात घट घडून येते त्यावेळी विदेशी चलनाच्या पुरवठा देखील घडू लागतो. विनिमय दर आणि विदेशी चलनाचा पुरवठा यातील सम संबंधामुळे विदेशी चलनाचा पुरवठा वक्र पुढील आकृतीत दर्शविल्याप्रमाणे धनात्मक स्वरुपाचा दिसून येतो.





**आकृती ८.२**

वरील आकृतीत X अक्षावर डॉलरच्या मोबदल्यात पाऊंडचा होणारा पुरवठा दर्शवलेला असून Y अक्षावर विदेशी विनिमय दर दर्शविलेला आहे. हा विदेशी चलनाचा पुरवठा वक्र असून तो धनात्मक स्वरुपाचा आहे.

ज्यावेळी विनिमयाचा दर १.५ डॉलर = १ पाऊंड असा कमी असतो त्यावेळी इंग्लंडमार्फत पाऊंडचा केला जाणारा पुरवठा १००० पाऊंड इतका आहे. परंतु ज्यावेळी विनिमयाचा दर वाढून 2$ = £1 असा होतो त्यावेळी जास्त डॉलर्स मिळवण्यासाठी इंग्लंडमार्फत पाऊंडचा पुरवठा देखील वाढवून तो २५०० पाऊंड झाल्याचे दिसून येते.

## संतुलन बिंदू आणि विनिमय दर निश्चिती (Determination of Exchange Rate) :

विदेशी चलनाची मागणी आणि विदेशी चलनाचा पुरवठा ज्या ठिकाणी समान बनतो तो संतुलन बिंदू असून त्या बिंदूत समतोलित विनिमय दराची निश्चिती होते हेच पुढील आकृतीद्वारे स्पष्ट करता येईल.




**पाउंडची (£) मागणी व पुरवठा**
**आकृती ८.३**

वरील आकृती X अक्षावर विदेशी चलनाची मागणी व विदेशी चलनाचा पुरवठा विचारात घेतला असून Y अक्षावर विनिमय दर दर्शविलेला आहे. Df हा विदेशी चलनाचा मागणीवक्र तर Sf हा विदेशी चलनाचा पुरवठा वक्र आहे. हे दोन्ही वक्र परस्परांना E बिंदूत छेदून जातात. या ठिकाणी संतूलनाची अट पूर्ण होऊन E या संतूलन बिंदूत Y अक्षावर संतूलीत विनिमयाचा OR हा दर निश्चित होतो.

OR या संतूलीत विनिमय दरात वाढ झाल्यास नवीन विनिमय दर $OR_1$ असा निश्चित होतो. परंतु या विनिमय दराला विदेशी चलनाची मागणी a बिंदूमध्ये कमी तर विदेशी चलनाचा पुरवठा 'b' बिंदूमध्ये अधिक अशी असंतुलनाची परिस्थिती निर्माण होवून $OR_1$ हा विनिमयाचा दर पुन्हा घडून OR अशा पूर्वपदावर येवून स्थिरावेल.

याऊलट जर विनिमयाचा दर $OR_2$ असा कमी झाला तर d बिंदूत विदेशी चलनाची मागणी वाढून व C बिंदूत विदेशी चलनाचा पुरवठा घटून पुन्हा असंतूलन निर्माण होईल. अशा वेळी विनिमयाचा दर वरच्या दिशेने वाढून पुन्हा OR असा संतुलनाच्या ठिकाणी स्थिरावेल व हाच विनिमयाचा दर टीकून राहील.

**आपली प्रगती तपासा :**

१) परकिय विनिमय बाजार म्हणजे काय ?
२) परकिय विनिमय बाजाराचे व्यवहारकर्ते / घटक कोणते आहेत ?
३) परकिय विनिमय दर निर्धारण कसे होते ?

**विदेशी विनिमय बाजारपेठेची कार्ये :**

विदेशी विनिमय बाजारपेठेमार्फत पुढील कार्ये केली जातात.

**१) चलनाचे परिवर्तन करणे :**

विदेशी विनिमय बाजाराचे प्रमुख कार्य म्हणजे विशिष्ट परकीय चलनाचे ग्राहकांच्या मागणीनुसार इतर देशांच्या चलनात परिवर्तन करणे हे असते.

**२) खरेदीशक्तीचे हस्तांतरण :**

विनिमय बाजारपठेचे एक महत्त्वाचे कार्य म्हणजेच खरेदीशक्तीचे एका देशातून दुसऱ्या देशात हस्तांतरण करणे होय. देशातल्या देशातील खरेदीशक्तीचे हस्तांतरण मध्यवर्ती बँकेच्या संशोधन गृहामार्फत होत असते. मात्र दोन देशात भिन्न प्रकारचे चलन अस्तित्वात असल्याने क्रयशक्तीचे हस्तांतरण Bank Draft व धनादेशाद्वारे करता येत नाही. आंतरराष्ट्रीय पातळीवर संशोधनाची स्वतंत्र अशी यंत्रणा नसते. त्यामुळे विविध देशातील चलन देण्याघेण्याचे व्यवहार विदेशी विनिमय बाजारामार्फत पार पाडले जातात.

**३) परकीय चलनात कर्जपुरवठा :**

आंतरराष्ट्रीय व्यापारात भाग घेणाऱ्यांना विदेशी चलनातील कर्जपुरवठा करणे हे विनिमय बाजाराचे एक महत्त्वाचे कार्य असते. कारण आयात व्यापाऱ्यांना आयातीची किंमत परकीय चलनात द्यावी लागते. त्यासाठी त्याला काही कालावधीची आवश्यकता असते. तर निर्यात व्यापाऱ्यास त्याने निर्यात केलेल्या मालाची तात्काळ किंमत हवी असते असा वेळी आयात व्यापारी विनिमय बाजारातून परकीय चलनाच्या स्वरुपात कर्ज घेवून आयातीची किंमत तात्काळ देवू शकतो. आयात आणि निर्यात व्यापारी भिन्न देशांचे नागरिक असल्याने त्यांना एकमेकांच्या पतविषयक Credit माहिती नसते. अशा परिस्थितीत आयात व्यापाऱ्यांना विदेशी चलनातील कर्ज देणे हे विनिमय बाजाराचे महत्त्वाचे कार्य असते.

**४) हमी स्वीकारणे :**

आयात निर्यात व्यापारात भाग घेणारे विविध देशातील असल्याने त्याचा एकमेकांवर विश्वास नसतो अशा वेळी निर्यात व्यापाऱ्यांना त्यांनी निर्यात केलेल्या मालाची तात्काळ किंमत मिळावी अशी अपेक्षा असते. त्याचप्रमाणे आयात व्यापारी माल ताब्यात मिळविल्याशिवाय त्यांची किंमत देण्यास तयार नसतात. अशावेळी आयात आणि निर्यात व्यापाऱ्यांच्या व्यवहाराची हमी विनिमय होत असतो. निर्यात व्यापाऱ्यांना त्यांनी निर्यात केलेल्या मालाची किंमत देण्याची हमी घेतली जाते. त्याचप्रमाणे आयात व्यापाऱ्यास त्याने खरेदी केलेला माल खात्रीशीर मिळेल अशी हमी घेतली जाते. अशा हमीमुळे व्यापाऱ्यात विश्वासाचे वातावरण तयार होवून व्यापार वाढण्यास मदत होते.

**५) समाशोधन गृह (Clearing House) :**

विदेशी विनिमय बाजारामुळे आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याचे व्यवहार मिटविण्यासाठी समाशोधन गृहाची सुविधा उपलब्ध होते.

munotes.in

**६) हुंड्या व विनिमय पत्र व्यवहार :**

आंतरराष्ट्रीय व्यापारातून निर्माण होणाऱ्या हुंड्याच्या मागणीनुसार पुरवठा करता येतो. विदेशी विनिमय बँकाकडून विदेशी चलनाच्या स्वरुपातील विनिमय वियंत्रे गोळा करुन त्याची विक्री आयात व्यापाऱ्यामध्ये करणे विनिमय बाजारामुळे शक्य होते.

**७) चलनाची आदलाबदल :**

दोन देशातील चलनांची आदलाबदल करुन देणे हे विनिमय बाजाराचे मुख्य कार्य आहे.

**८) विनिमय बाजार संरक्षण :**

वरील कार्याबरोबरच विनिमय बदलामुळे होणारे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी विनिमय बाजार संरक्षण म्हणून कार्य करतो. विदेशी विनिमय बाजारातील देण्याघेण्याचे व्यवहार पार पाडण्यासाठी विदेशी चलन, सोन्याची निर्यात, आंतरराष्ट्रीय स्वरुपाच्या हुंड्या, बँक, ड्राफ्ट, टेलिग्राफिक ट्रान्सफर आणि प्रवासी धनादेश यांचा वापर केला जातो. विदेशी विनिमयाचे व्यवहार करण्यामध्ये विनिमय बाजारातील मध्यस्थ, विनिमय बँका व मध्यवर्ती बँकेचा प्रामुख्याने समावेश होतो. देण्याघेण्याचे व्यवहार करण्यासाठी विनिमय दराला महत्त्व असते. दर निश्चित करताना हुंड्या व कर्जरोख्यांचा विचार केला जातो.

**आपली प्रगती तपासा :**

१) विदेशी विनिमय बाजारपेठेची कार्ये कोणती आहेत ?

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ८.३ विदेशी मुद्रा (FOREX) व त्याचे घटक (FOREX AND FACTORS OF FOREX)

विदेशी मुद्रा म्हणजे परकिय चलनांचा साठा होय. असा परकिय चलनाचा साठा किंवा संपत्ती देशाची मौद्रिक संस्था किंवा अधिकारी व्यवस्थितरित्या ताब्यात ठेवते आणि परकिय विनिमय बाजारातील विनिमय दरातील चढउतार किंवा सट्टेबाजीसारखे व्यवहार रोखण्यासाठी हस्तक्षेप करते.

विदेशी मुद्रा व्यवहारतोलातील असमतोल दुर करण्यासाठीही (Deficit BOP) उपयोगात आणली जाते. विदेशी मुद्रा यामध्ये मुख्यत्वेकरुन विदेशी चलन कि जे आंतरराष्ट्रीय व्यवहारासाठी स्विकारले जाते. यामध्ये शुद्ध सोने, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी राखीव चलन आणि विशेष आहरण अधिकार (SDR) समावेश आहे.

भारताच्या विदेशी मुद्रा यामध्ये (India's Forex) रोख, बँकेच्या ठेवी, रोखे (Bonds) आणि इतर वित्तीय संपत्तीचा समावेश आहे. या सर्व माध्यमातून भारताची मध्यवर्ती बँक (RBI) / (Central Bank) देशाच्या चलनातून (भारतीय रुपया) विदेशी मुद्रेचा साठा राखून ठेवते. भारताची रिझर्व्ह बँक (RBI) भारत सरकारसाठी विदेशी मुद्रेचे व्यवस्थापन करते. विदेशी मुद्रा ही परकिय चलन संपत्तीचे प्रमुख घटक आहे.

विदेशी मुद्रा परकिय व्यापार (External) किंवा बहिर्गत व्यापार आणि आंतरराष्ट्रीय व्यवहार देणी-घेणी सुलभ करते. तसेच देशाच्या विकासाला व्यवस्थित प्रोत्साहन देण्यासाठी भारतातील परकिय विनिमय बाजाराचा प्रतिपाळ करण्यासाठी मदत करतो.

**विदेशी मुद्रेचे घटक (Components of FOREX) :**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायदा आणि परकिय विनिमय व्यवस्थापन कायदा, १९९९ नुसार देशासाठी किंवा सरकारसाठी विदेशी मुद्रेची कायदेशीर तरतुद केलेली आहे. भारताची रिझर्व्ह बँक (RBI) खुल्या बाजारात अधिकृत दलालांकडून परकिय चलनाची खरेदी करणे. जेवहा भारताची रिझर्व्ह बँक विदेशी मुद्रेचा उपयोग जागतिक व्याजदर वाढू लागतो तेव्हा रुपयाची अस्थिरता कमी करण्यासाठी करते. यामध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया महत्त्वाची भूमिका बजावून विनिमय दर स्थैर्य राखण्याचा प्रयत्न करते.

भारताच्या विदेशी मुद्रेचा समावेश पुढील चार विभागात केला आहे.

१) परकिय चलन संपत्ती (Foreign Currency Assets)
२) सोने (Gold)
३) आंतरराष्ट्रीय नाणेनिधी राखीव चलन (IMF Reserve Tranche)
४) विशेष आहरण / उचल अधिकार (SDR)

वरील सर्व विभागांचा थोडक्यात परिचय करुन घेऊ.

**१) परकिय चलन संपत्ती (Reserve Currencies) :**

परकिय चलनसंपत्ती ही आंतरराष्ट्रीय दर्जाची चलन संपत्ती असून ती आंतरराष्ट्रीय व्यवहारासाठी स्विकारली जाते. सध्या ह्या संपत्तीचा समावेश अमेरिकन डॉलर (US$), युरोपियन डॉलर (Euro ∈), ब्रिटिश पांऊड (£), जॅपनिज येन (Japanese Yen Ψ) आणि अलिकडेच समाविष्ठ झालेले चायनिज युआॅन / रेनमिनही (Chinese Yuon - Ψ) अशा प्रमुख पाच विदेशी चलनात आहे.

**२) सोने (Gold) :**

देशाची मौद्रिक व्यवस्था सरकारी सोन्याचा साठा बाळगत असते. आंतरराष्ट्रीय व्यवहार देण्या-घेण्याचे साधन म्हणून पूर्वी शुद्ध सोने वापरले जात होते. परंतू त्यास मर्यादा होत्या. दक्षिण आफ्रिका आणि रशिया वगळता इतर सर्व देशांना सोन्याचा पुरेसा साठा बाळगणे शक्य नाही. सोन्याचा तुटवडा किंवा टंचाई हे एक महत्त्वाचे कारण सुवर्णधिष्ठित विनिमय दर पद्धत (Gold Standard Exchange Rate System) किंवा ब्रेटेन वूडस् पद्धत कोलमडण्यास कारणीभूत किंवा जबाबदार होते.

### ३) नाणेनिधी राखीव ट्रान्ची (IMF Reserve Tranche) :

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे सदस्य देश वित्तीय साठ्यामध्ये योगदान करतात. प्रत्येक सदस्य देश आपल्या आर्थिक ताकदीनुसार ठरवून दिलेल्या कोटा (वाटा) हा २५% शुद्ध सुवर्णामध्ये किंवा १०% निव्वळ सरकारी / कार्यालयीन सोने आणि अमेरिकन डॉलरमध्ये योगदान केले जाते किंवा दिलेल्या वाटा पूर्ण केला जातो. हा २५% वाटा त्या देशाला अधिकाराप्रमाणे वापरता येतो. म्हणून सोने / साठा किंवा पतसुविधा (Credit Tranche) या सर्वांना एकत्रितपणे विदेशी मुद्रा (FOREX) असे म्हटले जाते.

### ४) विशेष आहरण / उचल अधिकार (Special Drawing Rights - SDR) :

विशेष उचल अधिकार हे आंतरराष्ट्रीय रोख (Reserve) संपत्ती असून ते आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने निर्माण केले आहे. याची निर्मिती सोन्याला पर्याय म्हणून केलेली असल्यामुळे याला कागदी सोने (Paper Gold) असेही म्हटले जाते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने काढलेले हे काल्पनिक चलन असून त्याचा वापर आंतरराष्ट्रीय रोखतेची (International Liquidity) समस्या सोडविण्यासाठी मुख्यत्वे करुन केला जातो.

(SDR) ची कल्पना केन्सच्या आंतरराष्ट्रीय निरसन केंद्र (International Clearing Union) व बँकर या आंतरराष्ट्रीय चलन एककाच्या योजनेतून साकार झाली, या योजनेतंर्गत नाणेनिधीने (IMF) विशेष उचल खाते सुरु करुन त्यानुसार SDR निर्माण करण्यात आले. SDR च्या एका एककाचे मुल्य (Value of 1 unit of SDR = 1.397090 US $) 1 SDR = 1.397090 अमेरिकन डॉलर इतके २०१६ आकडेवारीनुसार सांगण्यात येते.

१९७४ पासून एका SDR चे मुल्य जगातील १६ प्रमुख राष्ट्रांच्या चलन टोपलीच्या (Basket of Currency) मुल्याएवढे असते. २०१६ पासून SDR च्या चलन टोपलीत प्रमुख पाच चलनांचा समावेश आहे. SDR चे मूल्य हे निर्देशांक पद्धतीनुसार काढले जाते.

SDR = U.S. $ = 41.73%, Euro € = 30.93%, Renminbi (Chinese Yuan) ¥ = 10.92%, Japanese Yen = 8.33% and British Pound ₤ = 8.09%.

(41.73 + 30.93 + 10.92 + 8.33 + 8.09 = 100)

SDR हे गोल्ड ट्रान्ची (Gold Tranche) आणि क्रेडिट ट्रान्ची (Credit Tranche) Tranche - French शब्द आहे याचा अर्थ मूल्य असा होतो.

## ८.४ माहितीचे स्त्रोत (SOURCE OF INFORMATION)

विदेशी मुद्रा व त्याचे घटक तसेच विदेशी मुद्रेचे जागतिक अर्थव्यवस्थेतील महत्त्व दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. विदेशी मुद्रा व त्याची माहिती व प्रवृत्ती परकीय चलन संपत्ती, सुवर्णसाठा, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडील परकिय चलन साठा, SDR अशा विविध मार्गाने / माध्यमातून उपलब्ध होत असते.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे सदस्य देश आपल्या देशाची रोखतेची समस्या सोडवण्यासाठी व्यवहारतोलातील तुट भरुन काढण्यासाठी बाळगलेल्या परकीय चलनाचा साठा (FOREX) उपयोगात आणतात.

भारतानेही परकिय चलनाचा साठा / विदेशी मुद्रेचा बाळगुण आणि वेळोवेळी चलन संकट, वित्तीय संकट आणि कर्जेआरिष्ट्य अशा आंतरराष्ट्रीय स्तरावरील आर्थिक संकटाचा विदेशी मुद्रेचा वापर करुन सामना केला आहे. सध्या भारताची स्थिती विदेशी मुद्रेच्या बाबतीत समाधानकारक किंवा दिलासा देणारी आहे. पुढील तक्यात भारताची विदेशी संपत्ती दर्शविलेली आहे.

भारताचा परकिय चलनाचा साठा / विदेशी मुद्रा (FOREX)
(अमेरिकन डॉलर कोटीमध्ये - US$ Billions)

| वर्ष | विदेशी चलन साठा वित्तीय वर्ष मार्च २०१७ अखेर |
|---|---|
| २०१० - ११ | ३०४.५ |
| २०११ - १२ | २९४.४ |
| २०१२ - १३ | २९२.० |
| २०१३ - १४ | ३०४.२ |
| २०१४ - १५ | ३४१.६ |
| २०१५ - १६ | ३६७.० |
| २०१६ - १७ | ४००.० |

वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट होते की, भारताची विदेशी चलन संपत्ती २००८ मध्ये २४७ US$ Billion एवढी होती ती आता २०१६-१७ मध्ये ४०० US$ Billion इतकी वाढलेली दिसून येते. याचा अर्थ सध्या भारत विदेशी मुद्रेबाबत समाधानकारी आहे.

## ८.५ सारांश (CONCLUSIONS)

आंतरराष्ट्रीय व्यवहारात किंवा व्यापारात परकिय चलन बाजार, परकिय चलन दर आणि परकिय चलन साठा यांना फार महत्त्व आहे. बाजारपेठेच्या मागणी व पुरवठ्यानुसार विनिमय दराचे निर्धारण होते. चलनाचे मुल्य ठरते. आंतरराष्ट्रीय व्यापारात देवाण-घेवाणीचे व्यवहार विविध विदेशी मुद्रेमार्फत होत असतात. विदेशी चलनासाठ्यामध्ये (FOREX) प्रामुख्याने परकिय चलने, (अमेरिकन डॉलर, युरो डॉलर, जॅपनिज येन, ब्रिटिश पाऊंड, आणि चायनीज युआॅन) शुद्ध सोने, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडील चलन साठा SDR इत्यादींचा समावेश होतो. सध्या भारताची विदेशी मुद्रेची स्थिती समाधानकारक आहे. (400 US$ Billions in 2016-17) देश व विदेशी पातळीवरील आर्थिक संकटाना सामोरे जाण्यास विदेशी मुद्रा उपयुक्त ठरते. देशाची एकुणच पत / दर्जा (Standard) सुधारण्यास विदेशी मुद्रा महत्त्वाची असते.

## ८.६ सराव प्रश्न (QUESTIONS)

१) विनिमय दर म्हणजे काय ? विनिमय दराचे निर्धारण आकृतीच्या सहाय्याने स्पष्ट करा.

२) विनिमय दराची निश्चिती सुयोग्य आकृतीच्या सहाय्याने स्पष्ट करा.

३) परकिय विनिमय बाजारपेठेची विविध कार्ये कोणती आहेत ?

४) विदेशी मुद्रा म्हणजे काय ? त्याचे विविध घटक कोणते आहेत ?

५) टिपा लिहा.

   १) विदेशी मुद्रा व त्याचे घटक

   २) माहितीचे स्त्रोत

❖❖❖❖

munotes.in

## प्रथम वर्ष कला शाखेतील अर्थशास्त्र अभ्यासक्रमांसाठी २०२०-२०२१ पासून सत्रांतीपरीक्षेसाठी प्रश्नपत्रिकेचा सुधारित नमुना

**परीक्षेचा कालावधी : ३ तास** **एकूण गुण : १०० (प्रती सत्र)**

**सर्व प्रश्नांना २० गुण आहेत आणि सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.**
**प्रत्येक प्रश्नांत अंतर्गत निवड असेल.**

प्र. १ कोणतेही दोन प्रश्न सोडवा. (प्रकरण १) २० गुण
अ
ब
क

प्र. २ कोणतेही दोन प्रश्न सोडवा. (प्रकरण २) २० गुण
अ
ब
क

प्र. ३ कोणतेही दोन प्रश्न सोडवा. (प्रकरण ३) २० गुण
अ
ब
क

प्र. ४ कोणतेही दोन प्रश्न सोडवा. (प्रकरण ४) २० गुण
अ
ब
क

प्र. १ कोणतेही दोन प्रश्न सोडवा. (प्रकरण १,२,३,४ प्रत्येक प्रकरणातून एक प्रश्न) २० गुण
अ
ब
क

❖❖❖❖

munotes.in